


# मळ्यातील अंगार

इंद्रजित भालेराव

# मळ्यातील अंगार

इंद्रजित भालेराव

जनशक्ती वाचक चळवळ

जनशक्ती
वाचक
चळवळ

मळ्यातील अंगार । इंद्रजित भालेराव
Malyatil Angar | Indrajit Bhalerao

प्रकाशक
जनशक्ती वाचक चळवळ
पिनाक, २४४-समर्थनगर,
औरंगाबाद - ४३१ ००१.
दूरभाष : (०२४०) २३४१००४.
Email : janshakti.wachak@gmail.com

© इंद्रजित भालेराव
एकनाथनगर, परभणी-४३१ ४०१
दूरभाष : (०२४५२) २२५५८५

मुद्रक
रुद्रायणी, औरंगाबाद.

मुखपृष्ठावरील अक्षरलेखन
सरदार

मुखपृष्ठ व अक्षरजुळणी
जनशक्ती वाचक चळवळ

प्रथमावृत्ती
९ जानेवारी २०१०

**मूल्य रु. ५०/-**

माझ्या मुक्त ललित गद्य लेखनाला
मनापासून दाद देणाऱ्या
**वि. शं. चौघुले**
यांना...

# सुरुवातीचे थोडेसे

इंद्रजित भालेराव कवी म्हणून मराठी भाषकांना चांगलेच परिचित आहेत. शेतकरी संघटनेबद्दल त्यांना वाटणारा जिव्हाळा त्यांच्या कवितांमधून स्पष्टपणे व्यक्त होत आलेला आहे. त्या जिव्हाळ्याचं गद्यरूप म्हणजे हे पुस्तक.

१९८० च्या नंतर शेतकरी आंदोलन महाराष्ट्रात आणि मग भारतभर पसरत गेलं, त्याची दखल सर्व स्तरांवरून घ्यावी लागली. हे आंदोलन समजून घेण्याचे दोन मार्ग आहेत. एक म्हणजे शरद जोशी मांडत असलेले शेतीअर्थशास्त्राचे सिद्धांत, त्यातून पुढे त्यांनी केलेला जागतिकीकरणाचा पुरस्कार आणि त्याला पूरक अशी स्वतंत्रतावादाची केलेली मांडणी. हा सगळा मार्ग काहीसा गहन, आकडेवारींनी भरलेला, जड असा आहे. याच्या अगदी वेगळा असा दुसरा मार्ग म्हणजे प्रत्यक्ष ग्रामीण भागातील सामान्यांचा भावुक दृष्टिकोन. हा दृष्टिकोन त्यांच्या भाबडेपणातून आलेला नाही; तर शतकानुशतकांचं शेतीचं दु:ख अचूक ओळखून त्यावर उपाय सांगणारा हा महापुरुष आहे, आपण त्याचे ऋणी आहोत. या भावनेतून ही भावुकता आलेली आहे. इंद्रजित भालेराव या दुसऱ्या दृष्टिकोनातून शेतकरी संघटना आणि शरद जोशी समजून घेतात.

मला हे स्पष्टपणे जाणवण्याचं कारण मोठं गंमतशीर आहे. परभणीच्या ज्या शेतकरी संघटनेच्या अधिवेशनास इंद्रजित भालेराव स्वत: हजर होते, शरद जोशींचे विचार समजून घेत होते, त्या अधिवेशनासाठी गावात सभाही आयोजित करीत होते, अधिवेशनातील शेतकऱ्याच्या भल्यामोठ्या कट्आउटची, लाल बिल्ल्याची प्रतिमा आपल्या मनात साठवून घेत होते, त्या काळात मी परभणीत असून, माझ्या घरीच होतो. अधिवेशनाच्या त्या स्थळाकडे फिरकलोही नव्हतो. मीच काय माझा कोणी मित्रही तिकडे गेला नव्हता. माझे वडील त्या अधिवेशनात सक्रिय होते, इतकंच नाही तर शरद जोशी व कार्यकारिणीचे सर्व सदस्य एक

दिवस माझ्या घरी जेवायलाच आले होते; तरी मी प्रत्यक्ष अधिवेशनात गेलो नव्हतो. म्हणजे शरद जोशी माझ्यापर्यंत येऊन पोचले होते; पण मी त्यांच्यापर्यंत पोचलो नव्हतो; तर तिकडे इंद्रजित भालेराव त्या आंदोलनाच्या नजीक होते; पण त्यांची व शरद जोशींची व्यक्तीशः भेट नव्हती.

शरद जोशी मला भेटत गेले 'शेतकरी संघटक'मधील त्यांच्या लेखांतून. शेतकरी संघटकमधील शब्द न् शब्द मी वाचायचो. पुढे शिक्षणासाठी १९८६ ते १९९२ या काळात मी औरंगाबाद येथे होतो. सुटीत परभणीला गेल्यावर मी जुने सगळे 'शेतकरी संघटक' जमा करून, वाचून काढत असे. एकही 'संघटक' माझ्या वाचनातून सुटलेला नाही. अजूनही शेतकरी संघटनेची माझ्या मनातील प्रतिमा आंदोलनातील, अधिवेशनातील नसून 'संघटक'मधील लिखाणाने अधोरेखित झालेली आहे. शेतीचा तर मला गंधही नाही. माझ्या घरी शेतीही नाही. परभणी शहराच्या हद्दीतील थोडीशी जमीन, तिच्यातील आंब्याच्या बागेमुळे आम्हाला जवळची वाटायची.

या सगळ्यांच्या अगदी उलट इंद्रजित भालेराव यांची परिस्थिती. शेतकरी कुटुंबात खेड्यात राहताना त्यांनी शेतीचं दुःख स्वतः अनुभवलं. आपल्या बापजाद्यांच्या वेदना त्यांना समजत होत्या. या सनातन दुखण्याची अचूक कारणमीमांसा करणारे शरद जोशी त्यांना अतिशय जवळचे वाटत होते. त्यामुळे शरद जोशींकडे पाहण्याची त्यांची दृष्टी काहीशी भक्तीची आहे. हे सगळ्यांत पहिले समजून घेतलं पाहिजे.

साहजिकच शरद जोशींच्या 'शेतकऱ्यांचा राजा शिवाजी' किंवा 'अंगारमळा' या पुस्तकांवर ते भरभरून लिहितात; पण 'खुल्या व्यवस्थेकडे खुल्या मनाने', 'प्रचलित अर्थव्यवस्थेवर नवा प्रकाश' किंवा 'स्वातंत्र्य का नासले?' या पुस्तकांबाबत ते लिहायचं टाळतात. याची कारणंही अगदी साधी आहेत. तात्त्विक पातळीवर शेतीच्या दुःखाचे विवेचन वाचण्यापेक्षा त्यांना आंदोलनातील शरद जोशी जवळचा वाटतो. हा माणूस कसा घडला हे समजून घेण्यात जास्त रस वाटतो. खेड्यातल्या माणसाच्या मानसिकतेत ते 'कुणी यावा भगीरथ । गंगा आणावी गावात । आम्ही त्याच्याच नावात । देव शोधू।।' हे लिहून जातात ते त्यामुळेच.

भालेरावसरांनी चार लेखांचा समावेश या पुस्तकात केला आहे. पहिला लेख त्यांनी 'अंतर्नाद'च्या शरद जोशी विशेषांकासाठी लिहिलेला आहे. यात शरद जोशी व्यक्ती म्हणून त्यांच्या वाट्याला आले, त्या आठवणी आहेत. शेतकरी संघटनेतील इतर कार्यकर्त्यांच्याही आठवणी आहेत. हाच लेख विस्तृत स्वरूपात त्यांनी लिहिला असता, तर त्याचंच स्वतंत्र पुस्तक झालं असतं. यातल्या त्यांच्या गावाकडच्या आठवणी, महाविद्यालयात शिकत असतानाच्या आठवणी फार उत्कट झाल्या आहेत. शेतकरी आंदोलनाची ग्रामीण भागावर झालेल्या परिणामाची एक वेगळीच बाजू ते मांडतात. विद्यार्थ्यांना भावलेली संघटना यावर शेषराव मोहिते यांनी थोडंसं लिहिलं आहे. मराठवाडा कृषी विद्यापीठातील विद्यार्थी या आंदोलनात सक्रिय होते. मराठवाडा विद्यापीठातील (आताचं डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ) विद्यार्थीही भावनिकदृष्ट्या या आंदोलनाशी नाळ जोडून होते, हे त्यांनी स्पष्ट केलं आहे.

दुसरा लेख 'अंगारमळा' या पुस्तकावर लिहिलेला आहे. या पुस्तकातील बहुतांश लेख त्यांनी पूर्वी वाचलेलेच होते. आता सलग स्वरूपात ते वाचून, त्यांना जाणवलेले शरद जोशींचे वाङ्मयीन मोठेपण ते मोकळेपणाने सांगतात.

तिसरा लेख म्हणजे शरद जोशी यांच्या 'शेतकऱ्यांचा राजा शिवाजी आणि इतर लेख' व 'प्रचलित अर्थव्यवस्थेवर नवा प्रकाश' या पुस्तकाच्या प्रकाशन प्रसंगी केलेलं भाषण आहे. यातील पहिल्या पुस्तकावर त्यांचं भाषण बेतलेलं आहे. शरद जोशी यांनी चितारलेली शिवाजी महाराजांची शेतकऱ्यांचा राजा ही प्रतिमा त्यांना जास्त महत्त्वाची वाटते. तसेच फुल्यांच्या विचारगाभ्यावर विश्वास असणारी शरद जोशी यांची मांडणी त्यांना भावते.

हे तीनच लेख या पुस्तकात नियोजित होते. 'योद्धा शेतकरी' या पुस्तकाचा त्यांच्या लेखात मोठा आत्मीय उल्लेख आहे. तो वाचून, मी त्यांना 'योद्धा शेतकरी'वर स्वतंत्र लेख लिहायची विनंती केली. त्या विनंतीवरून त्यांनी चौथा लेख सिद्ध केला. तोही या पुस्तकात समाविष्ट केला आहे. शेतकरी संघटनेच्या प्रचाराचं फार मोठं काम विजय परूळकरांच्या 'योद्धा शेतकरी'नं केलेलं आहे हे शरद जोशीही मान्य करायचे. त्या 'योद्धा शेतकरी' पुस्तकाचा प्रभाव आपल्यावर पडल्याचे इंद्रजित भालेराव मान्य करतात.

शरद जोशी यांची मांडणी माझ्यासारखा शेतीशी संबंध नसलेला वर्ग, इंद्रजित भालेराव यांच्यासारखे कुणब्याच्या पुढच्या पिढीचे सुशिक्षित वारस आणि खेड्यातील सामान्य शेतकरी या तिघांनाही भावून जाते. हे एक विलक्षण कौशल्य शरद जोशी यांच्याकडे आहे हे मान्यच करावं लागेल.

कृषिजीवनातील 'उलटीपट्टी'चं गणित कवितेत बसवण्याचं अवघड काम इंद्रजित भालेराव यांच्या कवितेनं यापूर्वीच केलेलं आहे. शेतकरी संघटनेचा

विचार ते या गद्य मजकुरातून मराठी वाचकांपर्यंत पोचवत आहेत. भास्कर चंदनशिव, विनय हर्डीकर, अमर हबीब, शेषराव मोहिते, श्रीकांत देशमुख आणि अनंत उमरीकर अशा फार थोड्या लोकांनी शेतकरी संघटनेवर प्रत्यक्ष अथवा त्याचं ललित साहित्यात रूपांतर करून लिहिलं. भालेरावसरांचं लिखाण सोपं, वाचकांना चटकन आपलसं करणारं आहे. आपल्या भावनांचं प्रकटीकरण स्पष्टपणे करणं हा त्यांचा स्वभाव त्यांच्या लिखाणातही उतरलेला आहे. भावलेली शेतकरी संघटना आणि शरद जोशी ते मोकळेपणाने शब्दांत मांडत जातात.

शेतकरी संघटनेनं रौप्यमहोत्सव पार केला आहे. आता विविध अंगांनी या चळवळीवर लिखाण व्हायला पाहिजे. ललित स्वरूपात आलेल्या लिखाणाचं स्वागत वाचक नेहमीच करत आले आहेत. 'योद्धा शेतकरी' या पुस्तकानं हे यापूर्वीच सिद्ध केलं आहे. स्वत: शरद जोशी यांची मांडणीही अतिशय सोपी, आकर्षक आणि सुटसुटीत असते. शेतीअर्थशास्त्रासारखा जड विषयही त्यांनी सामान्य शेतकऱ्यांना समजावून दिला. शरद जोशी यांचं सर्व लिखाण ग्रंथरूपात उपलब्ध करून देण्यासाठी आम्ही प्रयत्न करतो आहोत. अनंत उमरीकर, शेषराव मोहिते, विनय हर्डीकर, श्रीकांत देशमुख यांचं यासंबंधी लिखाणही प्रसिद्ध केलं आहे व पुढेही करणार आहोत.

इंद्रजित भालेराव यांच्या लिखाणातून शरद जोशी आणि शेतकरी संघटना सामान्य वाचकांपर्यंत जातेय, याचं एक समाधान शेतकरी संघटनेचा कार्यकर्ता व या पुस्तकाचा प्रकाशक म्हणून मला आहे.

औरंगाबाद
१ जानेवारी २०१०

**श्रीकांत उमरीकर**

# लेखानुक्रम

**शरद जोशी, शेतकरी संघटना आणि माझी कविता/११**
**'अंगारमळा'विषयी/४६**
**'शेतकऱ्यांचा राजा शिवाजी' : एक टिपण /५४**
**'योद्धा शेतकरी' : एका चळवळीचा इतिहास/६५**

# शरद जोशी, शेतकरी संघटना आणि माझी कविता

१९८३ ची गोष्ट. वसमतच्या बहिर्जी स्मारक महाविद्यालयात शिकायला होतो. सुप्रसिद्ध सर्वोदयी कार्यकर्ते गंगाप्रसादजी अग्रवाल महाविद्यालयाच्या संस्थापकांपैकी एक. महाविद्यालयात कार्यक्रमाच्या निमित्ताने नेहमी येत. महाविद्यालयात आल्यापासून मी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाने भारावलेला होतो. त्यांचं स्वातंत्र्यसंग्रामातलं योगदान, त्यांना मिळालेला गांधी-विनोबांचा सहवास या आमच्यासाठी अद्‌भूत गोष्टी होत्या. त्यामुळे प्रसादजी महाविद्यालयात आले, की आम्हाला उदात्त आनंद वाटे. त्यांचं बोलणं कानात जीव आणून ऐकावंसं वाटे. मी १९८१ पासून त्यांच्या सहवासात होतो. सर्वोदयाच्या अनेक उपक्रमांत सहभागी होतो. सर्वोदय, सेवादलाची शिबिरं आणि खादीप्रसारातही त्यांच्यासोबत फिरत होतो. ते तेव्हा महाराष्ट्र खादी ग्रामोद्योग मंडळांचे अध्यक्ष होते.

१९८३ मध्ये प्रसादजी खादी, सर्वोदय, सेवादल यांपेक्षा वेगळ्याच विषयाने झपाटले होते. त्यांच्या बोलण्यातून सतत शेतकरी संघटना हा विषय येऊ लागला. ते शरद जोशी यांच्या विचारावर बोलू लागले. प्रसादजींनी एखादा नवा विषय सुचवला तर त्यावर तयारी करून बोलणारे आणि प्रसादजींनी एखादी आंदोलनात्मक कृती सुचविली तर जोखीम स्वीकारून ती पार पाडणारे सुधाकर मुळे, रावसाहेब पतंगे, यमाजी जिते, दिगंबर ठोंबरे यांसारखी प्राध्यापक मंडळी महाविद्यालयात होती. शेतकरी संघटनेच्या विचारानं प्रसादजी झपाटले म्हटल्यावर, ही प्राध्यापक मंडळीदेखील त्या विचारानं झपाटून गेली. बाहेरच्या सभांमधले त्यांचे विचार वर्गातल्या व्याख्यांनांतही डोकावू लागले. आम्ही वर्गातली सगळी मुलं शेतकऱ्यांचीच पोरं असल्यामुळं आम्हाला ते विचार आवडू लागले. शेतकरी आंदोलनासाठी आपणही काही केलं पाहिजे असं वाटू लागलं. शरद जोशींची सभा असेल तिथं आम्ही धावत-पळत जाऊ लागलो. सभेचे आयोजक आमची



ही प्राध्यापक मंडळीच असायची. त्यामुळं सभास्थानी त्यांनी सांगितलेलं काम आम्ही मोठ्या आनंदानं करायचो. शरद जोशींना जवळून पाहता यावं म्हणून व्यासपीठाजवळ जागा पटकवायचो. त्यांचं किंचित तोतरं बोलणं आम्ही कौतुकानं ऐकायचो. नेहरूंची शेतकरीविरोधी नीती आणि त्यांच्या देखण्या व्यक्तिमत्त्वाची केलेली टिंगल या गोष्टींना आम्ही टाळ्या वाजवून दाद द्यायचो.

एकदा प्रसादजी म्हणाले, ''पुढच्या महिन्यात म्हणजे फेब्रुवारी १९८४ मध्ये 'शेतकरी संघटने'चं दुसरं अधिवेशन आपल्या जिल्ह्याच्या ठिकाणी म्हणजे परभणीला होणार आहे. त्याची पूर्वतयारी म्हणून आपणाला जिल्ह्यात गावोगाव सभा घ्यायच्या आहेत. काही सभांना उपस्थित राहून तू बोल आणि तुझ्या गावातही एका सभेचं आयोजन कर. तिथं काही प्राध्यापक आणि मी येतो.''

माझा वर्गमित्र प्रकाश अंभोरे यांनं त्याच्या सातेफळ या गावी सभा आयोजित केली. तिथं प्रा. ठोंबरे, प्रसादजी आणि मी गेलो. तिथं बोलून मी टाळ्या वसूल केल्या. प्रसादजींनी माझ्या बोबड्या बोलण्याचं कौतुक केलं, त्यामुळं मी भारावून गेलो. शेतकरी संघटना म्हणजे आपल्या आयुष्याचं ध्येय वाटू लागलं.

माझ्या गावी मी एक सभा आयोजित केली. सभा म्हणजे काय, ती कशी आयोजित करतात ते माहीत नव्हतं. गंगाप्रसादजींचं मोठेपण वडिलांसह गावातल्या



लोकांना माहीत होतं म्हणून निरोप मिळाल्यावर गावकरी गावातल्या मंदिरासमोर गोळा झाले. प्रा. यमाजी जिते आणि प्रसादजी आले होते. एक छोटासा स्पीकर त्यांनीच सोबत आणला होता. तो सेलवर किंवा बॅटरीवर असावा; कारण आमच्या गावात तेव्हा वीज नव्हती. अंधारातच सभा झाली. प्रास्ताविक, संचलन, आभार हा प्रकार कुणालाच माहीत नव्हता. जितेसरांनी आणि प्रसादजींनी 'शेतकरी संघटने'ची माहिती सांगितली. प्रसादजी सोप्या भाषेत संवाद साधून लगेच खेडुतांशी एकरूप होत. कितीही अवघड विषय लोकांना सोपा करून सांगत. जिते सरांनी परभणीच्या अधिवेशनाची माहिती देऊन, लोकांना उपस्थित राहण्याचं आवाहन केलं. सभा संपली. पाहुण्यांना बाबांनी आमच्या घरी जेवू घातलं. रात्री उशिरा कुठल्यातरी वाहनानं सगळेजण परत गेले.

गंगाप्रसादजी अग्रवाल यांनी मला 'शेतकरी संघटना : विचार आणि कार्यपद्धती' हे शरद जोशी यांचे पुस्तक वाचायला दिले. प्रसादजींनी या पुस्तकाचा हिंदी अनुवादही तेव्हा नुकताच केला होता. वाराणशीच्या सर्व सेवा संघ या सर्वोदयी प्रकाशन संस्थेने तो प्रकाशित केला होता. शरद जोशी यांचे विचार त्यामुळे भारतभर जाणार होते. तेव्हा सर्व समाजवादी मंडळी संघटनेच्या पाठीमागे होती. 'साप्ताहिक माणूस' तर संघटनेच्या बाजूने होतेच पण 'साप्ताहिक साधना'ही संघटनेला भरपूर प्रसिद्धी देत होते. आमच्या मराठवाड्यातून प्रसिद्ध होणारे तेव्हाचे प्रमुख दैनिक 'मराठवाडा' शेतकरी संघटनेला पुष्कळ प्रसिद्धी देत होते. ही सर्वच नियतकालिके व वृत्तपत्रे वसमतच्या बहिर्जी स्मारक महाविद्यालयात आम्हाला वाचायला मिळत होती. त्यात संघटनेविषयी येणारे लेख आणि आंदोलनाचे वृत्तांत वाचून, आम्ही मुले भारावून जात होतो. विजय परुळकरांचे 'योद्धा शेतकरी' हे पुस्तकही तेव्हा राजहंस प्रकाशनाने प्रकाशित केले होते. मुळात ती 'माणूस'मध्ये आलेली लेखमालाच होती. त्यात संघटेनच्या आंदोलनाचे वृत्तांत होते. परूळकरांची भाषा पेटवणारी होती. संघटनेच्या प्रसारात या पुस्तकाने सुरुवातीच्या काळात फार मोठी भूमिका बजावलेली आहे.

फेब्रुवारी १९८४ मध्ये परभणीला झालेल्या दुसऱ्या अधिवेशनात आम्हाला संघटनेविषयी अशी काही पुस्तके उपलब्ध झाली. परुळकरांचं पुस्तक सोडलं, तर इतर पुस्तके स्वत: संघटनेनेच प्रकाशित केली होती. 'शेतकरी संघटना : विचार व कार्यपद्धती' या पुस्तकात साहेबांनी शेतीचे अवघड अर्थशास्त्र इतक्या सोप्या भाषेत मांडून दाखवले होते, की ते सामान्य माणसालाही नीट समजत होते.

माझा मित्र प्रकाश अंभोरे आणि मी वसमतहून या अधिवेशनासाठी परभणीला

आलो होतो. परभणीतच राहणारा आमचा आणखी एक मित्र सारंग साळवी याच्या घरी थांबून, आम्ही दोन दिवस अधिवेशन पाहिलं. या अधिवेशनाला भारतभरातून प्रतिनिधी आले होते. त्याचं आम्हाला फार नवल वाटलं होतं. पुढं प्रत्येक अधिवेशनात आम्हाला हे दृश्य पाहावयास मिळाले.

या अधिवेशनात मनात ठसलेली सगळ्यांत महत्त्वाची गोष्ट होती ती म्हणजे हातात नांगर धरलेला शेतकऱ्याचा प्रचंड मोठा कटआउट. तो आम्ही अजूनही विसरलो नाही. सार्वजनिक सभेच्या ठिकाणी शेतकऱ्याची एवढ्या मोठ्या सन्मानासह स्थापना झालेली आम्ही प्रथमच पाहत होतो. शेतकऱ्यांची पोरं असणाऱ्या आम्हाला ती गोष्ट भावून गेली. शेतकरी संघटनेचा लाल पार्श्वभूमीवर पांढरी अक्षरं असलेला बिल्लाही तेव्हापासूनच मनावर ठसलेला आहे. अजूनही हा बिल्ला कुणाच्या छातीवर पाहिला, की भावुक व्हायला होतं. इतका साधा, गुंतागुंत नसलेला, आकर्षक बिल्ला मी दुसरा पाहिला नाही.

शेतकरी संघटनेने वेळोवेळी काढलेली पोस्टर्सदेखील अशीच काळजाचा ठाव घेणारी होती. म्हाताऱ्या, दाढी वाढवलेल्या, रापलेल्या तरी करारी शेतकऱ्यांचे चेहरे पाहताच पोस्टर्स आपली वाटत. त्यांच्या मांडणीत कल्पकता असे. प्रथमच उभ्या राहणाऱ्या शेतकऱ्यांच्या चळवळीची असलेली ही कलात्मक आणि काव्यात्मक बाजू स्वतंत्र लेखाचा विषय होऊ शकते.

जून १९८५ मध्ये मी पदवीची परीक्षा पास झालो आणि पुढच्या शिक्षणासाठी औरंगाबादला विद्यापीठात गेलो. पोटापाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी बऱ्यापैकी गुणवत्ता प्राप्त करणे भाग होते. त्यासाठी खाली मान घालून अभ्यास करणेही गरजेचे होते. त्या काळात प्रसादजींचा आणि संघटनेचाही संपर्क तुटला; पण संघटनेच्या उपक्रमाकडे आणि अधिवेशनाकडे आमचं लक्ष होतं.

विद्यापीठातही संघटनेविषयी आस्था असणारा श्रीकांत देशमुख हा मित्र भेटला. तो विदर्भातल्या एका दुष्काळी गावातून आला होता. माझ्यासारखाच त्यालाही लेखन-वाचन या गोष्टीचा नाद होता. मी फारसं काही लिहिलं नव्हतं; पण त्याच्या कवितेच्या दोन वह्या भरलेल्या होत्या. थोरामोठ्यांनी त्याच्या कवितेचं कौतुकही केलं होतं. मला त्याच्या कविता खूप आवडल्या होत्या. माझंच भावविश्व त्याच्या कवितेत होतं. शिवाय बहिणाबाई, आनंद यादव, महानोर, वाघ हे आमचे समान दुवे होते. शिवाय शेतकरी संघटनेविषयी आम्हाला सारखीच आस्था होती.

विद्यापीठात वसतिगृहातल्या मुलांच्या खोल्यांच्या भिंती नटनट्यांच्या चित्रांनी



भरलेल्या होत्या. तशा त्या नेहमीच असतात, असाव्यात; पण श्रीकांत आणि माझ्या खोलीतमात्र आम्ही शरद जोशी आणि संघटनेने काढलेल्या शेतकऱ्यांच्या चित्रांना जागा दिली होती. शेती, शेतकरी, शेतकऱ्यांची संघटना आणि शेतकऱ्यांचं साहित्य हाच आमच्या गप्पांचा कायम विषय असायचा. श्रीकांत 'मराठवाडा' दैनिकात युवकांचं सदर चालवायचा. त्या निमित्तानं त्याला नेहमी मराठवाडा प्रेसमध्ये जावं लागायचं. तिथं त्याची अनंत भालेराव आणि त्यांचा मुलगा निशिकांत भालेराव यांच्याशी नेहमी भेट आणि चर्चा होत असे. तिथं आलेलं बरचसं संघटनेविषयीचं साहित्य उपलब्ध होत असे. तो ते खोलीवर घेऊन येत असे. ते मलाही वाचायला मिळत असे. श्रीकांतकडे तर एवढे साहित्य जमा झाले होते, की त्याने पदव्युत्तर संशोधनासाठी शेतकरी संघटना हाच विषय घेतला. त्याचे पुढे पुस्तकही प्रकाशित झाले.

श्रीकांत आणि मी नंतर लिहू लागलो तेव्हा संघटनाविचारांचा प्रभाव आमच्यावर होताच. औरंगाबादचे आमचे शिक्षण संपल्यावर आम्ही पांगलो. श्रीकांत नांदेडला राज्यशास्त्राचा प्राध्यापक म्हणून रुजू झाला. मी परभणीला ज्ञानोपासक महाविद्यालयात मराठीचे अध्यापन करू लागलो. १९८९ मध्ये मी परभणीला आलो. पाच वर्षांपूर्वी झालेल्या शेतकरी संघटनेच्या अधिवेशनामुळे परभणीत संघटना चांगलीच रुजली होती. इथं संघटनेची आंदोलनं आणि साहेबांचे दौरे सतत सुरू होतेच. आता आंदोलनात सहभागी होण्यावर आम्हाला मर्यादा होत्या; परंतु साहेबांची सभा असेल तर मी आवर्जून जात असे. प्रा. प्रभाकर हरकळ, प्रा. भास्कर कापसे, प्रा. श्रीधर कोल्हे यांनाही संघटनेत रस होता. साहेबांची सभा असली की आम्ही आवर्जून जाऊ लागलो. दूर कुठेतरी कोपऱ्यात बसून, कानात प्राण आणून त्यांचे विचार ऐकू लागलो. त्यांना डोळे भरून पाहू लागलो. सभा संपली, की कुणाला न भेटता, बोलता परत येऊ लागलो. साहेबांना भेटावं असं खूप वाटायचं; पण प्रचंड गर्दीत घुसून औपचारिक भेटण्यात मजा नाही असे वाटायचे. ते कुठं थांबलेत तेही माहीत नसायचं. संयोजकांपैकीही कुणी ओळखीचे नव्हते. वर्ष-दोन वर्षे आमचे असेच दूरदर्शन सुरू होते.

शरद जोशी परभणीला आले, की अनंत उमरीकर यांच्या घरी जातात, परभणीतल्या साहेबांच्या कार्यक्रमाच्या संयोजनात उमरीकरांचा वाटा प्रमुख असतो, हेही हळूहळू आमच्या लक्षात आले. एकदा एका सभेनंतर शरद जोशी आणि व्ही.पी. सिंग यांनाही उमरीकरांच्या घरी जाताना आम्ही पाहिलं. दुरून त्यांच्या गाड्यांकडे पाहत आम्ही रस्त्यावर उभे राहिलो.

अनंतराव उमरीकर हे परभणीच्या सांस्कृतिक क्षेत्रातलं एक उपक्रमशील व्यक्तिमत्व. संघटनेशिवायही अनेक कार्यक्रमांच्या संयोजनात ते सतत सहभागी असायचे. परभणीचे त्रैभाषिक कविसंमेलन, गणेश वाचनालयाचे उपक्रम आणि त्यांच्या घरीही काव्यवाचनाच्या मैफली होत. एकदा त्यांचा लहान मुलगा श्रीकांत आमच्या ज्ञानोपासक महाविद्यालयात आला. उमरीकरांच्या घरी कोजागरी पौर्णिमेच्या रात्री होणाऱ्या काव्यजागरात मी सहभागी व्हावं यासाठी निमंत्रण घेऊन तो आलेला होता. मी त्याला आनंदानं सहमती दिली. त्या कार्यक्रमात मी सहभागी झालो. तिथल्या मैफलीची सजावट आणि मोजक्याच दर्दी रसिकांची उत्कट दाद पाहून मी भारावून गेलो. पुढे अख्ख्या उमरीकर कुटुंबाशी माझे जिव्हाळ्याचे नाते जुळून आले. शिवाय शरद जोशी हाही आमच्यातला उत्कट दुवा होता. मला शरद जोशींविषयी आणि संघटनेविषयी एवढी ओढ आहे, हे पाहून अनंतरावांनाही आनंद वाटला. माझी आणि शरद जोशींची भेट घालून देण्याचा निश्चय त्यांनी केला.

१९९१-९२ ची गोष्ट असेल. साहेबांचा परभणी दौरा ठरल्याचा निरोप उमरीकरांनी दिला. परभणीच्या जवळपासचा कुठला तरी एक कार्यक्रम आटोपून, साहेब दुपारी परभणीला येणार होते. कृषी विद्यापीठाच्या अतिथिगृहात ते थांबणार होते. आंदोलनाच्या सुरुवातीपासूनच कृषी विद्यापीठातल्या मुलांनी त्यांना आपलं मानलं होतं. साहेबांनादेखील त्यामुळे कृषी विद्यापीठाविषयी आपुलकी वाटायची. परभणीला मुक्काम असला म्हणजे ते कृषी विद्यापीठाच्या अतिथिगृहातच थांबत असत. साहेबांना भेटण्यासाठी दुपारी एकच्या दरम्यान मी तिथं यावं असं उमरीकरांनी मला सुचवलं. प्रा. प्रभाकर हरकळ, प्रा. भास्कर कापसे आणि मी तिथं जाऊन थांबलोत.

साहेब आलेले होते. कार्यकर्त्यांच्या भेटीगाठी सुरू होत्या. परतूरच्या कार्यकर्त्यांमध्ये निर्माण झालेले वाद मिटवण्यास बराच वेळ लागला. उमरीकरांनी आम्हाला दूरच्या खुर्च्यांवर बसवलं. आम्ही दुरून हा सगळा प्रकार पाहत होतो. प्रवास, कार्यक्रम यामुळं आधीच वैतागलेले साहेब कार्यकर्त्यांच्या भांडणामुळं आणखी वैतागलेले दिसले. त्यांच्या अशा मन:स्थितीत आपण काय भेटावं? आणि काय बोलावं? असा प्रश्न आमच्यासमोर होता. तेवढ्यात उमरीकरांनी आम्हाला जवळ बोलावलं. आमचा परिचय करून दिला. उमरीकरांनी आम्ही भेटायला येणार याची पूर्वकल्पना साहेबांना दिलेली होती. एवढ्या वैतागानंतर कवी भेटायला आला म्हटल्यावर आता आपली काही खैर नाही अशा मन:स्थितीत



साहेब दिसले. थोड्याशा औपचारिक गप्पा झाल्यानंतर उमरीकरांनी मला कविता म्हणायची सूचना केली. अशा परिस्थितीत कविता म्हणणं म्हणजे त्यांच्यावर अन्यायच होता; पण भाव न खाता मी कविता म्हणायला सुरुवात केली. अत्यंत उत्कट होऊन कविता म्हणण्याचे ते सुरुवातीचे दिवस होते. दाद देणाराही तेवढाच उत्कट असेल तर मग विचारायलाच नको. आपल्या भावविश्वाचा भाग असलेला शेतकरी ज्याच्या विचारविश्वाचा भाग आहे आणि ज्याच्या विचारविश्वानं आज राष्ट्र व्यापलेलं आहे त्याच्यासमोर कविता म्हणताना मला जो स्वर्गीय आनंद होत होता, तसा आनंद नंतर दोनदाच मिळाला. एकदा एन. डी. पाटलांना कविता म्हणून दाखवताना आणि दुसऱ्यांदा आर. आर. आबांना कविता म्हणून दाखवताना.

मी म्हटलेली 'जन्म' ही कविता साहेबांना आवडली. पंधरा मिनिटं लागतात ही कविता म्हणायला. मी ही कविता जसजसा म्हणत पुढं जात होतो तसतसे त्यांच्या चेहऱ्यावरचे भाव बदलू लागले. त्यांच्या चेहऱ्यावरचा थकवा नाहीसा होऊ लागला. उत्सुकता वाढू लागली. उत्कटताही वाढू लागली. कविता म्हणून झाली आणि साहेबांनी टाळी वाजवली. भोवतीच्या कार्यकर्त्यांनीही या टाळीला साथ दिली. उत्स्फूर्तपणे आणखी काही कविता म्हणण्याचा आग्रह झाला. मी म्हटल्या आणि त्याही सर्वांना आवडल्या; मग दिलखुलासपणे साहेबांनी पडद्यामागची घडलेली घटना सांगून टाकली.

उमरीकर साहेबांना विनंती करीत होते, की त्यांनी माझ्या कविता ऐकाव्यात, मला भेट द्यावी; पण साहेब म्हणत होते, मला कुणा कवीबिवीला भेटायचं नाही. मला काही या कविलोकांचे अनुभव चांगले नाहीत. माझ्या वाईट अनुभवांत आणखी भर घालू नका. माझ्या कविता साहेबांनी ऐकाव्यात अशी विनंती करण्यासाठी उमरीकर सेलूला जाऊन, तिथं त्यांच्या गाडीत बसले होते. सोबत आशाताई उमरीकरही होत्या. परभणीला येईपर्यंत साहेबांना पटवण्याच्या इराद्यानंच ते दोघं त्यांच्या गाडीत बसले होते. अनंतरावांना साहेब दाद देत नाहीत म्हटल्यावर आशाताई विनवू लागल्या; मग मात्र साहेब म्हणाले, की एका कवीच्या मोठेपणाविषयी नवरा आणि बायकोचं असं दोघांचंही एकमत असेल तर मला या कवीला भेटायलाच पाहिजे आणि मगच साहेबांनी आमच्या या भेटीला संमती दिली होती.

यानंतर साहेबांच्या प्रत्येक परभणी दौऱ्यात आम्ही भेटू लागलो. साहेब परिसरात आले म्हणजे त्यांचे जेवण उमरीकरांच्याच घरी असे. साहेबांच्या आवडीनिवडी आणि पथ्य-अपथ्य लक्षात घेऊन, आशाताई उत्तमच स्वयंपाक

तयार करीत. दौरा पूर्वनियोजित असल्यामुळे त्या आदल्या दिवशीच साहेबांच्या पसंतीचं दही विरजण लावून तयार ठेवीत. उत्तम प्रतीची मेथीची भाजी आणून ठेवीत. शुभ्र ज्वारीच्या फुगलेल्या भाकरी भाजीत. माझ्या दृष्टीनं भाग्याची गोष्ट म्हणजे मला साहेबांसोबत टेबलावर जेवायला बसवीत. आमचं जवळून बोलणं व्हावं अशी त्यांची इच्छा असे. भीडमुर्वत न ठेवता, खटकलेल्या गोष्टीविषयी याच्या-त्याच्या फिरक्या घेत, साहेबांचं जेवण सुरू असे. अनंतराव व आशाताईंच्याही फिरक्या घेणं साहेबांचं सुरूच असे. अनंतरावांचं केसाला मेंदी लावणं, आशाताईंचं लचकत चालणं, एखाद्या कार्यकर्त्यानं जेवायला आढेवेढे घेणं या सगळ्यांवर त्यांच्या फिरक्या सुरू असत. बऱ्याचदा फिरकी एवढी बौद्धिक असे, की साहेब गेल्यावर त्या माणसाला कळे, की आपली फिरकी घेण्यात आलेली आहे.

साहेबासोबत आलेले कार्यकर्ते उमरीकरांच्या घरभर जिथं जागा सापडेल तिथं बसून, आपापली जेवणंखावणं उरकीत. आशाताईंचं सगळ्यांकडं लक्ष असे. पुढच्या प्रवासाचा अंदाज घेऊन आशाताई साहेबांच्या बबन शेलार या ड्रायव्हरजवळ डबा देत असत. आशाताई, अनंतराव, श्रीकृष्ण आणि श्रीकांत या चौघा उमरीकर कुटुंबाचा साहेबांवर प्रचंड जीव. अशी जीव लावणारी माणसं साहेबांना जागोजागी मिळत असतील; म्हणूनच त्यांचा उत्साह टिकून राहण्यास मदत होत असेल.

माझ्याशी ते अर्थशास्त्र किंवा शेतकरी चळवळ या विषयाऐवजी कविता किंवा साहित्यावर बोलत. श्रीकांतनं आणि मी 'समग्र बी. रघुनाथ' तीन खंडात संपादित करून प्रकाशित केले तेव्हा साहेब मला म्हणाले, या श्रीकांतला तुम्ही कसं कामाला जुंपता ते एकदा मला सांगा हो, मलाही जरा त्याला संघटनेच्या कामाला जुंपायचंय. साहेब त्याला निवडणुकांची तांत्रिक माहिती गोळा करायला सांगत. नंतर श्रीकांत स्वत:च संघटनेत इतका गुंतत गेला, की तो संघटनेचा कट्टर बिल्लाधारी झाला. आता तर तो साहेबांची सर्व पुस्तकं पुन्हा एकदा नव्या, देखण्या रूपात आणि वाजवी किमतीत प्रकाशित करतो आहे. हे काम स्वीकारून, श्रीकांतने संघटनेचा खूप मोठा बोजा कमी केलेला आहे. नाही तर म्हात्रेसरांचा बराच वेळ त्यात जायचा. पूर्वी अरविंद वामन कुलकर्णी हे काम पाहत असत. श्रीकांतने जुनी पुस्तके नव्या रूपात देतानाच काही नवे प्रकल्पही निर्माण केले. साहेबांचे असंकलित लेख विषयवार जुळवून, त्यांची पुस्तके प्रकाशित करणे, लोकांना संघटनेची अस्पर्श बाजू दाखवून, त्यावर लिहायला लावणे, संघटनेच्या आंदोलनांचा, अधिवेशनांचा दस्तऐवज तयार करायला लावणे, त्याची पुस्तके प्रकाशित करणे अशा अनेक गोष्टी तो आज निष्ठेनं करतो आहे. त्याचे वडील



अनंतराव स्वत: सुरुवातीपासून संघटनेच्या सर्व आंदोलनांत सहभागी असल्यामुळे त्यांनी कार्यकर्त्यांची व्यक्तिचित्रे आणि आंदोलनाचे दस्तऐवज स्वत: तयार करून दिले. ते लोकांच्या पसंतीला उतरल्यामुळे श्रीकांतला त्याच्याही आवृत्त्या प्रकाशित कराव्या लागल्या. आज श्रीकांतची 'जनशक्ती वाचक चळवळ' म्हणजे शेतकरी संघटनेच्या साहित्याचे संदर्भगृहच झालेले आहे.

जवळाबाजारच्या मुरलीधर मुळे, पुरुषोत्तम लाहोटी, बालाप्रसाद सोनी या मंडळींनी जिल्हा साहित्य संमेलन घ्यायचं आणि भव्यदिव्य करायचं ठरवलं. भारत काळे तेव्हा तिथंच होता. तोही संयोजनात सहभागी होता. साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून जिल्ह्याचे भूमिपुत्र द. पं. जोशी यांची निवड झाली होती. उद्घाटक म्हणून बाबूराव बागुलांनी होकार दिला होता. सगळ्यांचीच इच्छा होती, की समारोपाला शरद जोशी यांनी यावं. जवळा परिसरात संघटनेचा जोर होता. शरद जोशी येणार अस जाहीर होताच परिसरात नवा उत्साह संचारला.

दरम्यान, साहेबांच्या इकडच्या दौऱ्यात संयोजक मंडळीने त्यांना वसमतच्या अतिथिगृहात गाठले आणि संमेलनाच्या समारोपाला येण्याची गळ घातली. साहेबांनी त्यांना एक अट घातली. ते म्हणाले, ''इंद्रजित भालेरावला मी वसमत मतदारसंघातून निवडणुकीला उभा रहा म्हणतोय तर तो सांगतोय राजकारण माझं क्षेत्र नाही. तसंच मी म्हणतो, की साहित्य हे माझं क्षेत्र नाही. तुम्ही सर्वजण इंद्रजित भालेरावला निवडणुकीला उभं राहायला राजी करणार असाल तर मी संमेलनाच्या समारोपाला यायला तयार आहे.'' मी काही राजकारणात पडायला राजी झालो नाही; पण लोकांनी, कसा कुणास ठाऊक, साहेबांचा होकार मिळविला आणि साहेब आले.

श्रीकांतने आणि मी या संमेलनासाठी 'तिफनसाज आणि गोफणगाज' हा एक वेगळाच कार्यक्रम बसवला. वेदापासून ते शेतकऱ्यांच्या आत्महत्येपर्यंत शेतीचा आणि शेतकऱ्यांचा इतिहास संस्कृत, प्राकृत, मराठी भाषांतल्या कवितांतून सादर करायचा. समारोपाच्या आधी आमचा हा कार्यक्रम ठेवण्यात आला होता. त्याआधी शेषराव मोरे यांचे सावरकरांच्या साहित्यावर व्याख्यान ठेवले होते. समारोपाचे प्रमुख पाहुणे असलेले साहेब मोरेंच्या व्याख्यानापासूनच उपस्थित राहिले. श्रीकांतला आणि मला कार्यक्रम सादर करताना साहेबांच्या उपस्थितीचे दडपण आले होते; तेवढाच कृतार्थतेचा आनंदही दाटून आला होता. शेतकऱ्यांचा जिवंत विठोबा मंडपात जमिनीवर बसलेला असल्यामुळे भक्तांच्या उपस्थितीत प्रचंड वाढ झालेली होती. जिल्हा साहित्य संमेलन असूनही, दोन दिवसांपासून

सहा-सात हजार लोक कायम मंडपात बसून होते. साहेबांच्या आगमनानंतर त्यात दुप्पट वाढ झाली. आम्ही आमचा हा शुद्ध अकादमिक स्वरूपाचा कार्यक्रम पंधरा हजारांच्या अशिक्षित शेतकरी समुदायासमोर सादर करीत होतो. साहेबांनी या समुदायाला गंभीर कार्यक्रम शिस्तीत ऐकण्याची सवयच लावली होती. त्यामुळे आमचा हा कार्यक्रम लोक लक्ष देऊन ऐकत होते. कार्यक्रमाचे स्वरूप बोजड असूनही कुणी उठले नाही.

साहेब समारोपाच्या भाषणात बोलताना म्हणाले, 'कार्यक्रम उत्तमच झाला; पण माझ्या उपस्थितीचे दडपण आले, हे ऐकून मला आश्चर्य वाटले. इंद्रजित भालेरावांच्या कविता मला नेहमीच आवडतात, ते आता या कार्यक्रमाच्या रूपाने नवीन काय करतात, त्याची मला उत्सुकता होती. त्यांच्या या कार्यक्रमात त्यांनी रामदासांची 'पाऊस पडेना पडेना। नास कवनी उघडेना' ही कविता समाविष्ट करून घ्यावी. आणखीही काही सूचना मी त्यांच्याशी चर्चा करताना नंतर त्यांना सांगेन. त्याआधी शेषराव मोरे यांचे सावरकरांवरचे भाषणही मी ऐकले. सावरकरांची कविता वगळून, ते त्यांच्या साहित्यावर बोलले. मला वाटते, सावरकरांची कविता वगळून, त्यांच्या साहित्यावरचे भाषण परिपूर्ण असूच शकत नाही. इथून पुढे त्यांनी सावरकरांच्या कवितेचाही, त्यांच्या व्याख्यानात समावेश करावा. मोरेंच्या आधी कुणी तरी बोलताना म्हणाले, की साहित्यनिर्मितीच्या प्रेरणांपैकी मद्यपान ही एक प्रेरणा आहे. मित्रहो, मी पिऊन ग्लासात जेवढी उरत असे तेवढीही तुम्ही कधी पिली नसेल. त्या अनुभवावरून तुम्हाला सांगतो, की दारूचा आणि प्रतिभेचा काहीही संबंध नाही. तुमच्यापैकीच कुणीतरी बोलताना तीस-चाळीस टक्के इंग्रजी शब्द वापरत होता. इथून पुढं मी आता जे साहित्यावर बोलणार आहे, ते नीट लक्ष देऊन ऐका आणि माझ्या बोलण्यात एकही इंग्रजी शब्द आला तर माझा कान धरा.''

यानंतर साहेबांनी साहित्यावर जे भाषण केलं, ते अस्खलित होतं. चुकून एक शब्द त्यांना इंग्रजी वापरावा लागला. त्याआधी त्यांनी लोकांना आठवण दिली, की या शब्दाला नीट मराठी पर्याय नसल्यामुळे मी आता एका इंग्रजी शब्दाचा उच्चार करत आहे. तेवढी मला माफी असावी. साहेबांचं हे भाषण ऐतिहासिक ठरलं.

योगायोगानं हे भाषण ध्वनिमुद्रित झालेलं होतं. नांदेडचे पत्रकार सु. मा. कुलकर्णी यांनी ते लिहून काढलं आणि 'शेतकरी संघटक'च्या अंकात प्रकाशितही झालं. प्रतिष्ठानचे संपादक रवींद्र किंबहूने यांना या भाषणाचा सुगावा लागला



होता. प्रा. मानवेंद्र काचोळे यांनी किंबहुने यांना ते भाषण उपलब्ध करून दिलं. प्रा. रवींद्र किंबहुने यांनी ते प्रतिष्ठानच्या भाषण विशेषांकात प्रकाशित केलं. त्या अंकात जागतिक मराठी परिषद, अ. भा. साहित्य संमेलन, दलित साहित्य संमेलन, ग्रामीण साहित्य संमेलन, स्त्रीसाहित्य संमेलन, आदिवासी साहित्य संमेलन अशा सर्व संमेलनांच्या अध्यक्षांची त्या वर्षीची भाषणे एकत्रित करून छापलेली होती. परळी वैजनाथच्या मराठवाडा साहित्य संमेलनात किंबहुने सरांची भेट झाली, तेव्हा ते म्हणाले, ''अंकातलं सर्वांत चांगलं भाषण शरद जोशी यांचंच आहे.''

याच भाषणातला माझ्या कवितेविषयीचा दीर्घ उतारा मी 'कुळंबिणीची कहाणी' या दीर्घकवितेच्या पुस्तकात प्रस्तावनेसारखा वापरला. त्यामुळे अर्थातच माझ्या कवितेची प्रतिष्ठा वाढली. आता हे भाषण साहेबांच्या 'अंगारमळा' या पुस्तकात संग्रहित आहे. १९९६ सालचं हे भाषण आपण आज वाचू लागलो, तर हादरून जातो. सर्वच मराठी लेखकांनी ते आवर्जून वाचावं असं आहे.

भाषा, साहित्य आणि जगणं यासंदर्भात त्यांनी या भाषणात मांडलेले विचार कायम मार्गदर्शक राहणार आहेत. जागतिक परिस्थितीच्या आकलनाचा आवाका, आंतरिक तळमळ आणि विचारांचा सडेतोडपणा; यामुळे हे भाषण अद्वितीय झालेले आहे. आपल्या अ. भा. संमेलनांच्या अध्यक्षांचा आवाका किती तोकडा असते ते, हे भाषण वाचले, की लगेच लक्षात येते. मराठी वाङ्मयविश्वाने अजूनही या भाषणाची नीट दखल घेतलेली नाही.

१९९६ मध्ये जवळाबाजारचे साहित्य संमेलन झाले आणि १९९८ मध्ये शेतकरी संघटनेने एक ग्रामीण साहित्य संमेलन सांगली जिल्ह्यातल्या इस्लामपूरला घेतले. रघुनाथदादा पाटील या संमेलनाचे संयोजक होते. दादा संघटनेच्या प्रमुख नेत्यांपैकी एक होते. काही दिवस ते संघटनेचे अध्यक्षही होते. संमेलनाचे संयोजन त्यांनी छानच केले. सुरुवातीपासून शेतकरी संघटनेचा कार्यकर्ता असलेला, परभणीच्या कृषी विद्यापीठाचा विद्यार्थी शेषराव मोहिते यांच्या कल्पनेतून हे संमेलन साकारले होते. तो प्राध्यापक असलेल्या लातूरच्या राजर्षी शाहू महाविद्यालयातूनच त्याने सर्वांशी संपर्क केला होता. भास्कर चंदनशिव या संमेलनाचे अध्यक्ष होते. त्यांनी त्यांच्या सविस्तर भाषणातून शेतकरी साहित्याची संकल्पना मांडली होती. कविसंमेलनाचे अध्यक्ष म्हणून विठ्ठल वाघ उपस्थित होते. उद्घाटन आ. ह. साळुंखे यांनी केलं. साहेब संमेलनाला दोनही दिवस उपस्थित राहिले. आनंद यादव आणि रा. रं. बोराडे हे बुजुर्गही आवर्जून उपस्थित

होते.

संमेलनात झालेल्या चर्चा, परिसंवाद, भाषणे या सर्वांचं ध्वनिमुद्रण करून, नंतर रघुनाथदादांनी एक छान स्मरणिका प्रकाशित केली. त्या स्मरणिकेत या संमेलनाचा सर्व दस्तऐवज आजही उपलब्ध आहे. जुजबी लेख आणि जाहिराती छापून स्मरणिका काढण्याऐवजी असा दस्तऐवज देणारी स्मरणिका मला तरी ऐतिहासिक वाटली. या संमेलनात श्रीकांत आणि मी मिळून आमचा 'तिफनसाज' कार्यक्रम सादर केला होता. त्याची संपूर्ण संहिता या स्मरणिकेत प्रकाशित करण्यात आली होती. साहेबांनी दोन दिवस श्रोत्याची भूमिका घेऊन, सर्वांच्या भूमिका ऐकल्या आणि शेवटी समारोपात आपली भूमिका सविस्तर मांडली. साहेबांच्या 'अंगारमळा' या पुस्तकात हेही भाषण उपलब्ध आहे.

वीस पानांच्या या भाषणात साहेबांनी ग्रामीण लेखकांच्या ग्रामाच्या आकलनात कोणत्या गफलती झालेल्या आहेत, ग्रामाचं स्वरूप नेमकं काय आहे, महात्मा फुले यांनी ते आकलन कसं नेमकेपणानं मांडलेलं आहे आणि संघटना व तिचा विचार कसा फुल्यांच्याच मार्गाने चाललेला आहे, हा सगळा गुंता नीट उकलून दाखवलेला आहे. शिवाय, इतरही पुष्कळ महत्त्वाच्या गोष्टी आणि गमतीजमती या भाषणात वाचावयास मिळतात. त्यांचं हे भाषण जवळाबाजारच्या भाषणाइतकंच महत्त्वाचं आहे.

'शेतकरी संघटनेचे घोडे थकले म्हणून ग्रामीण साहित्य चळवळीचे घोडे संघटनेच्या रथाला जुंपायचे असा काही आमचा उद्देश नाही. लेखकानं आमच्या बाजूनं लिहिण्यासाठी अशी संमेलनं घेण्याची गरज नाही. उद्या मी प्रत्येक शेतकऱ्याला कादंबरी विकत घ्यायला लावली आणि तुमच्या पुस्तकाच्या प्रती लाखानं विकू लागल्या, तर तुम्हीच काय गंगाधर गाडगीळ आणि व. पु. काळेही ग्रामीण साहित्य लिहितील' असा एक गमतीदार; तरीही गंभीर युक्तिवाद साहेबांनी इथे बोलून दाखवला होता.

या संमेलनानंतर महिन्याभरात कोजागरी पौर्णिमा येणार होती. साहेबांनी सर्व लेखकांना कोजागरीसाठी आंबेठाणला यायचं निमंत्रण दिलं. 'संमेलन होवो न होवो, दरवर्षी आपण कोजागरीला आंबेठाणला भेटून, चर्चा करत जाऊ' असा मनोदय साहेबांनी बोलून दाखवला होता. नंतरच्या कोजागरीला काहीजण जमा झालेदेखील; पण मला मात्र जाता आले नाही. साहेबांच्या इच्छेप्रमाणे हा उपक्रम पुढे सुरू राहिला नाही. लेखक आणि साहेब एकमेकांच्या संपर्कातही राहिले नाहीत.



या इस्लामपूर संमेलनातली आणखी एक वैयक्तिक आठवण सांगण्यासारखी आहे. तेव्हा मी माझ्या डोक्यावरचे पूर्ण केस काढले होते. खादीचे कपडे तर वापरायचोच. डोक्यावर खादीची टोपीही होती. साहेबांनी पाहिलं, तेव्हा मला ते सानेगुरुजींचा श्याम दिसतोस म्हणाले. आम्ही थांबलोत, त्या हॉटेलवरून साहेब गाडीनं जात. आम्ही पायी जात असू. कार्यक्रमाचं ठिकाण जवळ होतं. आम्ही पायी जात असताना पाठीमागून साहेबांची गाडी आली आणि थांबली. गाडीत एकाच जणाची जागा होती. सगळेजण मला बस म्हणत होते आणि मी इतरांना आग्रह करीत होतो. साहेब म्हणाले, ''सानेगुरुजींचा त्यागाचा खेळ खेळू नकोस, चल गाडीत बैस.'' मी गुपचूप त्यांच्याजवळ जाऊन बसलो.

इस्लामपूरच्या या संमेलनाच्या दरम्यान मी त्यांना त्यांचा आवडता कवी कोण असा प्रश्न विचारला होता. त्यांनी उत्तर दिलं होतं, मोरोपंत हा माझा सर्वांत आवडता कवी आहे. साहेबांना संस्कृत भाषा आणि त्यातली काव्येही फार आवडतात. तसे उल्लेख त्यांच्या लेखनात वेळोवेळी आलेले आहेत. कविता आणि पाठांतर हेही त्यांचे मर्म आहे. परुळकरांनी त्यांच्या पुस्तकांत साहेबांना आवडणाऱ्या चित्रपटगीतांविषयी लिहिले आहेच.

एकदा साहेबांचा आंबेठाणला निवांत मुक्काम होता. फारसे दौरे वगैरे नसावेत. दरम्यान, मी त्यांना माझी काही पुस्तके पाठवली होती. त्यांवरची प्रतिक्रिया कळवलेल्या उत्तराच्या पत्रात त्यांनी मला काही तारखा कळवून, त्या दरम्यान मी आंबेठाणला आलो तर निवांत गप्पा मारता येतील असं लिहिलं होतं. मलाही एकदा आंबेठाणला जायची इच्छा होतीच. बाहेरच्या त्यांच्या भेटी दौऱ्याच्या घाईतच होत होत्या. तिथे निवांत भेटता येईल आणि साहेबांचा निवास जिथे आहे ते ठिकाणही पाहता येईल. अशा दुहेरी उद्देशाने माझ्या मनाने ओढ घेतली.

मी अनंतराव उमरीकरांना ते पत्र दाखवलं. ते अनेकदा आंबेठाणला जाऊन आलेले होते. ते म्हणाले, ''तुम्ही येणार असाल तर मीही तुमच्यासोबत येतो.'' आणि आम्ही दोघे आंबेठाणला निघालो. दिवस पावसाळ्याचे होते. रात्रीच्या गाडीने परभणीहून निघून, सकाळी पुण्यात. चाकणमार्गे आंबेठाण आणि अंगारमळ्यात आम्ही सकाळी दहा-अकराच्या दरम्यान पोहोचलो. आंबेठाणच्या साहेबांच्या शेतात पाणीच पाणी दिसू लागलं. शेतातलं साळीचं पीक आणि बांधावरचं गवत सारख्याच उंचीत वाढलं होतं. त्यातून वाट काढत, आम्ही साहेबांच्या निवासाजवळून ब[illegible] शेलारांच्या घराकडं कृषी अर्थ प्रबोधिनीत गेलो. तिथं निवासाची व्यवस्था ह[illegible]ती. मुख्यमंत्री मनोहर जोशी नुकतेच मळ्यात येऊन

गेल्यामुळे रस्ता मळ्यापर्यंत नीट करण्यात आलेला होता. व्ही.पी. सिंग पंतप्रधान असताना जागतिक दर्जाची दूरध्वनी यंत्रणा मळ्यात बसवण्यात आलेली होती. आता ते पंतप्रधान नसले, तरी यंत्रणामात्र तशीच राहू देण्यात आली होती. साहेबांनी राजगोपालाचारी यांच्या स्वतंत्र पक्षाचे पुनरुज्जीवन केल्यामुळे पक्षाच्या सचिवांनी राजगोपालाचारी यांचे मुंबईतील सर्व फर्निचर कृषी अर्थ प्रबोधिनीला पाठवून दिलेले होते.

आम्ही आंघोळी करून तयार झाल्यावर, पोहे खाण्यासाठी साहेब प्रबोधिनीत आले. आम्ही सर्वांनी सोबत नाश्ता केला आणि साहेबांच्या निवासाकडे गेलो. तिथे आम्ही काय बोलतो त्यातले मला आता काही आठवत नाही; पण दुपारनंतर तिथून निघून आम्ही पुण्याला आलो. रात्रीच्या परभणी गाडीत बसलो. जाताना आणि येतानाच्या प्रवासात आम्ही खूप गाणी म्हटली, एवढे मला नक्की आठवते. परतताना पुण्यात आम्ही माडगुळकरांची भेट घेतल्याचे आठवते. व्यंकटेश माडगुळकर आणि शरद जोशी या दोघांनाही एकमेकांविषयी प्रगाढ आस्था आणि आपुलकी होती. आंबेठाणहून परत आल्यावर मी तिथली पुष्कळ रसभरित वर्णने केली असावीत. कारण पुढच्या आंबेठाण भेटीत काही प्राध्यापक माझ्यासोबत होते.

आंबेठाणच्या या भेटीत मी बराच भारावून गेलो असावा. त्याची साक्ष म्हणजे परत आल्यावर मी साहेबांवर लिहिलेली कविता. ती कविता अशी,

*रापणारे खपणारे सारे सारे साव होते*
*अचानक येऊन हे झाले कसे राव होते*
*लोंढा गढूळ पाण्याचा तुवा बांध बांधलास*
*तडा तडकला त्याचा तुवा सांध सांधलास*
*अशी मारलीस बुडी सारा डहूळला डोह*
*तुवा धुंडून कपार हाती आणलास थोव*
*कधी डोक्यावर ढग फुटू फुटू आले होते*
*कधी पाण्यासाठी जीव तुटू तुटू आले होते*
*रानभर पांगलेले पाणी गोळा झाले कसे?*
*चुकलेल्या हिशोबाचे आणे सोळा झाले कसे?*

ही कविता आणि एक पत्र लिहून, मी साहेबांकडे पाठवले. बबन शेलार यांच्या सुंदर हस्ताक्षरांत उत्तर आले. खाली साहेबांनी सही केलेली होती. साहेबांनी उत्तरादाखल लिहिलेल्या पत्रात लिहिले होते, तुमच्या कवितेच्या खोल डोहात



बुडून अर्थाचा तळ शोधण्याचा प्रयत्न करतो आहे.

बबन शेलार हे साहेबांचे केवळ ड्रायव्हर नाहीत. ते साहेबांसाठी पुष्कळ काही आहेत. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे ते स्वत: उत्तम वाचक आहेत. एकदा साहेबांना पाठवलेली माझी सर्व पुस्तकं वाचून, त्यांनी मला एक सुंदर पत्र पाठवलं होतं. शिवाय, साहेबांची पत्रं लिहिण्याचं कामही तेच करतात. साहेब मजकूर सांगतात आणि शेलार तो लिहून घेतात. शेलारांचे अक्षरही सुंदर आहे. अंगारमळ्यात येणाऱ्या पाहुण्यांची जेवणाची व्यवस्था शेलारांच्या कुटुंबाकडेच आहे. शिवाय, एखाद्या तापस ऋषीसारखे म्हात्रेसरही मळ्यातच असतात. जवळपास लॉजिंग-बोर्डिंगची व्यवस्था नाही; त्यामुळे ही सर्व जबाबदारी मळ्यालाच पार पाडावी लागते. म्हात्रेसरांचे सर्व काही काटेकोर असते. चूक नाही आणि चुकीला माफीही नाही. मला तर त्यांची भीतीच वाटते. पण चाकणच्या महाविद्यालयाचे प्राचार्यपद सोडून सरांनी पूर्णवेळ संघटनेला वाहून घेतले. 'शेतकरी संघटक' केवळ म्हात्रेसरांमुळे वर्षानुवर्ष नियमित निघतो आहे.

मी दुसऱ्यांदा आंबेठाणला गेलो तेव्हा माझ्यासोबत प्रा. भास्कर कापसे, त्यांचे तुळजापूरचे मेव्हणे विश्वासराव चव्हाण आणि अनंतरावांऐवजी आता सोबत होता श्रीकांत उमरीकर व त्याचा मित्र शशांक जेवळीकर. आम्ही ऑगस्ट महिन्यात त्यांच्याकडे गेलो होतो. या वेळी चांगले दोन मुक्काम त्यांच्याकडे थांबलो. साहेबांनाही निवांत वेळ होता. पंधरा ऑगस्टला महाविद्यालयात झेंडावंदनासाठी उपस्थित राहता यावं म्हणून आम्ही चौदा ऑगस्टला परतायची घाई करू लागलो. तेव्हा साहेब चेष्टेने आम्हाला म्हणाले, ''झेंडावंदनाला कुठं उपस्थित राहावं हेही तुमच्या हातात नसेल तर तुम्ही कसले स्वतंत्र?''

इथल्या मुक्कामात एक दिवस साहेब कृषी अर्थ प्रबोधिनीत टेबल टेनीस खेळायला आले. मला म्हणाले, 'चल आपण दोघं खेळू.' 'मला हा खेळ जमत नाही', म्हटल्यावर म्हणाले, 'मला वाटलं तू कॉलेजमध्ये सर्व उपक्रमांत सहभागी होत असशील. तू कॉलेजचा हीरो असशील. मग इतकी मुलं तुझ्या पाठीमागं काय केवळ कवितेमुळं असतात काय?'

साहेब परभणीला आले, की त्यांच्या कार्यक्रमाला माझ्या कॉलेजची शंभरेक मुलं हमखास येत. तसं आम्ही काही प्राध्यापक विद्यार्थ्यांना शरद जोशींविषयी वर्गात नेहमी सांगत असू. त्यामुळं साहेब परभणीत आहेत म्हटलं, की मुलं आमच्या सोबत नेहमी येत. त्यावरूनच साहेबांनी वरील प्रश्न मला विचारला.

या भेटीत वेगवेगळ्या विषयांवर पुष्कळच चर्चा झाल्या. राजकारण, समाजकारण,

साहित्यकारण, एन. डी. पाटील, शेकाप, शरद पवार, व्ही.पी. सिंग, अरुण नेहरू या सर्व विषयांवर साहेब मनमोकळं आणि सडेतोड बोलले. प्रा. कापसे शेकाप-संस्कृतीत वाढलेले. त्यांना त्याविषयी साहेबांची मतं जाणून घ्यायची होती. शिवाय, कापसे अर्थशास्त्राचे प्राध्यापक. त्यामुळे साहेब शेतीच्या अर्थशास्त्रावर त्यांच्याशी पुष्कळ बोलले. मी फक्त कविता आणि साहित्याविषयी त्यांच्याशी बोलू शकत होतो. साहेबांच्या चौफेर तोफेला तोंड देणं मला शक्य नव्हतं. मग मी ती तोफ प्रा. कापसे यांच्याकडं वळवून द्यायचो. कापसे त्या तोफेला व्यवस्थित हाताळायचे.

आमच्यासमोर एकदा त्यांना पुण्याच्या एका सामाजिक कार्यकर्त्या कवयित्रींचा फोन आला होता. साहेब त्यांना स्पष्ट म्हणाले, ''मी तुम्हाला सामाजिक कार्यकर्ताही मानत नाही आणि कवीही मानत नाही. कारण खरा सामाजिक कार्यकर्ता मी आहे आणि खरा कवी माझ्यासमोर बसलेला आहे.'' अर्थात म्हटलं, तर हे त्यांचं म्हणणं गमतीदारही होतं आणि गंभीरही होतं; मग त्यांनी त्या कवयित्रीला फोनवरच माझा परिचय करून दिला.

आमच्या या भेटीच्या वेळी साहेबांनी नुकतीच रंगनाथ पठारे यांची 'ताम्रपट' ही कादंबरी वाचली होती. त्यांना ती आवडलेलीही होती. त्यातल्या समाजवादी पात्राचं व्यक्तिचित्रण साहेबांना विशेष भावलं होतं. त्यांनी पठारे यांना पाठवण्यासाठी पत्रंही लिहून ठेवलं होतं. त्यांनी ते आम्हाला वाचून दाखवलं. एवढ्या धावपळीत आणि आंदोलनाच्या धबडग्यातही त्यांचं वाचन आणि लेखन सुरूच होतं. 'ताम्रपट' सारखे मोठमोठे ग्रंथ वाचून, लेखकांना पत्र लिहीत होते आणि एका इंग्रजी व एका मराठी वृत्तपत्रात आठवडी सदरही लिहीत होते. त्यांचा एकूण आवाकाच दांडगा होता. नंतर असं समजलं, की पैशाची गरज म्हणूनही ते सदरलेखन करत होते. या सदरलेखनाचा तसा संघटनेशी काही संबंध नव्हता. आर्थिक आणि सामाजिक प्रश्न या सदरलेखनाचे विषय असत. शिवाय, पाक्षिक 'शेतकरी संघटका'साठीही त्यांचा एक दीर्घ लेख ठरलेला असे. तेव्हा इतके सगळे व्याप ते सांभाळत.

आंबेठाणच्या या भेटीच्या वेळी एका दिवशी दुपारी चार वाजता साहेब म्हणाले, ''आपण भामचंद्राच्या डोंगरावर फिरायला जाऊयात.'' आमच्यासाठी ती पर्वणीच होती. मी आल्यापासून साहेबांच्या शेताभोवती डोंगर पाहत होतो. ते जवळून पाहण्याची आणि त्यावर चढण्याचीही इच्छा मला होत होती. औरंगाबादच्या विद्यापीठात असताना मला डोंगर चढाय उतरायची सवय झालेली होती.



साहेबांना हृदयविकाराचा दुसरा धक्का नुकताच येऊन गेला होता. त्यांना पायऱ्या चढायलादेखील बंदी होती आणि साहेब डोंगर चढायला निघाले होते. त्यांचे नुकतेच हृदयाचे ऑपरेशनही झालेले होते. बबन शेलार म्हणाले, ''हा बाबा आता कुणाचं ऐकणार नाही. डोंगर चढणार म्हणजे चढणार!''

साहेबांच्या शेतापासून डोंगर दूर होता. म्हणून साहेबांनी पायथ्यापर्यंत गाडी घेतली. साहेबांनी हातात काठी आणि पिण्याच्या पाण्याची बॉटल घेतली. पाण्याची बॉटल माझ्या हातात देण्याचा मी त्यांना आग्रह केला. ते म्हणाले, ''मला सवय आहे. तुम्ही रिकामे माझ्याबरोबर चालण्यात टिकलात तरी पुरे.'' पुढे तेच खरे झाले. वयाच्या साठीतले साहेब हातात वस्तू घेऊन झपाझपा डोंगर चढत होते. आम्ही त्यांच्यामागे फरपटत चाललो होतो.

भामचंद्राच्या डोंगराच्या सात टप्प्यांवर आमचा एकेक सोबती थांबला. त्यांना साहेबांनी व्ही.पी. सिंग, अरुण नेहरू अशी नावं दिली. एकदा सिंग आणि नेहरू इकडे साहेबांसोबत फिरताना असेच एकेका टप्प्यावर गळत गेले होते. साहेब आणि मी मात्र भामचंद्राच्या डोंगरातल्या सातव्या टप्प्यावर असलेल्या तुकारामाच्या गुहेपर्यंत पोचलो. तिथून देहूचे विहंगम दृश्य दिसत होते. तुकारामाच्या अवघड गुहेत आम्हाला परभणीकडचे लोक भेटले. तुकारामाला शोधत त्याची आवली इथेच येत असे. साहेबही तुकारामासारखे या डोंगरात राहायला आले पण त्यांची आवली त्यांना मध्येच सोडून गेली होती.

मिरजेला शेतकरी संघटनेचं संयुक्त महाअधिवेशन ठरलेलं होतं. महिला आघाडी, युवक आघाडी आणि शेतकरी संघटना यांचं एकत्रित अधिवेशन म्हणजे संयुक्त अधिवेशन. दोन दिवसांच्या या खुल्या अधिवेशनाचा समारोप दोनतीन लाखांच्या उपस्थितीत होत असे. मिरजेच्या अधिवेशनाला मी उपस्थित राहावं आणि खुल्या अधिवेशनात साहेबांच्या मुख्य भाषणाच्या आधी मी एक कविता म्हणावी असं नियोजन उमरीकरांनी केलं. माझ्यासाठी ही फारच मोठी संधी होती. मला असं नेहमी वाटत आलेलं आहे, की संघटनेने इतर कविलेखकांपेक्षा माझे जरा जास्तच लाड केले. पण, अर्थातच मी उतलो- मातलो नाही याची खात्री द्यावीशी वाटते.

एवढ्या मोठ्या समुदायासमोर मी प्रथमच कविता म्हणत होतो. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनातली कविसंमेलनं मी गाजवली होती. तिथेही मोठा समुदाय असायचा; पण हा समुदाय त्याच्या चौपट तरी नक्कीच होता. शेतकरी संघटनेनं तुफान उचललेली 'सांगा माझ्या बापानं नाही केला पेरा, तर

तुम्ही काय खाल धत्तुरा?' ही कविता मी प्रथम इथं म्हटली. शिवाय, पाचवीच्या पुस्तकात लागलेली 'बाप' ही, संघटनेचं तत्त्वज्ञान मुलांपर्यंत पोचवणारी कविताही मी इथं म्हटली, तीही लोकांना फार आवडली.

यानंतर महाराष्ट्रात कुठंही माझा कार्यक्रम असला, की संघटनेचे लोक धावून येत. कार्यक्रम संपला, की मला घरी किंवा तिथल्या संघटनेच्या कार्यालयात घेऊन जात. माझा सत्कार करीत. मला जीव लावीत. अजूनही लावतात. मी बहुधा सत्ताधाऱ्यांच्या संस्थेत, महाविद्यालयात, स्नेहसंमेलनांत पाहुणा म्हणून जात असे. व्यासपीठावर बसलेला असे. अध्यक्ष म्हणून सत्ताधारी आमदार-खासदार असत. सुरुवातीचा औपचारिक कार्यक्रम सुरू असतानाच पाचपन्नास लोक, संघटनेचा बिल्ला धारण केलेले, सभागृहात घुसत आणि कोपरा धरून बसत. व्यासपीठावरच्या संयोजकांच्या मनात धडकी भरे. त्यांचा पक्षीय कार्यक्रम उधळून लावणारे हे बिल्लाधारी महाविद्यालयाच्या सांस्कृतिक कार्यक्रमात कशाला घुसले? असा प्रश्न त्यांना पडे. यांना सभागृहाबाहेर कसं काढावं या विवंचनेत ते असत; मग मला त्यांच्या कानात सांगावं लागे, की तुम्ही काही चिंता करू नका, ते माझ्या कवितेचे चाहते आहेत. शांतपणे कार्यक्रम ऐकतील आणि निघून जातील; मग त्यांचा ताण कमी होत असे. कार्यक्रम सुसंस्कृतपणे ऐकून लोक माझा निरोप घ्यायला येत, तेव्हा संयोजक प्रेमळपणे त्यांना चहा घेऊन जायचा आग्रह करीत. महाराष्ट्रात कुठंही गेलो तरी मला हा अनुभव येऊ लागला.

मिरजेच्या या अधिवेशनाने मला महाराष्ट्रभर लोकप्रिय करून टाकले. रघुनाथदादा पाटील, राजू शेट्टी, सदाभाऊ खोत, ही आता संघटनेपासून फाटाफूट झालेली, मंडळी मिरजेच्या या अधिवेशनाची एकजीव संयोजक होती. या अधिवेशनानंतर संघटनेने पश्चिम महाराष्ट्रात मुसंडी मारली. ऊस आंदोलनाने संघटना तिथे रुजली. याआधी इथे संघटनेला फारसा वाव नव्हता.

या अधिवेशनापूर्वी नुकतेच पाशा पटेल भारतीय जनता पक्षात गेले होते आणि शंकर धोंडगे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये गेलेले. धोंडगे अधिवेशनाला येण्याची अपेक्षा नव्हती; पण पाशा पटेल आले. त्यांना व्यासपीठावर बोलवावं असं काही लोक म्हणत होते; पण काही लोकांनी याला तीव्र विरोध केला. माझा मित्र श्रीकांत उमरीकर तर फारच भडकला होता. पाशा पटेलांना व्यासपीठावर बोलावलं तर पहिला दगड मी मारीन असं श्रीकांतनं जाहीरच करून टाकलं. पाशा पटेल व्यासपीठावर आले नाहीत एवढं खरं. ते मंडपातच सगळ्यांच्या भेटीगाठी घेत फिरले आणि परत गेले.





या अधिवेशनानंतर मी जालन्याच्या अधिवेशनाला उपस्थित राहिलो. जालन्याच्या अधिवेशनाच्या आदल्या दिवशी नाशिकच्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात मी कविता म्हटली होती. ती संघटनेचे तत्त्वज्ञान सांगणारीच होती. नाशिक संमेलनात या कवितेला प्रचंड प्रतिसाद मिळाला होता. महाराष्ट्रभर सर्व वृत्तपत्रांनी, पहिल्या पानावर, कविसंमेलनाची बातमी करताना 'कुणब्याच्या पोरा आता लढायला शिक' हेच शीर्षक दिले होते. नाशिक संमेलनाच्या दुसऱ्याच दिवशी जालन्याचे संघटनेचे अधिवेशन असल्यामुळे मी धावतपळत जालन्याला आलो. कालच्या नाशिकच्या संमेलनात शेतकऱ्यांचाच उदोउदो झाल्याचे वाचून, संघटनेची मंडळी खूश झाली. माझी वाटच पाहत होती. मी संमेलनात खरेदी केलेल्या पुस्तकांचं आणि बॅगचं ओझं तसंच सोबत घेऊन संमेलनस्थळी पोचलो.

जालन्याच्या स्टेडियममध्ये लाखभर लोक जमा झालेले होते. नेते मंडळी व्यासपीठावर स्थानापन्न झालेली. उमरीकरांनी मला पाहिलं आणि हाताला धरून थेट व्यासपीठावर नेलं. तोपर्यंत माझ्या नावाची घोषणा झालीदेखील. मी साहेबांच्या पायाला स्पर्श करून, लगेच माईकवर गेलो. कालचा नाशिकचा लाखभर लोकांचा प्रतिसाद अजून माझ्या अंगात संचारलेलाच होता. इथे प्रथमच मी एक प्रयोग केला. समोरच्या लाखाच्या समुदायाला टाळ्यांचा ऱ्हिदम द्यायला सांगून मी कविता म्हणायला सुरुवात केली. टाळ्यांच्या रप्रप् आवाजात मी जोशात कविता म्हणत होतो. लोक इतक्या तालात टाळ्या कसे काय वाजवताहेत म्हणून

सहज मागे फिरून पाहिलं, तर साहेब स्वत: एखाद्या संगीतकाराच्या आविर्भावात तालाचं संचलन करीत होते आणि त्या तालावर लोक टाळ्या वाजवत होते. मला माझं आयुष्यच धन्य झाल्यासारखं वाटलं. मी तिथं म्हटलेली कविता होती,

*शिक बाबा शिक, लढायला शिक*
*कुणब्याच्या पोरा आता लढायला शिक*

*मागं मागं नको पुढे सरायला शिक*
*आत्महत्या नको हत्या करायला शिक*
*लाजरेपणा बुजरेपणा बाजारात ईक*
*घेवू नको फाशी बाबा खावू नको ईख*

*कोट्यावधी कर्ज घेती दलालांची पोरं*
*बुडविती त्याचा कधी करिती ना घोर*
*घेतलेली कर्ज सारी बुडवायला शिक*
*कुणब्याच्या पोरा आता लढायला शिक*

*उंटाहून शेळ्या हाकी सरकार शहाणं*
*त्याच्यामुळे जीव तुझा पडला गहाण*
*निवडून दिलेल्याला पाडायला शिक*
*कुणब्याच्या पोरा आता लढायला शिक*

*जातील हे दीस आणि होईलही ठीक*
*उद्या तुझ्या शेतामधी उधाणेल पीक*
*गाळलेल्या घामासाठी रस्त्यावर टीक*
*कुणब्याच्या पोरा आता लढायला शिक*

कविता म्हणून झाल्यावर लोकांनी प्रचंड जल्लोष केला. भारावलेल्या अवस्थेत मी माझ्या जागेवर येऊन बसलो. सभेत चैतन्याचा संचार झाला होता. हरयाणाचे प्रेमसिंग दहिया आणि पंजाबचे खासदार भूपेंद्रसिंग मान यांचे या कवितेच्या संदर्भात घडलेले किस्से मोठे मजेशीर आहेत. त्याविषयी मी इतरत्र सविस्तर



लिहिलेले असल्यामुळे इथे ते टाळतो आहे.

अधिवेशन संपलं आणि लोक परतू लागले. मी जालन्याच्या रेल्वे स्टेशनवर आलो, तर पाय ठेवायला जागा नाही. म्हटलं स्टेशनवरच पाय ठेवायला जागा नाही तर रेल्वेत घुसणार कसे? मी आधीच दोन दिवसांच्या प्रवासाने आणि धावपळीने खूप थकलेला. सोबत बॅग आणि पुस्तकांचं ओझं. वेळ रात्रीची. मी आतून हाललो; पण माझ्या लक्षात आलं, ही तर आपली संघटनेची बिल्लाधारी मंडळीच आहे. तेवढ्यात उत्साही कार्यकर्ते माझ्याजवळ आले. माझ्या हातातलं ओझं त्यांनी आपल्या हातात घेतलं. गाडी आली तेव्हा ओझ्यासह मलाही उचलून त्यांनी गाडीत ठेवलं. साध्या डब्यात जागा नसल्यामुळे फर्स्टक्लासचा ए. सी. डबा त्यांनी आंदोलनाचं तंत्र वापरून उघडायला लावला. मला तिथं नेऊन बसवलं आणि 'कुणब्याच्या पोरा आता लढायला शिक' अशा घोषणा देत निघूनही गेले. मी आश्चर्यचकित होऊन कवितेचा आणि शब्दाचा प्रभाव अनुभवत बसून राहिलो.

पुढं संघटनेच्या लोकांनी गावागावांच्या चौकातून या कवितेची पोस्टर लावली. काही ठिकाणच्या पोस्टर्सची उद्‌घाटनं माझ्याच हस्ते झाली. कार्यकर्त्यांनी ही कविता म्हणत आंदोलनं आणि हल्लेही केले. कार्यकर्ते संघटनेकडं सतत या कवितेची मागणी करू लागले; मग म्हात्रेसरांनी ती कविता माझ्याकडून मागवली आणि शेतकरी संघटकच्या अंकात छापून टाकली. त्यामुळे ती कार्यकर्त्यांच्या घराघरांत पोचली. पुढं माझ्या 'पेरा' नावाच्या, देशमुख आणि कंपनीने प्रकाशित केलेल्या संग्रहात मी त्या कवितेचा समावेश केला. त्या एका कवितेसाठी शंभर रुपयाचं ते पुस्तक लोक विकत घेऊ लागले. त्या कवितासंग्रहाच्या आवृत्त्या हातोहात खपू लागल्या.

मार्च २००२ मध्ये माझा 'पेरा' हा कवितासंग्रह 'देशमुख आणि कंपनी'ने प्रकाशित केला. त्याला कारणीभूत झाले होते विनय हर्डीकर. ते कंपनीशी संबंधित होते आणि शेतकरी संघटनेशीही; परभणीला आले म्हणजे उमरीकरांकडे थांबत. देशमुख आणि कंपनीसाठी मी भारत काळे याची 'ऐसे कुणबी भूपाळ' ही कादंबरी पाठवली होती. कंपनीने ती प्रकाशित केली होती आणि गाजतही होती. माझी पुस्तकं परभणीच्या 'प्रतिभास प्रकाशना'ने प्रकाशित केली होती. त्याच्या आवृत्त्याही निघत होत्या. पहिले पुस्तक 'मेहता'ने प्रकाशित करूनही मला पुण्या-मुंबईच्या प्रस्थापित प्रकाशकांचे आकर्षण नव्हते. कुणी स्वत: होऊन मागितले तर नाही म्हणण्याचा उद्धटपणा करण्याचेही काही कारण नव्हते.



हर्डीकर जेव्हा म्हणाले, की कंपनीला तुझे एखादे पुस्तक दे, तेव्हा माझ्याकडे कवितेशिवाय अन्य काही नाही असं सांगितलं. देशमुख आणि कंपनीला कवितासंग्रह काढण्यात रस नसावा, असंही मी म्हणालो. हर्डीकर म्हणाले, ''तुझ्या कविता संग्रहात कंपनीला रस आहे.'' आणि कंपनीने माझा संग्रह प्रकाशित केला. संघटनेच्या व्यासपीठावरून गाजलेल्या बहुतेक कविता या संग्रहात होत्या.

शेतकरी संघटनेचे जवळाबाजाराचे कार्यकर्ते -पुरुषोत्तम लाहोटी माझ्या कवितेवर जिवापाड प्रेम करतात. त्यांनी माझ्यासमोर प्रस्ताव मांडला, की संघटनेला 'पेरा'चा प्रकाशन समारंभ करायचा आहे आणि त्यासाठी साहेब येणार आहेत. तेव्हा मी त्यांना नकार दिला. तोपर्यंत माझी आठदहा पुस्तके प्रकाशित झाली होती; पण मी एकाही पुस्तकाचा प्रकाशन समारंभ केला नव्हता. कवीशिवाय इतरांना अशा कार्यक्रमात रस नसतो. खर्चही पुस्तकाच्या निर्मितीपेक्षा जास्त येतो आणि आपल्या गौरवाचा कार्यक्रम आपणच ठेवायचा ही गोष्ट मला लज्जास्पद वाटते. त्यामुळे लाहोटीला मी नकार देत होतो.

लाहोटी हे अत्यंत हट्टी स्वभावाचे. त्यांच्या नियोजनाला नकार घ्यायची त्यांना सवय नाही. त्यामुळे ते चिडले. त्यांनी मला धमकी दिली, की तुम्ही प्रकाशनाला होकार देईपर्यंत मी उपोषणाला बसतो. त्या धमकीलाही मी भीक घातली नाही. तेव्हा त्यांनी आणखी जहाल उपाय शोधला. तुम्ही जर प्रकाशन समारंभाला होकार दिला नाही, तर मी एंड्रीन पिऊन आत्महत्याच करतो असं लाहोटी



म्हणाले; मग मात्र मला होकार द्यावाच लागला. कार्यक्रमाची तयारी सुरू झाली. तयारीत कुठेही मी सहभागी नव्हतो. फक्त तीस तारीख लक्षात ठेवून कार्यक्रमाला उपस्थित राहायचे एवढेच मी ठरवले.

उमरीकरांना भेटून लाहोटी असे अटीतटीला का पडलेत, असा प्रश्न मी विचारला. तेव्हा उमरीकरांनी मला त्यातलं रहस्य सांगितलं. ते म्हणाले, ''साहेब परभणीच्या कार्यकर्त्यांवर रागावले आहेत. गेल्या अनेक दिवसांपासून ते परभणीला आले नाहीत. निमंत्रण द्यायला गेलं तर ते रागावतात आणि नकार देतात. खेड्यापाड्यांतले कार्यकर्ते त्यांच्या भेटीला तरसत आहेत. आम्ही जेव्हा साहेबांकडं तुमच्या गौरवाचा आणि पुस्तकाच्या प्रकाशनाचा विषय काढला तेव्हा त्यांनी चटकन होकार दिला.''

कुठल्याही कार्यक्रमाच्या निमित्ताने का होईना साहेब परभणीला येताहेत म्हटल्यावर जिल्हा संघटनेत आनंद संचरला आहे. तुमच्या नकारानं त्यात विरजण पडणार म्हणून पुरुषोत्तम अटीतटीला पडला होता. साहेबांच्या हस्ते माझ्या पुस्तकाचं प्रकाशन आणि संघटना आयोजित करीत आहे, ही माझ्यासाठी परमानंदाची गोष्ट होती.

साहेबांची दिल्लीत राजीव गांधी व्याख्यानमालेत व्याख्यानं सुरू होती. प्रत्येक रविवारी एक व्याख्यान अशी ती तीन व्याख्यानं होती. स्वत: मनमोहनसिंग त्या व्याख्यानमालेचे आयोजक होते. तेव्हा साहेब दिल्लीला गुंतलेले आहेत. त्यांच्या येण्याचं काही खरं नाही अशी कुणीतरी लाहोटीच्या, संघटनेतल्या विरोधकानं अफवा पसरवली होती.

कार्यक्रमासाठी परभणीतलं सर्वांत चांगलं सभागृह नटराज रंगमंदिर आरक्षित करण्यात आलं होतं. त्याची क्षमता पुष्कळ लोकांना सामावून घेण्याची होती. शिवाय, त्या सभागृहाचं भाडंही पुष्कळच असणार. एवढे लोक आणि एवढे पैसे लाहोटी कुठून आणणार आहे, अशाही शंका लोकांनी घेतल्या. लाहोटी भिंगरीसारखे एकटेच खेड्यापाड्यांतून मोटारसायकलवर फिरत होते. संघटनेच्या कार्यकर्त्यांना निरोप देत होते.

माझ्यासोबत साहेबांच्या हस्ते भारत काळेचाही सत्कार ठेवला होता. कार्यक्रमाच्या दिवशी आम्ही दोघंही उमरीकरांच्या घरी येऊन थांबलो. संघटनेच्या बिल्लाधारी लोकांचे जथेच्या जथे कार्यक्रमस्थळाकडे जाताना दिसत होते. साहेब उमरीकरांच्या घरूनच कार्यक्रमाकडं जातील असं गृहीत धरून, आम्ही तिथे थांबलो होतो; पण साहेब हुलकावणी देऊन परस्पर सभागृहात गेले आणि आम्ही

त्यांची वाट पहात घरी थांबलोत. वेळ होऊन गेला म्हणून आम्ही सभागृहावर गेलो तर साहेब व्यासपीठावर आणि लाहोटी आमचा पत्ता नाही म्हणून प्रचंड अस्वस्थ. त्यांना वाटलं, सरांनी आपणाला ऐन वेळेला हुलकावणी दिली, आता काही खरं नाही.

लाहोटींची तपश्चर्या फळाला आली होती. साहेब आले होते. लोक तर सभागृह ओसंडून वाहावं इतके आले होते. मी प्रास्ताविकात संघटना आणि साहेबांविषयी कृतज्ञता व्यक्त केली आणि काही कविता म्हटल्या. समुदायानं कविता डोक्यावर घेतल्या. माझ्या छातीवर संघटनेचा बिल्ला नसला, तरी तो काळजात आणि माझ्या कवितेत कोरलेला असल्याचं सांगितलं. संघटनेचा बिल्ला लावलेला प्रत्येक माणूस मला माझा नातेवाईक वाटतो, ही माझी भावना मी मांडली. साहेब माझ्या कवितेविषयी नेहमीसारखंच भरभरून बोलले. फार दिवसांनंतर संघटनेला शाहीर मिळाल्याचं समाधान त्यांनी व्यक्त केलं. आतापर्यंत आम्हाला सिनेगीतांच्या चालीवर गाणे लिहिणारेच शाहीर मिळाले. आता स्वतंत्र रचना करून दाद मिळवणारा प्रतिभावान कवी संघटनेला मिळाला, असंही ते म्हणाले. लोकांनी माझ्या बोलण्याला आणि कवितेला दिलेली दाद पाहून, ते लोकांना सूचकपणे म्हणाले, ''लोकांनी त्यांना अशीच दाद द्यावी, प्रतिसाद द्यावा आणि इंद्रजित भालेरावांनी आता या लोकांचं नेतृत्व करावं. मी आता थकलोय.''

साहेब आणखीही पुष्कळ बोलले; पण वृत्तपत्रांनी वरील मुद्दे उचलून धरले. मला कुठल्याच नेतृत्वाची महत्त्वाकांक्षा नाही हे मला साहेबांना सांगता आलं नाही. नेतृत्व करणं हा माझ्या प्रकृतीचा भागच नाही. मी एक कवी आहे आणि कवी असण्यातच मला माझ्या आयुष्याची सार्थकता वाटते. मोठं होता आलं, तर केवळ कवितेतच मोठं होण्याची माझी महत्त्वाकांक्षा आहे.

साहेब दिल्लीहून मुद्दाम या कार्यक्रमासाठी आले. एवढ्या मोठ्या संख्येनं लोक आले. माझ्या पुस्तकाचा पहिला प्रकाशन समारंभ अशा प्रकारे पार पडला. मला तो माझ्या कवितेचा फार मोठा सन्मान वाटला. एका कवीला त्याच्या कवितेचं आणखी काय कौतुक हवं असतं? कार्यक्रमावर खर्च तर खूप झाला असणार? तो कुणी केला असावा? संघटनेच्या फाटक्या कार्यकर्त्यांनी बऱ्यापैकी पगार असणाऱ्या माझ्यासाठी एवढं काही करावं याचा अपराधभाव आहेच.

कार्यक्रम संपल्यावर साहेब सेलूला गोविंद जोशी यांच्याकडं गेले. जाताना मी घरी जाऊयात म्हणालो; पण त्यांना पुढं जायची घाई होती. रात्री विमानानं परत दिल्लीला जायचं होतं. साहेबांना आइस्क्रीम आवडतं हे मला माहीत होतं. त्यांच्या





सेलूला जाण्याच्या रस्त्यातच माझ्या डहाळे नावाच्या विद्यार्थी मित्राचं आइस्क्रीमचं दुकान होतं. मी त्यांना दुकानासमोर थांबायला सांगून सोबतच्या सर्व कार्यकर्त्यांसह आइस्क्रीमचं आग्रहाचं निमंत्रण दिलं. साहेब खाली उतरले. सोबत कार्यकर्तेही थांबले. मला आनंद वाटला. मित्राच्या पार्लरवर सगळ्यांना पुरतील एवढ्या खुर्च्याही नव्हत्या. असेल नसेल तेवढं आइस्क्रीम त्याला बाहेर काढायला सांगितलं, सर्वांना द्यायला सांगितलं.

साहेबांना आवडणारं आइस्क्रीम सापडलं पण लोडशेडिंगमुळं त्याची जी अवस्था झाली होती, त्यामुळं आइस्क्रीमला साहेबांनी कारगील आइस्क्रीम असं नाव दिलं. आम्ही त्यांच्याकडं कुतुहलानं पाहिल्यावर त्यांनी त्याचा खुलासा केला. म्हणाले, 'कारगिलयुद्धात घायाळ झालेले सैनिक जसे पेटीत घालून आणतात, तसे हे कोणताच आकार शिल्लक नसलेले आइस्क्रीम म्हणून त्याचं नाव कारगिल आइस्क्रीम!''

मधला बराच काळ साहेबांशी संपर्क राहिला नाही. तसा मी संघटनेचा कार्यकर्ता नव्हतोच. त्यामुळे, सातत्याने संपर्क हा प्रकार कधीच नव्हता. माझ्या कवितेला प्रेरणा मिळण्यासाठी मी संघटनेकडे जात होतो आणि कार्यकर्त्यांत उत्साह निर्माण होण्यासाठी संघटना माझ्या कवितेकडे येत होती. मी संघटनेचा बिल्ला लावावा असा आग्रह कुणी करीत नव्हतं आणि कुठल्याही एका संघटनेला किंवा पक्षाला बांधून घेण्याची माझी इच्छा नव्हती. माझ्या कवितेला पूरक,

पोषक जिथून जे सापडेल, तिथून ते घेण्यासाठी मी माझे दरवाजे खुले ठेवले होते. संघटनेकडून माझ्या काहीच अपेक्षा नसल्यामुळे अपेक्षाभंग होऊन, संघटनेपासून दूर जाण्याचा प्रश्नच नव्हता. इतर काही साहित्यिकांसारखं निव्वळ स्वार्थासाठी संघटनेचा प्रभाव आणि संपर्क लपवून ठेवायचंही मला काही कारण नव्हतं.

साहेबांसोबत संघटनेत काम करणारे सर्व बिनीचे शिलेदार साहेबांइतकंच माझ्या कवितेवर प्रेम करीत. रघुनाथदादा, पाशा पटेल, लक्ष्मण वडले, गुणवंत हंगरगेकर, शोभा वाघमारे, सरोजताई काशीकर, अजित नरदे, म्हात्रेसर, विनय हर्डीकर, शंकर धोंडगे, राजू शेट्टी, सदाभाऊ खोत, बबन शेलार, डॉ. वाघ, हेमंत देशमुख अशी कितीतरी नावं सांगता येतील, की जे माझ्यावर जिवापाड प्रेम करीत असत. यांतले काही आता संघटनेत आहेत आणि काहींनी संघटना सोडली. ती सोडण्याला सत्तास्पर्धेसह आणखीही काही कारणं असतील. संघटना सोडली, तरी हे लोक माझ्या कवितेवर सारखंच प्रेम करतात. संघटना सोडल्यानंतर ते वेगवेगळ्या गटांत गेले, तरी माझ्या कवितेवरच्या त्यांच्या प्रेमातमात्र गटतट पडलेले नाहीत. हा प्रत्येक माणूस बाहेर पडला तेव्हा मला वाईट वाटायचं. काही झालं, तरी साहेबांची सर कुणाला येणं शक्य नाही, यावर माझा ठाम विश्वास आहे. पोटच्या पोरांसारखं ज्यांच्यावर प्रेम केलं, ती माणसं सोडून जाताना साहेब दु:खी झालेले पाहून मलाही वाईट वाटायचं. शंकर धोंडगे संघटना सोडून गेल्यानंतर नांदेडला झालेल्या मेळ्यात साहेब जे बोलले, त्यावरून त्यांच्या मानसिक स्थितीची कल्पना येते. 'वेळ आली म्हणून चिंध्या नेसणारी आई, आता मला आवडत नाही असं म्हणून कुणी आईला सोडून जात नसतं,' असं जेव्हा साहेब म्हणाले तेव्हा आमच्याच पोटात कालवलं.

धोंडगे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये गेल्यानंतर त्यांनी राष्ट्रवादी किसान भारतीचे औरंगाबादला अधिवेशन घेतले. रमेश राऊत यांच्या मध्यस्थीने त्यांनी माझा कार्यक्रम ठेवला. मी गेलो. कार्यक्रम चांगला झाला; परंतु धोंडगे ज्या आस्थेने आणि जिव्हाळ्याने सारखं साहेबांविषयी विचारीत होते त्यावरून त्यांच्या मन:स्थितीची कल्पना येते. या संदर्भात चूक कुणाची, बरोबर कोण याचा निर्णय करण्याची माझी लायकी नाही. शेतकऱ्याविषयी ज्याच्या मनात आतून आस्था आहे याची मला खात्री पटते त्या माणसाविषयी मला आतून आस्था वाटते. म्हणूनच आज आर. आर. पाटील माझ्या आस्थेचा विषय होऊ शकतात. म्हणून मी राष्ट्रवादी काँग्रेसचा कार्यकर्ता आहे असा त्याचा अर्थ कुणी घेऊ नये. सर्व विचारांच्या आतून चांगल्या माणसांशी संबंध ठेवताना मला संकोच वाटत नाही.



'दहा दिशांतून सृष्टीवरती जे सुंदर येते। स्वागत करूया त्या सगळ्यांचे सारून सर्व मते' ही उपनिषदीय भूमिका मला आपलीशी वाटते, एवढाच याचा अर्थ आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे लक्ष्मणराव ढोबळे पूर्वी दरवर्षी मंगळवेढ्याला कविता महोत्सव घेत असत. मला नेहमी बोलावत. मीही जात असे. एकदा व्यासपीठावर अर्धा डझन मंत्री होते. समोर श्रोतृसमुदायात पाशा पटेल बसलेले होते. तेव्हा बहुधा ते राष्ट्रवादी काँग्रेसच्या संपर्कात असावेत. मी माझी कविता म्हणताना व्यासपीठावरच्या अर्धा डझन मंत्र्यांऐवजी शेतकऱ्यांचा खरा कैवार घेणाऱ्या संघटनेचा पाईक पाशा पटेल यांना अर्पण केली. नंतर सत्कार करून, माझ्या हातात सोन्याची अंगठी घालताना लक्ष्मणराव ढोबळे माझ्या कानात म्हणाले, ''तुम्हाला माणसं ओळखता येत नाहीत.'' मी बुचकळ्यात पडलो, की लक्ष्मणराव असं का म्हणाले? पण नंतर महिन्याभरातच पाशा पटेल यांनी भाजपात जाऊन लक्ष्मणरावांच्या म्हणण्याचा अर्थ माझ्या प्रत्ययाला आणून दिला.

पण, पाशा पटेल यांच्याविषयीदेखील माझ्या मनात काही गैरसमज नाही. नंतर बीजेपीच्या बड्या नेत्यांसह ते माझ्या घरी येऊन गेले. अडवाणी आणि राजनाथसिंह यांच्या उपस्थितीत यवतमाळच्या भव्य मेळाव्यात माझा काव्यवाचनाचा कार्यक्रम व्हावा असा त्यांनी घाट घातला होता. तो योग आला नाही हा भाग वेगळा; पण ते अजूनही माझ्या कवितेवर किती प्रेम करतात त्याचा हा पुरावा आहे आणि पाशा पटेल यांनी भारतीय जनता पक्षात जाऊन, संघटनेच्या कामाचा वसा सोडला नाही, तिथेही त्यांचा संघर्ष शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठीच आहे, हे पाहून मीही त्यांच्यावर पहिल्याइतकेच प्रेम करतो.

मी कधी निवडणुकीच्या आणि पक्षीय राजकारणात पडत नाही. पक्षप्रचारासाठी आलेल्या कोणत्याही नेत्याच्या सभेला जात नाही; कारण त्यांचं तिथलं अभिनिवेशी बोलणं सापेक्ष असतं. त्यातून आपणाला काही मिळण्याची शक्यताच नसते. निवडणुकीच्या काळात मत मागायला घरी आलेल्या कोणत्याच पक्षाच्या उमेदवाराला मी, 'तुला मत देतो' असं म्हणत नाही. मग मतदानाच्या गुप्त पद्धतीला अर्थ काय? या सगळ्या पार्श्वभूमीवर आयुष्यात एकदाच मी प्रचारात उतरलो आणि तेही साहेबांच्या इच्छेसाठी. पाच वर्षांपूर्वी मागच्या विधानसभेच्या वेळी रघुनाथदादा पाटील इस्लामपूर (वाळवा) इथून उभे राहिले होते. दादांचा फोन आल्यावर मी त्यांना सहा प्रचारसभा घेण्यासाठी होकार दिला आणि त्या घेतल्या. त्या परिसरातल्या पठ्ठे बापूराव पाटील, एन. डी. पाटील यांची सासुरवाडी, विश्वास पाटील, यशवंतराव मोहिते अशा लोकांच्या गावी या सभा झाल्या.

माझ्यासाठी तो मोठा समृद्ध अनुभव होता. तो स्वतंत्र लेखाचा विषय आहे आणि त्यावर मी केव्हातरी सविस्तर लिहिणार आहेच.

जयंत पाटलांच्या विरोधातली ही निवडणूक जिंकणं रघुनाथदादांना शक्यच नव्हतं. तसंच घडलं. आता तर दादांनीही संघटना सोडली; पण त्यांच्या कवितेवरच्या प्रेमात काहीही अंतर नाही. परभणीहून जातायेतांना पूर्वी हे लोक आवर्जून घरी येत. आताही येतात. रघुनाथदादांनी इस्लामपूरला घेतलेलं शेतकरी साहित्य संमेलन आणि त्या संमेलनाचा दस्तऐवज म्हणून संमेलनानंतर प्रकाशित केलेली स्मरणिका विसरणं कधीही शक्य नाही.

राजू शेट्टी यांचा माझा तसा फार संपर्क नाही; पण त्यांनी शेतकऱ्यांच्या जीवनावरच्या एका चित्रपटाच्या निर्मात्याला गाणी म्हणून माझ्या कविता वापरायला सांगितलं होतं. त्या निर्मात्याचा तसा परवानगी मागणारा फोनही आला होता. पुढं काय झालं ते माहीत नाही. हे सांगितले एवढ्यासाठी, तेही माझ्या कवितेला विसरलेले नाहीत. मागच्या वर्षी आम्ही त्यांना परभणीला यशवंतराव चव्हाण स्मृतिव्याख्यानमालेसाठी बोलावलं होतं. तेव्हाही त्यांच्या जुन्या स्मृती जाग्या झाल्याचं जाणवलं. आज तर ते निवडणुकीच्या राजकारणातही यशस्वी झालेले आहेत. शेतकऱ्यांचे लढे पहिल्याइतक्याच प्राणपणाने आजही लढवत आहेत. आज ते सर्वांच्याच आकर्षणाचा विषय झालेले आहेत. संघटनेशी त्यांचा मतभेद झाला असला, तरी संघटनेच्या तत्त्वापासून ते ढळलेले नाहीत.

सदाभाऊ खोतही असेच माझ्या कवितेवर उत्कट प्रेम करणाऱ्यांपैकी एक. इस्लामपूरजवळच्या त्यांच्या खेडेगावी मी जाऊन आलो. तिथला माझा कार्यक्रम केवळ अविस्मरणीय झालेला होता. शरद जोशी यांच्या खासदार निधीतून त्यांनी या गावाचा कायापालट घडवून आणला आहे. आता त्यांनी हे गावही सोडलं आहे आणि ते संघटनेपासूनही दूर गेले आहेत. धुळे जिल्ह्यातल्या पिंपळनेर या त्यांच्या नव्या गावी जाऊन आलो. तिथेही त्यांनी प्रस्थ निर्माण केले आहे. भव्य असा दूध प्रक्रिया प्रकल्प उभा केला आहे. तिथल्या माझ्या कार्यक्रमाला त्यांनी हजारोंचा समूह जमवला होता.

अशा अनेक कार्यकर्त्यांच्या अनेक आठवणी सांगता येतील. त्यावरच एक स्वतंत्र पुस्तक होईल इतक्या आठवणी व अनुभव माझ्याजवळ आहेत. आमच्या परभणी जिल्ह्यात तर असंख्य नावं सांगता येतील इतके कार्यकर्ते माझ्यावर प्रेम करतात. गावागावांतून माझं नाव ऐकून लोक जमा होतात. ब. ल. तामसकरांना तर मी माझ्या वसमतच्या विद्यार्थीजीवनापासून ओळखतो. हा एकटा कार्यकर्ता



एका स्वतंत्र ग्रंथाचा विषय होऊ शकतो. ॲड. अनंतराव उमरीकर हे तर परभणीतले माझे पालकच आहेत. त्यांच्याविषयी मी कितीही लिहू शकेन.

१० डिसेंबर २००५ रोजी परभणीला शेतकरी संघटनेचा रौप्यमहोत्सवी महामेळावा झाला. १९८० मध्ये सुरू झालेली संघटना आता पंचवीस वर्षांची झाली होती. त्या वेळी संघटनेने रौप्यमहोत्सव साजरा करायचा असं ठरवलं. योगायोगानं तो परभणीला व्हायचा ठरला. त्यानिमित्त परभणीला तयारीच्या बैठका होऊ लागल्या. स्वत: साहेब आणि अमर हबीब, विनय हर्डीकर आणि इतरही अनेक शेतकरी नेते पूर्वतयारीसाठी येऊ लागले. माझ्या भेटीगाठी होऊ लागल्या. एक दिवस मला समजलं, की या अधिवेशनात सूत्रगीत म्हणून माझी 'कुणब्याच्या पोरा आता लढायला शिक' ही कविता स्वीकारायची असं एका बैठकीत ठरलं. अमर हबीब यांनी फोन करून मला तशी परवानगी मागितली. परवानगी न देण्याचा काही प्रश्नच नव्हता, मी ती आनंदानं दिली.

एका मोठ्या परंपरेत माझ्या कवितेचा समावेश झाला याचा मला आनंद होता. साहेबांची कवितेची आवड आणि जाण याची मला चांगलीच कल्पना होती. ते कवितेवर किती प्रेम करतात, याचे पुरावे त्यांच्या लेखनात जागोजाग सापडतात. मेघदूत आणि आणखी कितीतरी संस्कृत कवितांचं त्यांचं पाठांतर अगाध आहे. मराठी कवितांचंही पाठांतर तितकंच आहे. एकदा तर कवींना आणि प्राध्यापकांना त्यांनी कवितेच्या पाठांतराच्या भेंड्या खेळण्याचं आव्हानच दिलं होतं. कुणी समोर आलं असतं, तर त्यांनी नक्कीच हरवलं असतं. महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनात काम करणाऱ्यांपैकी वाङ्मयाची जाण इतकी सखोल असलेलं दुसरं कुणी सामाजिक नेतृत्व माझ्यातरी पाहण्यात नाही.

साहेबांच्या लेखनात एक-दोन ठिकाणी त्यांच्या आई कविता करत असत असा उल्लेख आलेला आहे. साहेबांनी सुरुवातीच्या काळात ललितलेखन केल्याचाही उल्लेख आहे. दु:खाकडं निर्विकारपणे पाहण्याचं मन आपल्याकडं नाही म्हणून आपण ललितलेखन सोडलं असाही त्यांच्या लेखनात उल्लेख आलेला आहे; पण 'अंगारमळा' या त्यांच्या अलीकडच्या पुस्तकात जे लालित्य आलेलं आहे ते वेगळ्या जातीचं आहे. त्याला मराठी वाङ्मयात तरी तोड नाही.

अपत्यांना, शेतांना, घरांना नाव ठेवताना ती कवितेतून शोधण्याचा साहेबांना नादच आहे. आपल्या पहिल्या अपत्याचं नाव ठेवताना त्यांनी केशवसुतांच्या खालील ओळींचा आधार घेतला होता.

***जेथे ओढे वनराजी***
***तेथे वृत्ती रमे माझी***
***कारण काही साक्ष तिथे***
***मज त्या श्रेयाची पटते***

यावरूनच आपल्या पहिल्यावहिल्या मुलीचे नाव त्यांनी श्रेया असे ठेवले होते. सिंध कॉलनीतल्या त्यांच्या घराचे नाव त्यांनी मृद्‌गंध असे ठेवले होते. हे विंदा करंदीकर यांच्या कविता संग्रहाचे नाव आहे. आंबेठाणला साहेबांनी शेत घेतलं तेव्हा कुसुमाग्रजांच्या पुढील ओळी समोर ठेवल्या होत्या.

***पदोपदी पसरून निखारे, आपुल्याच हाती***
***होवूनिया बेहोश धावलो, ध्येयपथावरती***
***कधी न थांबलो विश्रांतीस्तव, पाहिले न मागे***
***बांधू न शकले प्रीतीचे वा कीर्तीचे धागे***
***एकच तारा समोर आणिक, पायतळी अंगार***

वरील ओळींतला शेवटचा शब्द अंगार पकडून साहेबांनी शेताला नाव ठेवले अंगारमळा. नंतर शेतकरी संघटनेची सुरुवात झाली, तेव्हा आपला विचार नीटपणे मांडू शकणारी आणि कार्यकर्त्यांना प्रेरणादायक अशी कविता साहेब शोधू लागले. त्यांना ती साने गुरुजींच्या संग्रहात सापडली.

***आता उठवू सारे रान***
***आता पेटवू सारे रान***
***शेतकऱ्यांच्या राज्यासाठी***
***लावू पणाला प्राण***

चांदवडला जे महिलांचं अधिवेशन झालं तेव्हा खास शेतकरी महिलांचं दुःख मांडणारी कविता शोधताना त्यांना नारायण सुर्वे यांची पुढील कविता सापडली.

***डोंगरी शेत माझं***
***मी बेणू किती***
***आलं वरिस राबून***
***मी मरावं किती***

या आधी जालन्याच्या अधिवेशनाविषयी मी लिहिले आहेच. तेव्हाच्या पोस्टरवर पुन्हा एकदा केशवसुतांची ओळ ठळकपणे छापली होती. जागतिकीकरणाला सामोरं जाण्यासाठी तयार राहायला सांगणारी ती ओळ होती,

***सावध ऐका पुढल्या हाका***





परभणीच्या रौप्यमहोत्सवी अधिवेशनासाठी जेव्हा माझ्या कवितेची ओळ स्वीकारल्याचे मला कळले, तेव्हा संघटनेची कवितेविषयीची ही सगळी पार्श्वभूमी माझ्यासमोर उभी ठाकली आणि माझ्या अंगावर रोमांच उभे राहिले. ही कविता मी लिहिल्याच्या सार्थकाची ती परिणती होती. कवितेचा इतका चपखल उपयोग अन्य कुण्या चळवळीने केल्याचे मला तरी आठवत नाही.

'कुणब्याच्या पोरा आता लढायला शिक' हे माझे शब्द या संपूर्ण अधिवेशनात आणि महाराष्ट्रभर दुमदुमत होते. ते स्थानकांवर, भिंतींवर, दुभाजकांवर, वाहनांवर, पोस्टरवर, व्यासपीठांवर असे सर्वत्र महाराष्ट्रभर लिहिण्यात आले. प्रवास करताना पुढं कित्येक महिने मला माझीच ओळ पाहून मजा वाटायची. प्रत्यक्ष अधिवेशनात साहेबांच्या भाषणाआधी ही संपूर्ण कविता मी म्हणावी असे ठरले होते. त्याप्रमाणे मी ती म्हटली. व्यासपीठावरील सर्व मान्यवर आणि समोरचा लाखोंचा समूह मी कविता म्हणताना टाळ्यांचा ताल देत होता. त्याचे फोटो मी मुद्दाम माझ्याजवळ जपून ठेवलेले आहे. कविता म्हटल्यानंतर साहेबांचा फोटो आणि माझीच ओळ असलेलं अधिवेशनाचं स्मृतिचिन्ह साहेबांच्याच हस्ते घेऊन मी व्यासपीठाखाली उतरलो आणि श्रीकांतच्या स्टॉलवर जाऊन, इतर भाषणाचा आनंद घेत बसलो. साहेब त्यांच्या भाषणात माझ्या कवितेविषयी पुष्कळ बोलले. त्यांच्या त्या संकलित भाषणात तो मजकूर अजूनही वाचावयास मिळेल.

नारायण सुर्वे यांनी 'डोंगरी शेत माझं' या कवितेविषयी लिहिलेल्या लेखात

आणि एका मुलाखतीतही एका प्रश्नाला उत्तर देताना, 'चांदवडच्या शेतकरी महिला अधिवेशनात लाखभर महिलांनी एका तालासुरात हे गाणं म्हटलं हा कवी म्हणून आपल्या आयुष्यातला सर्वोच्च आनंदाचा क्षण होता' असं लिहून ठेवलं आहे. परभणीच्या रौप्यमहोत्सवी अधिवेशनात मी 'कुणब्याच्या पोरा आता लढायला शिक' ही कविता म्हटली, तेव्हा माझीही भावना काहीशी नारायण सुर्वे यांच्यासारखीच आहे.

साहेबांचं माझ्या कवितेवरचं प्रेम जगजाहीरच आहे. ह. मो. मराठे यांना मुलाखत देताना साहेबांनी, "शेतकऱ्यांच्या जीवनाचं खरंखुरं चित्रण करणारा मला तरी आज मराठीत एकच कवी दिसतो, तो म्हणजे इंद्रजित भालेराव" असं म्हटलं होतं. साहेबांची ही प्रदीर्घ मुलाखत ह. मो. मराठे यांच्या 'एक माणूस, एक दिवस' या पुस्तकात संकलित आहे. 'आम्ही काबाडाचे धनी' ही माझी दीर्घ कविता वाचून लिहिलेल्या पत्रात साहेबांनी लिहिले होते, "ही समग्र कविता मला फार फार आवडली. तिच्यात थोडे फार दोष दिसले ते केवळ दृष्ट लागू नये म्हणून गालावर लावलेल्या तिटीसारखे वाटले." आणखीही पुष्कळ काही त्या पत्रात साहेबांनी लिहिले होते. जवळाबाजारच्या साहित्य संमेलनातही साहेब या कवितेवर सविस्तर बोलले. परभणीच्या रौप्यमहोत्सवी संमेलनातही बोलले. एका कवीवर एका चळवळीच्या नेत्यानं इतकं प्रेम करावं, ही त्या कवीसाठी भाग्याचीच गोष्ट. मी भाग्यवान आहे.

मराठी कथाकादंबरीकारांनी, काही अपवाद वगळता, शेतकरी संघटनेचा, आंदोलनाचा फारसा पडसाद आपल्या वाङ्मयावर पडू दिला नाही. भारतातल्या इतर भाषांत काय स्थिती आहे, ते पडताळून पहायला मार्ग नाही; पण एका समर्थ कादंबरीत शेतकरी चळवळ आणि शरद जोशी यांचा फार सूचक आणि समर्पक संदर्भ आलेला आहे. देबेश रॉय हे फार मोठे बंगाली कादंबरीकार आहेत. बंगालच्या ग्रामीण भागाचं आणि कृषिजीवनाचं चित्रण करणाऱ्या हजारो पानांच्या कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या आहेत. 'तिस्तापारेर वृत्तांत' आणि 'गाथा मुफस्सील' या त्यांच्या दोन कादंबऱ्या माझ्या वाचनात आल्या. त्यांतली एक तर मराठीतही आलेली आहे. 'तिस्तेकाठचा वृत्तांत' असं त्या कादंबरीचं मराठी भाषांतर नगरच्या विलास गीते यांनी केलेलं आहे. तिला साहित्य अकादमीचा पुरस्कारही मिळालेला आहे. साहित्य अकादमीनेच ती मराठीमध्ये प्रकाशित केलेली आहे. आठशे पानांच्या या कादंबरीत तिस्ता नदीच्या काठावर जीवन जगणाऱ्या शेतकऱ्यांचं भेदक चित्रण आलेलं आहे. शेवटी त्या कादंबरीत देबेश रॉय यांनी



लिहिलं आहे, "शेतकऱ्यांच्या या समस्येवर बंगाल सरकारनं काही उपाय शोधून काढला नाही तर हे शेतकरी महाराष्ट्रातल्या शरद जोशी यांच्या शेतकरी चळवळीच्या मार्गानं जातील."

देबेश रॉय यांच्या लेखनातलं द्रष्टेपण मराठीतल्या एकाही कादंबरीकाराने आपल्या लेखनातून अजूनतरी दाखवलेलं नाही.

मराठीतलं आणखी एक उदाहरण थोड्या वेगळ्या प्रकारचं आहे. म. वा. धोंड या लेखकाचं अकादमी पुरस्कार मिळवणारं 'ज्ञानेश्वरीतील लौकिक सृष्टी' नावाचं ज्ञानेश्वरी या ग्रंथाचा वेगळा विचार मांडणारं एक पुस्तक आपणा सर्वांना माहीत आहे. त्या पुस्तकाच्या प्रस्तावनेत म. वा. धोंड यांनी शरद जोशी यांच्या वाचनसखोलतेचा सुंदर उल्लेख केलेला आहे. या पुस्तकातले लेख जेव्हा नियतकालिकातून प्रकाशित होत होते, तेव्हा साहेब विदेशांतच होते. अशा दुर्मीळ विषयावरच्या चिकित्सक लेखावरची प्रतिक्रिया तेव्हा त्यांनी तिथून कळविली होती. तिचा आवर्जून उल्लेख धोंडांनी आपल्या प्रस्तावनेत केलेला आहे. साहेबांच्या वाचन आणि विचारांच्या वेगळेपणाचा धागा आपणाला असा फार मागे नेता येतो.

आमच्या परभणीजवळच्या सेलूचे शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते आणि नेते गोविंद जोशी यांचा एकदा दिल्लीहून फोन आला. त्यांच्यासोबत औरंगाबादच्या विद्यापीठातले मानवेंद्रनाथ काचोळेही होते. त्यांचा फोन आला, तेव्हा मी घरी नव्हतो. मी मोबाईल वापरीत नसल्यामुळे त्यांना तातडीने माझ्याशी संपर्क साधायचे साधन नव्हते. त्यामुळे त्यांनी घरी निरोप ठेवला, की मी घरी पोचताच अमुक एका नंबरवर तातडीने संपर्क करावा. शरद जोशी त्यांना काही बोलू इच्छितात.

मी घरी आल्या आल्या गयानं मला निरोप सांगितला. साहेब आता खासदार झाल्यामुळे दिल्लीलाच राहू लागले. तिथलाच हा फोन नंबर होता. मी फोन लावला, तो त्यांच्या महिला सचिवाने घेतला. साहेब कुणाशी तरी चर्चा करत होते. माझं नाव सांगताच साहेबांनी फोन घेतला. साहेब म्हणाले, "कविराज तुमच्याकडं माझं एक काम आहे. मला एक कल्पना सुचली आहे. त्या कल्पनेवर मला कविता लिहायची आहे; पण मला कविता लिहिता येत नाही. तेव्हा माझी कल्पना आणि तुमची रचना अशी आपण दोघं मिळून एक कविता लिहूयात."

मला ही आव्हानात्मक कल्पना फारच आवडली. मी साहेबांना म्हटलं, "सांगा तुमची काय कल्पना आहे ते." विषय होता शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा.

त्या विषयावर तर मी पुष्कळच कविता लिहिल्या होत्या. 'पेरा' या संग्रहातल्या पुष्कळ कविता आणि 'टाहो' हा अख्खा संग्रह याच विषयावर होता; पण साहेबांची कल्पना थोडी वेगळी होती. साहेबांना संघटनेच्या वतीने गावोगाव रोज प्रार्थना सभा घ्यायची होती. त्यात सर्व पीडित शेतकरी एकत्र येऊन प्रार्थना म्हणतात. त्या प्रार्थनेत कोणताही देव नको. बळीराजा आला तर चालेल. त्या प्रार्थनेचे शब्द असे हवेत, की त्यांतून या शेतकऱ्यांना जगण्याचं बळ प्राप्त व्हावं. मी एक प्रार्थना लिहिली आणि सचिवाने दिलेल्या नंबरवर फॅक्स केली. संध्याकाळी फोन केला. साहेबांनी कविता वाचली होती. ती अशी होती,

*राना माळातल्या देवा*
*ऐक लेकरांचा धावा*
*दुष्ट दुर्जनांचा कावा। नष्ट होवो*
*वेळी पाऊस पडावा*
*हवा तेव्हा उघडावा*
*सुकाळाने दवडावा। दुष्काळ हा*
*घ्यावे लागू नये कर्ज*
*लाचारीचा नको अर्ज*
*खोल मनातला दर्द। नष्ट होवो*

या कवितेत आणखीही काही कडवी होती. साहेब म्हणाले ''कविता म्हणून मला ती आवडली; पण प्रार्थना म्हणून मला आणखी काही वेगळे अपेक्षित आहे. तुम्ही जर आणखी एखादा नमुना लिहू शकलात तर पाहा. नाहीतर ही ठीकच आहे.'' मी आणखी एक कविता लिहिली.

*दु:ख असो जीवघेणे जगत राहू या*
*काळ किती क्रूर कसा तेच पाहू या*
*काय तुझे दु:ख मला सांग वासरा*
*चोच कुठे दुखली ते सांग पाखरा*
*घासातला घास दोघं मिळून खावू या*

अशी आणखी दोन कडवी मी लिहिली होती; पण ही कविता मी साहेबांना फॅक्स केली नाही. कारण माझं मलाच लक्षात आलं, की कविता म्हणून ठीक असली तरी प्रार्थना म्हणून ठीक नाही. शिवाय, प्रार्थना म्हणून दोनही कवितांना मी चुकीचं वृत्त वापरलं होतं; कारण ही प्रार्थना म्हणणार होती गावातली अशिक्षित माणसं. पहिल्या कवितेचे वृत्ततरी त्यांना परिचित असे ग्रांथिक ओवीचे होते. मी



सरळ अभंग हा छंद वापरून पुढील कविता लिहिली. अर्थातच ही साहेबांनी आणि मी अशी दोघांनी मिळून लिहिलेली संयुक्त कविता आहे :

*रात्रिन दिवस। तपत्या उन्हात*
*चिखल काट्यात। राबुनिया*
*आम्ही घेतलेले। पोशिंद्याचे व्रत*
*तरी उपेक्षित। झालो आज*
*साऱ्यांच्या मुखात। भरवून घास*
*आम्हा उपवास। घडताहे*
*द्यावे बळीराजा। जगण्याचे बळ*
*आघाताचे वळ। बुजवून*
*मरायाचे नाही। घेवू आणभाक*
*माझा मला धाक। आहे आता*
*जातील हे दीस। येईल दिवाळी*
*संपेल ही काळी। रात्र उद्या*

('अंतर्नाद' मासिकातून साभार.)

■■

# 'अंगारमळा'विषयी

महापुरुष आत्मचरित्र लिहीत नाहीत. त्यांच्या कामाचा व्यापच असा असतो, की त्यांना त्यातून वेळ मिळणं शक्यच होत नाही. त्यांच्या प्राधान्यक्रमात स्वत:विषयी लिहिणं, बोलणं बसत नाही. 'सत्याचे प्रयोग'सारखे काही अपवाद असले, तरी ते अपवादच असतात. त्यामुळे नियमाला काही बाधा येत नाही.

चाहत्यांची आणि समाजाची गरज म्हणून ही आत्मचरित्राची पोकळी भरून काढण्यासाठी अनेक चरित्रकार पुढे येतात आणि ही गरज पूर्ण करतात; पण त्यांना आत्मचरित्राची सर येणे शक्यच नसते. अशा वेळी त्या महापुरुषांच्या चाहत्यासाठी न लिहिलेले आत्मचरित्र सिद्ध करणे शक्य असते. या महापुरुषांच्या एकूण लेखनातले आत्मचरित्रविषयक धागे गोळा करून, त्यांची वीण करणे शक्य असते. असे प्रयोग जगभर नक्कीच झाले असतील. माझे वाचन मराठीपुरते मर्यादित असल्यामुळे मला मराठीतले असे प्रयोग माहीत आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या लेखनातले असे काही तुकडे गोळा करून, 'माझी आत्मकथा' हे आत्मचरित्र डॉ. शंकरराव खरात यांनी सिद्ध केले होते. विनोबा भावे यांच्या लेखनसागरातले असेच कण गोळा करून, 'प्रेमपथ अहिंसेचा' हे आत्मकथनही असेच सिद्ध झालेले आहे. लता मंगेशकर शांता शेळके यांच्या मदतीनं आत्मकथन लिहिणार होत्या. त्याची पस्तीस वर्षांपूर्वीच मौज प्रकाशनाने जाहिरातही केली होती; पण एका प्रकरणाच्या पुढे हे लेखन सरकले नाही. पुढे ग्रंथालीने 'फुले वेचिता' हे आत्मलेखनपर पुस्तक प्रकाशित केले. त्यात लता मंगेशकर यांनी वेळोवेळी दिलेल्या मुलाखतीवर आधारित लेखन होते. तेही पुस्तक लोकांना पुष्कळ आवडून गेले. दुधाची तहान ताकावर भागवण्याचा हा प्रकार असला; तरी चाहत्यांना दुसरा पर्याय नसल्यामुळे ते हा प्रकार गोड मानून घेतात.





शरद जोशी आत्मचरित्र लिहिणारच नाहीत याची खात्री झाल्यावर श्रीकांत उमरीकर यांनी असाच प्रयोग केला आणि त्यातून 'अंगारमळा' हे पुस्तक जन्माला आले. पाहता पाहता लोकप्रियही झाले. चौदा लेखांच्या या पुस्तकात पहिले पाच लेख आत्मपर, पुढचे पाच लेख व्यक्तिपर व शेवटचे चार लेख वैचारिक स्वरूपाचे आहेत. 'शरद जोशी: व्यक्ती, संघटना आणि विचार' असे या पुस्तकाचे सूत्र आपणाला सांगता येईल. जणू हे या महापुरुषाच्या आत्मचरित्राचे तीन भाग आहेत. शेतकरी संघटना शरद जोशींपासून वेगळी करताच येत नाही आणि विचारही व्यक्तीच्या आत्मचरित्राचाच एक भाग असतात.

हा लेख लिहिण्याच्या निमित्ताने 'अंगारमळा' हे पुस्तक मी तिसऱ्यांदा वाचतो आहे, तरी मला ते पहिल्या वाचनाइतकेच उत्कटपणे झपाटून टाकत आहे. तिसऱ्या वाचनातही या लेखनाची नव्हाळी तिळमात्र कमी झालेली नाही.

ज्या लेखावरून या पुस्तकाला 'अंगारमळा' हे शीर्षक दिलं तो लेख या पुस्तकात पहिल्याच क्रमांकावर आहे. पुस्तकाच्या मलपृष्ठावर दिलेला मजकूर याच लेखातला आहे. शरद जोशी यांचे मलपृष्ठावरील हे उद्‌गार पाहण्याआधी त्यांनी ते उद्‌गार कोणत्या पार्श्वभूमीवर काढले ते आपण आधी पाहू. एका आय.ए.एस. झालेल्या अधिकाऱ्यानं परदेशातील प्रतिष्ठेची, भरपूर पगाराची नोकरी आणि भौतिकदृष्ट्या सुखी असलेली जीवनशैली सोडून भारतीय दारिद्र्याचे मूळ शोधण्यासाठी शेतीचा प्रयोग करताना कुटुंबाची झालेली शोकांतिका भावुक होऊन सुरुवातीला सांगितली आहे; पण हे वास्तव सांगताना त्याला सहानुभूती मिळवण्याचा वास येईल की काय, अशी शंका येताच या टोकाच्या स्वाभिमानी माणसानं पुढील उद्‌गार काढले,

''सभा–भाषणांतून मी केलेल्या त्यागाचा आता उल्लेख केला म्हणजे मला हसू येतं. संघटनेच्या कामात मी काही करुणेच्या प्रेरणेने पडलेलो नाही. कोणा तळागाळातील जनसामान्यांचा उद्धार करण्याची मनिषा ठेवण्याचा उद्धटपणा माझ्याकडे नाही. या कामात मला अपरंपार आनंद मिळतो म्हणून मी हे काम करतो. आजपर्यंत हजारो शेतकरी आंदोलनांत तुरुंगात गेले. कित्येकांनी लाठ्या खाल्ल्या. निपाणी भागात गेलो तर डझनभर शेतकरी लाठ्या–गोळ्यांनी हातपाय गेलेले, कुबड्या खाड्‌खाड् वाजवीत भेटायला येतात. बावीस घरांतली तरुण

कर्ती माणसं पोलिसांच्या गोळीबाराला बळी पडली आहेत. एवढं होऊनसुद्धा या कामात मला आनंद वाटतो. मग त्याग कसला? उलट माझ्याइतकं भाग्यवान कोण? त्याग काय आजपर्यंत थोड्यांनी केला? अनेकांची बलिदानं व्यर्थ गेली. त्यांच्या नजरेला काहीसुद्धा फळ पडलं नाही. मी शेतकऱ्यांच्या ना जातीचा, ना पातीचा, ना पेशाचा. देशभरातील शेतकऱ्यांनी मला जे प्रेम दिले त्याला तोड नाही.''

आपलं छोटं कुटुंब उद्ध्वस्त झाल्याच्या दु:खात रमण्यापेक्षा आपण विश्वकुटूंबीय झालो याचं सुख शरद जोशी मानत असले आणि स्वत:च्या त्यागाला नाकारत असले; तरी ती त्यांची बाजू झाली. आपल्या बाजूनं मात्र तो त्यागच आहे. हजारो शेतकऱ्यांनी दिलेलं प्रेम आणि त्यांनी केलेल्या त्यागाची आठवण होताच, शरद जोशी यांना आपला त्याग नगण्य वाटतो, हा त्यांच्या कृतज्ञ स्वभावाचा भाग झाला; तरी आपल्यासाठी शेतकरी आणि शेतकऱ्यांच्या नेत्याचा असे दोनही त्याग त्यागच आहेत आणि वंदनीय आहेत.

पुणे जिल्ह्यातील चाकणजवळ आंबेठाण या गावी जमीन घेऊन, तिथं सुरू केलेल्या कोरडवाहू शेतीतले जिव्हारी लागणारे अनुभव आणि त्यातून मिळालेल्या धड्यातून झालेली शेतकरी आंदोलनाची सुरुवात हा लेख शरद जोशी यांनी साप्ताहिक 'ग्यानबा'मध्ये १२ सप्टेंबर १९८८ च्या अंकात लिहिलेला आहे. या पुस्तकातल्या सर्वच लेखांच्या शेवटी त्या लेखांच्या प्रथम प्रकाशनाचे तपशील दिल्यामुळे संदर्भमूल्य प्राप्त झालेले आहे.

आधीच्या शरद जोशींविषयी या पुस्तकात फारशी काही माहिती मिळत नाही. प्रत्यक्ष कोरडवाहू शेतीच्या प्रयोगापासूनच या पुस्तकाला सुरवात होते. तसा एखादा लेख त्यांनी लिहावा असे सुचवले तेव्हा शरद जोशी स्वत: म्हणाले, ''विजय परुळकरांच्या 'योद्धा शेतकरी' पुस्तकातलं 'कालचा शरद जोशी' हे प्रकरण जोडलं, की पुस्तकाला आपोआपच पूर्णत्त्व येईल.'' त्या पुस्तकाचे लेखक विजय परुळकर असले तरी वरील लेख मात्र शरद जोशी यांच्याच शब्दांत आलेला आहे. त्यामुळे शरद जोशी यांनी लिहिलेल्या पुस्तकात दुसऱ्या लेखकाचे प्रकरण घुसडले असेही होणार नाही. प्रकाशक श्रीकांत उमरीकर यांनी पुढील आवृत्तीत आवर्जून या प्रकरणाचा समावेश करावा व पुस्तकाला पूर्णत्व आणावे.

१९८० च्या दरम्यान शेतकरी संघटनेला सुरुवात झाली आणि पुढच्या साताठ वर्षांत ती वाऱ्यासारखी पूर्ण देशात पसरली. त्यामुळं अनेकांची धाबी



दणाणली. आता या संघटनेला आवरायचं कसं? असा एक जटिल प्रश्न त्यांच्या समोर उभा राहिला. भारतीय जनमानसाची मानसिकता लक्षात घेऊन, काहींनी त्यावर नामी उपाय शोधला. ते म्हणाले, ''शरद जोशी या ब्राह्मणाला शेतीतलं काय कळतं?''

या प्रश्नाचं उत्तर शरद जोशींनी देण्याचं काही कारण नव्हतं. ते त्यांचं नेतृत्व मान्य करणाऱ्यांनी आपोआपच दिलं होतं. तरी त्यावर लेख, अग्रलेख आणि भाषणं झडली. 'अंगारमळ्या'तला दुसऱ्या क्रमांकाचा लेख त्याच संदर्भातला आहे. त्याचं शीर्षकच मुळात 'माझ्या ब्राह्मण्याची गाथा' असं आहे. २६ सप्टेंबर १९८८ च्या साप्ताहिक 'ग्यानबा'च्या अंकात तो प्रकाशित झालेला आहे.

वृत्तीने धार्मिक असले, तरी ब्राह्मण्याचा अहंकार नसलेले वडील आणि पंढरपूरची असूनही बडव्यांच्या वर्तनाबद्दल घृणा असलेली आई; अशा आईवडिलांच्या पोटी आपला जन्म झाल्याचा शरद जोशी यांना अभिमान वाटतो. 'जन्माच्या अपघाताने आपल्याला जे जे मिळाले असेल, ते अती कनिष्ठ आहे, असे समजून विचाराची सुरुवात करायची आणि जेथे सज्जड पुरावा मिळेल तेथेच आणि त्या पुराव्याने सिद्ध होईल तेवढेच, जन्मसिद्ध गोष्टींचे बरेपण मान्य करायचे. अशी शिस्त मी बाणवून घेतली.' असा आत्मसाक्षात्कार जोशी यांना वयाच्या अवघ्या बाराव्या वर्षीच झाला. त्यांचे विचार शुद्ध राखण्यात या साक्षात्काराचा त्यांना प्रचंड उपयोग झाला.

''कुणी पुढारी मला गोडशांची अवलाद म्हणतो, कुणी मला फक्त पिढीजात भिक्षुकीचाच व्यवसाय चालू ठेवण्याचा सल्ला देतो. याउलट, काही ब्राह्मण व्यक्ती, संस्था आणि पक्ष यांना मनातून माझ्याविषयी विनाकारण आपुलकी वाटते. मी त्यांच्यापासून किती योजने दूर आहे याची कल्पना करण्याची कुवत त्या बापड्यांत नसते'' असे जेव्हा शरद जोशी म्हणतात तेव्हा त्यांच्यातल्या निरपेक्ष विचारवंताची साक्ष पटल्याशिवाय राहत नाही.

चक्रधर स्वामींच्या सूत्रपाठातल्या सूत्रांसारखी त्यांची काही वाक्यं असतात. त्यांच्या समग्र लेखनातून अशी सूत्रे शोधून, त्याची गुंफण केली तर एक नवा सूत्रपाठच तयार होवू शकतो. कोण केशीराज बांस त्यासाठी पुढे येतो त्याची वाट पाहायची!

'इति एकाध्याय' हा या पुस्तकातला तिसऱ्या क्रमांकावरचा लेख शरद जोशी यांनी आपल्या आईच्या मृत्यूविषयी लिहिलेला लेख आहे. मधून मधून पूर्व

आठवणी आल्यामुळे ते आईचं व्यक्तिचित्रही झालेलं आहे. वयाच्या ऐंशिव्या वर्षी स्वयंपाक करताना पदर पेटून झालेल्या अपघातात मृत्यूशी झुंजणारी आई आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी झुंजताना देशभर फिरणारे शरद जोशी. आंदोलन आणि आई असं दोन्ही ठिकाणी सारखंच गुंतलेलं चित्त. त्यातून होणारी ओढाताण आणि धावपळ याचा या लेखातून आलेला आलेख मोठा रहस्यपूर्ण वाटतो. शरद जोशी यांच्या कुटुंबाचं समग्र दर्शनही इथे वाचकांना प्रथमच होतं. त्यांच्या बहिणी, त्यांचे भाऊ, त्यांच्या मुली यांची नावं आणि थोडीफार पार्श्वभूमीही वाचकांना समजते. हा या लेखाचा सहजपणे होणारा अधिकचा फायदा.

आईवरचं लेखन कुणाही मुलाकडून उत्कटच होतं; पण तो मुलगा जर अलौकिक असेल तर त्याचं लेखनही अलौकिक होणार. म्हणून हे लेखन उत्कट तर झालेलं आहेच; पण ते अलौकिकही झालेलं आहे. इच्छामरणाविषयी दोघा मायलेकरांचा इथला संवाद इतका तर्ककठोर आहे, की शंकराचार्यांची आठवण झाल्याशिवाय राहत नाही. म्हणूनच या लेखाच्या संदर्भात कै.अरविंद वामन कुलकर्णी यांनी शरद जोशी यांची शंकराचार्यांशी तुलना केलेली होती, त्याची आठवण इथे होते.

माझ्या वाचनात तरी आईवरचं असं उत्कट आणि अलौकिक लेखन आलेलं नाही. आईवरच्या आजवरच्या लेखनात शोभूनच नव्हे तर उठून दिसणारे हे लेखन प्रत्येकाने वाचायलाच हवे.

शरद जोशी यांच्या आई कविता लिहीत होत्या आणि त्यांचा संग्रह प्रकाशित व्हावा अशी त्यांची इच्छा होती; पण तो त्यांच्या मृत्यूपर्यंत तरी झाला नाही. नंतरही कुणी तसा प्रयत्न केला नाही. हा लेख वाचला तेव्हा मी मुद्दाम त्या कवितांची चौकशी केली; तर त्या कविता उपलब्ध असल्याचा शोध लागला. त्या कवितांचं पुस्तक प्रकाशित करण्याच्या दृष्टीनं मी जनशक्ती वाचक चळवळीला कामाला लावलेलं आहे. त्या कवितांमध्ये काही वाङ्मयीन गुणवत्ता असो किंवा नसो; पण त्या शरद जोशी यांच्या आईंच्या कविता आहेत. शरद जोशी यांच्या प्रतिभेची जनुकं शोधताना त्यांचा उपयोग नक्कीच होणार आहे.

'मुहूर्तम्ः ज्वलितम् श्रेयम्' या लेखात १९९८ च्या डिसेंबर महिन्यात शरद जोशी यांना आलेल्या तिसऱ्या हृदयविकाराच्या झटक्याच्या वेळी केलेल्या ऑपरेशनचा वृत्तांत आहे. त्यात प्रकृतीविषयी चिंतन आहे. घडलेल्या घटनांचा आणि आधीच्या दोनदा आलेल्या हृदयविकाराच्या झटक्याचा उल्लेख आहे.



नेहमीप्रमाणं प्रगल्भ वाचनाचे प्रासंगिक संदर्भ आहेत. या आजारात शरद जोशी यांचे भाऊ सांगतात, की आम्ही रक्ताचे नातेवाईक असलो तरी तुझे खरे नातेवाईक हे बिल्लाधारीच आहेत. रक्ताच्या नातेवाइकाआधी ते हॉस्पिटलमध्ये जमा झालेले आहेत. रक्ताची गरज पडते तेव्हा ते देण्यासाठी स्पर्धा लागते. ज्यांचं रक्त नाकारलं, त्यांना रडू कोसळतं. शरद जोशी आजारातून उठल्यावर प्रकृतीपेक्षा आंदोलनाची काळजी करतात. स्वतःला झोकून देतात; आणि प्रकृती सुधारत जाते. तेव्हा त्यांना वाटतं, आंदोलन हेच आपलं खरं औषध आहे; आणि ते खरंही आहे.

'माझी शिक्षणगाथा' आणि 'विद्या नामे अविद्येचा शिक्षक' या लेखांत शरद जोशी यांनी आपला शिक्षणप्रवास आणि अगदी थोड्या दिवसांपुरता केलेला अध्यापनाचा प्रवास मांडलेला आहे. ''आवडणाऱ्या गोष्टी कोणीही करेल; करावी लागणारी गोष्ट आवडीने करणे यात पुरुषार्थ आहे.'' चिंतामणराव देशमुख या आपल्या आयुष्यातल्या हीरोचे वरील वाक्य वाचून, अत्यंत आवडणारा संस्कृत हा विषय सोडून, अट्टहासाने अर्थशास्त्र हा विषय घेवून, त्यात कसा गड गाठला ते पाहावयास मिळते. गंगाधर गाडगीळ, पु.शि. रेगे, डॉ. एस.के. मुरंजन अशी दिग्गज मंडळी शिकवायला असलेल्या सिडनेहॅममध्ये शरद जोशी अर्थशास्त्र शिकले.

नाणेव्यवस्थेवरील जागतिक दर्जाचे विचार मराठीत का लिहिले असे कुणी एस.के. मुरंजन यांना विचारले तेव्हा, ''ज्यांना या विषयाचा इतका उच्च अभ्यास करावयाचा आहे त्यांनी मराठी शिकायला काय हरकत आहे,'' असं उत्तर ते देतात. या वाक्याचा शरद जोशी यांच्या आयुष्यावर पुढे पुष्कळ प्रभाव असल्याचे आपणाला दिसून येते. पु. शि. रेगे यांच्यासारखा कवी वाहतुकीचे अर्थशास्त्र शिकवित असे असा एक गमतीदार तपशील इथे वाचायला मिळतो.

शंकरराव वाघ, बाबूलाल परदेशी आणि शेवाळेगुरूजी या शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांची व्यक्तिचित्रे काळजाला हात घालणारी आहेत. मुळात हे तीनही मृत्यूलेख आहेत. आपल्या चळवळीतल्या कार्यकर्त्यांची व्यक्तिचित्रे लिहिण्याइतपत वेळ आणि हौस शरद जोशी यांच्याजवळ असणं शक्यच नाही. त्या त्या कार्यकर्त्यांच्या मृत्यूनंतर न राहवून, त्यांच्या विषयीच्या भावना व संघटनेला त्यांनी दिलेलं योगदान यांची नोंद जोशी इथे घेतात. 'शेतकरी संघटक' या हाती असलेल्या पाक्षिकातून त्यांनी हे मृत्युलेख लिहिलेले आहेत. या प्रत्येक लेखाला मृत्यूचा संदर्भ असल्यामुळे मुळातच तिथे कारुण्य उपस्थित आहे. आईच्या

मृत्यूनेही न हललेले शरद जोशी इथे हलून गेलेले दिसतात. भावुक होतात. त्यांच्या भावुक होण्यामागे एक अपराधभावही आहे. पूर्णवेळ संघटनेचं काम करणाऱ्यांच्या पोटापाण्याची काहीही व्यवस्था आपण करू शकलो नाही आणि तशी अपेक्षा न करता, ही माणसं संघटनेमागं पहाडासारखी उभी राहिली. त्यांनी कुटुंबाला वाऱ्यावर सोडलं. घरं उद्ध्वस्त झाली. या सगळ्याला आपणच कारणीभूत आहोत असा स्पष्ट अपराधभाव या लेखांतून व्यक्त झालेला आहे.

व्यक्तिचित्र म्हणून या लेखांची वाङ्‌मयीन गुणवत्ता तर आणखीच वरची आहे. त्या त्या व्यक्तीची नेमकी स्वभाववैशिष्ट्ये आणि त्यांचं संघटनेतलं योगदान याची नेमकी नोंद करायला जोशी इथे मुळीच विसरत नाहीत. अशी आणखी काही व्यक्तिचित्रे त्यांनी लिहायला हवीत असे सारखे वाटत राहते. त्यातून आपोआपच संघटनेच्या इतिहासाचीही जुळणी होईल. शरद जोशी यांच्याकडून अपेक्षित असलेली आणि अपूर्ण राहिलेली ही इच्छा अनंतराव उमरीकर यांनी 'वेडेपीर'मध्ये कार्यकर्त्यांची व्यक्तिचित्रे रेखाटून तितक्याच ताकदीने पूर्ण केली याचे समाधान वाटते.

पुढची तीन व्यक्तिचित्रे अर्थातच तेही मृत्युलेख आहेत; पण ती संघटनेच्या कार्यकर्त्यांची नव्हेत. सुप्रसिद्ध विदुषी दुर्गाबाई भागवत, ज्ञानेश्वर विद्यापीठाचे संस्थापक मनोहर आपटे आणि कामगार चळवळीचे नेते डॉ. दत्ता सामंत यांच्याशी वेगवेगळ्या निमित्तांनी शरद जोशी यांचा संबंध आला आणि मैत्र जुळले. त्याचेच काही धागे इथे उलगडण्यात आले आहेत. शरद जोशी महाविद्यालयात शिकत असताना एका कार्यक्रमाला दुर्गाबाईंना बोलावतात त्या प्रसंगाचे शब्दचित्र त्यांनी तीस-चाळीस वर्षांनंतर तपशीलवार दिलेले आहे. डॉ. दत्ता सामंत हे कामगार चळवळीतले झोतातले नाव. सामंत आणि जोशी यांनी एकत्र कामही केले. त्या काळातल्या सविस्तर आठवणी या लेखात आलेल्या आहेत.

पुस्तकाचा इथून पुढचा भाग हा ललित लेखनाचा नाही. तो वैचारिक लेखनाचा आहे; पण हे सर्व वैचारिक लेखन लालित्याच्या अंगाने झालेले असल्यामुळे ते या पुस्तकात शोभून दिसते.

१९८५ मध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांस लिहिलेलं पत्र या पुस्तकात घेण्यात आलेलं आहे. अवघ्या पाच पानांचं हे पत्र अत्यंत प्रभावी असून, शिक्षणासाठी शहरात गेलेल्या प्रत्येक विद्यार्थ्याच्या हाती ते पडायलाच हवे. त्यात खेड्यातल्या विद्यार्थ्यांना जी एक जाणीव देण्यात आलेली आहे, ती संस्कारक्षम विद्यार्थ्यांचं जीवन घडवणारी आहे. हे पत्र प्रकाशित झालं आणि माझ्या वाचनात आलं,



तेव्हा मी नेमका औरंगाबादेत शिकायला गेलेलो होतो. माझ्या मनातल्या भावनांना इथं इतक्या नेमकेपणानं शब्दांकित करण्यात आलं होतं, की आम्ही हे पत्र आमच्या खोलीत लावून टाकलं. त्याचा माझ्या मनावर खोल परिणाम झालेला आहे. माझ्या कविता मी पुन्हा वाचू लागलो, तर मला त्यात पडलेले या पत्राचे पडसाद पाहावयास मिळतात. उदाहरण म्हणून या पत्रातला एक उतारा आणि शेतकऱ्याच्या आत्महत्येवरची माझी एक कविता समोर देतो,

'आजची तुझी स्थिती सीतेच्या शोधासाठी गेलेल्या हनुमानासारखी आहे. लंकेचे वैभव, प्रासाद, तलाव, बागबगिचे पाहून हनुमानही विस्मयचकित झाला; पण त्या भिकारड्या रामाची कसली भक्ती करता, या रावणाच्या अजिंक्य, महाबलाढ्य, सुखसमृद्ध ऐश्वर्याचा उपभोग घेऊ, असा विचार त्याच्या मनाला शिवलाही नाही. अशोकवनातील विरही, दुःखी सीतेचा शोध त्याने चालू ठेवला; म्हणून रामायण घडले.

आज भूमिकन्या सीता पुन्हा वनवासात आहे. आम्ही भूमिपुत्र तिच्या विमोचनाच्या कामाला लागणार का लंकेश्वर रावणाच्या वैभवाचे वाटेकरी व्हायला बघणार? हा प्रश्न तुझ्याकडे ठेवण्यासाठी हा पत्राचा प्रपंच.'

आणि आता माझी ही कविता,

**तिन्ही त्रिकाळ घास घेताना**
**पिकवणाराची ज्यांना आठवण येत नाही**
**ते शहरातले दुस्मान**

**आणि सीतेच्या शोधासाठी पाठवलेले**
**पण रावणाच्या लंकेतच रमलेले**
**आपल्याच पोटचे हनुमान**

**लाखभर कुणबी विधवांचे**
**कुंकू पुसणारे हे हात**
**कुणाला मारावी हाक आपले म्हणून**

'अंगारमळा'मधील शेवटच्या तीन लेखांत शरद जोशी यांनी आपली वाङ्‌मयीन व सामाजिक भूमिका मांडलेली आहे. त्याविषयी मी अन्यत्र लिहिल्यामुळे इथे त्याची पुनरावृत्ती करीत नाही.

■■

# शेतकऱ्यांचा राजा शिवाजी : एक टिपण

'शेतकऱ्यांचा राजा शिवाजी' या पुस्तकात लहान-मोठ्या चार पुस्तिकांचा समावेश आहे. 'शेतकऱ्यांचा राजा शिवाजी' ही पहिली पुस्तिका ऐंशी पानांची आहे. 'शेतकऱ्याचा असूड : शतकाचा मुजरा' ही पुस्तिका चाळीस पानांची आहे. 'शेतकरी कामगार पक्ष : एक अवलोकन' ही तिसरी पुस्तिका तीस पानांची आहे. 'जातीयवादाचा भस्मासुर' ही चौथी आणि शेवटची पुस्तिका पन्नास पानांची आहे. चारही पुस्तिकांतला मिळून मजकुराचा ऐवज दोनशे पानांचा आहे. १९८४ ते १९९० असे सहा वर्षांच्या कालखंडात हे लेखन प्रकाशित झाले आहे. आता हे लेखन प्रकाशित होऊन पंचवीस वर्षांचा कालखंड लोटला आहे. यातले सर्वांत आधी प्रकाशित झाले ते, 'शेतकऱ्याचा असूड : शतकाचा मुजरा'. 'शेतकऱ्याच्या असूड'ला प्रकाशित होऊन तेव्हा शंभर वर्षे झाली होती. आता महात्मा फुले यांचा शेतकऱ्यांचा असूड हा मूळ ग्रंथ सव्वाशे वर्षांचा झालेला आहे.

या चारही पुस्तिकांत आणि शरद जोशी या लेखकाच्या सर्वच लेखनात जगाकडं पाहण्याचा एक स्वतंत्र दृष्टिकोन दिसून येतो. शेतीकेंद्रित अर्थवादी दृष्टिकोन असे त्याचे स्वरूप आहे. शेतकऱ्यांच्या शोषणाच्या दृष्टिकोनातून इतिहास तपासणे, सामाजिक समस्यांची मुळे शोधणे, राजकारणाचे विश्लेषण करणे आणि एकूण सगळ्यांची मानसिकता याच दृष्टिकोनातून तपासणे हे या सर्वच लेखनाचे मुख्य समान सूत्र आहे. आपला मुद्दा शुद्ध तात्त्विक, तार्किक पद्धतीने आणि आवश्यक तेवढ्या पुराव्यांसह, उदाहरणांसह मांडणे हेही या लेखनाचे प्रमुख वैशिष्ट्य आहे.

सार्वजनिक जीवनात वावरणारं, सतत सभा, आंदोलनं, चळवळी करूनही इतका व्यासंग करणारं व्यक्तिमत्त्व सध्यातरी अपवादात्मकच म्हणावं लागेल. हे






लेखन वाचताना लेखकानं किती जाणकारीनं, किती विविध स्वरूपाचं वाचन केलेलं आहे ते आपल्या लक्षात येतं. समोर घेतलेल्या विषयाला पूरक अशी कितीतरी पुस्तकं वाचून, लेखकानं आपल्या वर्ण्य विषयाचा समग्र धांडोळा घेतला आहे ते सहज कळतं. आपण वाचलेला, आपणाला माहीत असलेला जुन्याच परिचित घटनांचा नवा, अपरिचित अन्वय इथे पाहावयास मिळतो. आपणाला नवेच काहीतरी कळाल्याचे समाधान मिळते. हे लेखन वाचताना आपण समृद्ध होत चालल्याचा अनुभव येतो.

शेतकऱ्यांचा राजा शिवाजी या पुस्तिकेत काही केवळ शिवाजी एवढाच विषय आलेला नाही. शेती, शेतकरी आणि राजा यांच्या परस्परसंबंधांचा अगदी बळीराजापासून सर्वच इतिहास शेतीशोषणाच्या नव्या दृष्टिकोनातून इथे मांडलेला आहे. बळी आणि शिवाजी या दोन राजांशिवाय शेतकऱ्यांचा कैवारी पाच हजार वर्षांच्या ज्ञात इतिहासात शोधूनही तिसरा सापडत नाही, असे ठाम विवेचन इथे लेखक करतो. शेतीचे शोषण करणारे राजे आणि त्यांचा शेतीशोषणाचा इतिहासही इथे आलेला आहे. संपत्तीचे उत्पादक शेतकरी सोडून, शेतीचे शोषक भामटे चोर सरदार, जहागीरदार आणि राजे यांचाच इतिहास लिहिला जातो, असे लेखकाचे मत आहे, त्याचे सविस्तर विवेचन इथे येते. पहिल्या पाच प्रकरणांत आणि निम्म्या पृष्ठसंख्येत शेती शोषणाचा हा पूर्वेतिहास आलेला आहे. त्यामुळे वाचकाच्या मनात एक पार्श्वभूमी तयार होते. या पार्श्वभूमीवर शिवाजीची प्रतिमा न्याहाळली, की ती अधिकच गडद होते आणि आपल्या मनावर ठसते.

दादोजी कोंडदेव यांच्या संस्कारात शिवाजीची जडणघडण झाली या वाक्याला फार महत्त्व देण्याचे कारण नाही असे स्पष्ट मत या लेखनात वीस वर्षांपूर्वीच येऊन गेलेले आहे. दादोजी कोंडदेवांच्या शेतीशोषणाच्या विरोधी शेतकऱ्यांच्या बाजूचा विचार इथे पुराव्यासह मांडला आहे. शिवाजीच्या आयुष्यातील सर्वच घटनांचा शेतीपोषक विचार करताना निघणारा अन्वयार्थ शिवाजीची वेगळी प्रतिमा आपल्या मनात निर्माण करून जातो. शिवाजीच्या धार्मिक व स्त्रीविषयक दृष्टिकोनाची लेखकाने इथे केलेली मांडणी मुळातून वाचण्यासारखी आहे.

शिवाजीराजांचा मिर्झा राजे जयसिंगांना शरण जाण्यापाठीमागचा शेतीपोषक विचारही आपणाला इतिहासाचा नवा अन्वयार्थ देऊन जातो. आजच्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर लेखक जेव्हा 'इडा पिडा टळो, शिवाचे राज्य येवो' असे म्हणतो, तेव्हा त्याचे विविध तरंग आणि नंतरचे विपर्यास आपल्या डोळ्यांसमोरून सरकतात.

या संचातली दुसरी पुस्तिका 'शेतकऱ्यांचा असूड : शतकाचा मुजरा' ही आहे. या पुस्तिकेतल्या लेखनाचे निमित्त जरी महात्मा फुले यांची एक पुस्तिका असले; तरी या लेखनात एकूणच फुलेवादाची चिकित्सा लेखकाने केलेली आहे. आपल्या स्वतंत्र दृष्टिकोनातून लेखकाने इथे फुलेवाद मांडून दाखवलेला आहे. जोतिबांचे काही तपशील लेखकाला मान्य नसले तरी जोतीबांच्या विचारांचा गाभा त्याला पटलेला आहे. म्हणूनच जोतीबांच्या विचारांचे वेगळेपण इथे ठसठशीतपणे मांडण्यात आलेले आहे. शरद जोशी या लेखकाचा जोतिबांच्या विचारगाभ्यावर पूर्ण विश्वास आहे.

''जोतीबांवर हल्ला चढविणारे आणि त्यांचे समर्थन करणारे या दोघांचीही शेतकऱ्यांचे शोषण आणि त्याचा इतिहास या विषयावरील मते एकसारखीच आहेत आणि विशेष दुःखाची गोष्ट ही, की दोघांचीही मते जोतीबांनी मांडलेल्या विचाराच्या पूर्ण विरोधी आहेत.''

पुस्तकाच्या सुरुवातीलाच वरील विधान करून, लेखकाने आपल्या विचारांची दिशा स्पष्ट केलेली आहे. जोतीबांनी भारताच्या पाच हजार वर्षांच्या इतिहासाची जी पुनर्मांडणी करून दाखवलेली आहे ती लेखकाला फार आवडलेली दिसते. जोतीबांच्या तुलनेत चिपळूणकर यांचे इतिहासभान कसे तोकडे आणि चुकीचे आहे, ते लेखकाने खुलेपणाने मान्य करून टाकलेले आहे. जोतीबांनी इतिहासाची जी पुनर्मांडणी केली, त्यातल्या विधानांना पुरावा काय? असा प्रश्न विचारणारांना वेदपुराणांतल्या भाकडकथांना तरी कुठे पुरावा आहे? असा सडेतोड युक्तिवाद लेखकाने समोर केलेला आहे.

महात्मा फुले यांची ब्राह्मण्याची चिकित्सा लेखकाने मान्यच करून टाकलेली आहे. ब्राह्मणांनी स्वतःची बाजू भक्कम करण्यासाठी चुकीचा आणि स्वतःच्या सोयीचा इतिहास लिहून ठेवला हेही लेखकाला मान्य आहे. जोतीबांच्या विधानाची योग्यता पुराव्यासह इथे दाखवून दिलेली आहे.

आतापर्यंतच्या फुलेअभ्यासकांपैकी कुणाची उंची राज्याएवढी तर कुणाची देशाएवढी होती. शरद जोशी या अभ्यासकाची उंची जागतिक दर्जाची असल्यामुळे



या लेखनाचा दर्जा आपोआपच उंचावला आहे. त्याला एका जागतिक विचारव्यूहाचे परिमाण प्राप्त झालेले आहे.

भारतातील विवक्षित परिस्थितीच्या जोतीबांवर पडलेल्या मर्यादा आणि भूमीशी नाते नसल्यामुळे मार्क्सवर पडलेल्या मर्यादा टाळून आज आपण शेतकरी संघटनेची उभारणी केलेली आहे, असे लेखक सांगतो. मार्क्सची तत्त्वज्ञानाची बैठक आणि महात्मा फुले यांचे जमीनीशी असलेले नाते स्वीकारून संघटना पुढे जात आहे, असेही लेखक सांगतो.

महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांच्या शोषणाचे दुष्टचक्र सांगणारे एक सूत्र मांडून दाखवले होते. ते सूत्र आपणा सर्वांना परिचितच आहे,

***विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली***
***नीतीविना गति गेली! गतीविना वित्त गेले***
***वित्ताविना शूद्र खचले***
***इतके सगळे अनर्थ एका अविद्येने केले.***

याच सूत्राची परिणती काळानुरूप दुसऱ्या एका सूत्रात झाली. ते नवे सूत्र शेतकरी संघटनेने मांडून दाखवले,

***पेरलं तर उगवत नाही***
***उगवलं तर पिकत नाही***
***पिकलं तर विकत नाही***
***विकलं तर भाव येत नाही***
***भाव आला तर कर्ज फिटत नाही***
***कर्ज फिटलं तर खायला काही शिल्लक राहात नाही.***

राजा शिवाजीनंतर महात्मा जोतीबा फुले आणि नंतर शेतकरी संघटना असा हा सलग इतिहास मागच्या दोन पुस्तिकांमधून पाहावयास मिळतो. या संचातली तिसरी पुस्तिका 'शेतकरी कामगार पक्ष : एक अवलोकन' या नावाची आहे. शेतीमालाला उत्पादनखर्चावर आधारित रास्त भावाची शेतकरी संघटनेची मुख्य मागणी ही संघटनेच्या आधी आपण केली असे शेकाप सांगतो. त्याला उत्तर देण्यासाठीच कदाचित लेखकाने ही पुस्तिका लिहिली असावी.

संघटनेआधी शेकापने अशा स्वरूपाची स्पष्ट मागणी कधीच केली नाही आणि केली तेव्हा कशी भोंगळ स्वरूपाची केली याचे पुराव्यासह विवेचन इथे येते. शरद जोशी या लेखकाच्या प्रकृतीनुसार तो एकच धागा घेऊन, चिकित्सा कधी करीत नाही. आपल्या चिकित्सेला परिपूर्णता यावी म्हणून सामग्र्याने

विचार हे या लेखनाचे वैशिष्ट्य आहे. इथे शेकापच्या संपूर्ण ध्येयधोरणांचीही चिकित्सा लेखक करतो.

शेकापने सुरवातीपासूनच मार्क्सवादाऐवजी फुलेवाद स्वीकारला असता, तर ते जास्त सयुक्तिक झाले असते, असे लेखक लिहितो. शेकापने फुले का स्वीकारला नाही, ते सांगताना लेखकाने जे कारण पुढे केलेले आहे ते शेकापला सरळ सरळ जातीयवादी ठरवणारे आहे. शेकापचे लोक इतके उथळ जातीयवादी असतील असे वाटत नाही. अर्थात यातली कुठलीच बाजू मला अनुभवाने आणि ठामपणे सिद्ध करता येणार नाही.

शेकापच्या शेतकरीविषयक भूमिकेचे परीक्षण हाच या पुस्तिकेच्या लेखनामागचा मूळ हेतू आहे. शरद जोशी यांच्यावर खालच्या पातळीवर जाऊन, शेकापच्या अधिवेशनात आरोप करण्यात आल्याचा पुसटसा उल्लेख येतो. त्याला उत्तर देण्याच्या भानगडीत लेखक पडल्याचे दिसत नाही. बौद्धिक पातळीवर तात्त्विक समाचार घेण्याचा सुसंस्कृतपणा लेखकाने इथे दाखवला आहे. या पुस्तिकेतल्या आक्षेपांवर शेकाच्या लोकांचे काय उत्तर होते समजायला मार्ग नाही; पण वाचकांच्या मनात ती उत्सुकता निर्माण होते.

'जातीयवादाचा भस्मासुर' ही या संचातली शेवटची पुस्तिका आहे. जातीयवादाचा भस्मासुर शोषकांना पोषक असतो, असे या लेखनाचे मुख्य सूत्र आहे. ग्रामीण भागात होणाऱ्या सर्व दंगलींमागे शेतीचे शोषणच आहे, असा विचार इथे येतो, किंबहुना शहरातल्या दंग्यांमागेही आर्थिक शोषणच असते, असे लेखक मांडतो. अर्थवादी चळवळींना शूद्रवाद्यांचा नेहमीच धोका असतो, असे लेखकाचे ठाम मत आहे. तत्कालीन सर्वच दंग्यांचे इथे करण्यात आलेले विश्लेषण, की अर्थवादी चळवळीच्या पराभवासाठी दंगे करण्यांत येतात, हे आपणाला पटत जाते.

२९ फेब्रुवारी १९८७ रोजी नांदेड लोकसभा निवडणुकीत प्रकाश आंबेडकर यांच्या प्रचारासाठी शरद जोशी यांनी केलेलं भाषण तर 'मास्टरपीस' आहे. पुन्हा पुन्हा वाचावे असे आहे. या भाषणाच्या शेवटी शरद जोशी म्हणतात, ''शेतकरी संघटनेच्या सगळ्या कार्यकर्त्यांना आणि शेतकऱ्यांना मी हात जोडून विनंती करतो, या जातीयवादी प्रचाराला बळी पडू नका. जो शेतकरी जातीच्या कारणाकरिता मते देईल तो शेतकरी संघटनेचाही घात करील आणि स्वतःचाही घात केल्याशिवाय राहणार नाही.'' खेड्यापाड्यांतल्या शेतकऱ्यांनी ही कळकळीची विनंती न ऐकता पुढं चालून हे राज्यच शरद जोशी ज्यांना जातीयवादी भगवी



गिधाडं म्हणत असत, त्यांच्या हातात दिले.

शरद जोशी यांचे हे लेखन वाचताना काही गोष्टी खटकतात, आपणाला पटत नाहीत; पण एखाद्या माणसावर प्रेम करण्यासाठी त्याच्या सर्वच गोष्टी आपणाला आवडल्याच पाहिजेत असे नाही. आवडणाऱ्या गोष्टींचे प्रमाण जास्त असले, की ते नावडणाऱ्या गोष्टींवर मात करते. शरद जोशी हा माणूस त्याने व्यक्त केलेले विचार आणि त्याने उभी केलेली संघटना यांविषयी आपल्या मनात ज्या शंका उभ्या राहतात, त्यांची उत्तरे या माणसाने आपल्या लेखनात जागोजाग पेरून ठेवलेली आहेत. त्यांतली काही वेचून, मी ती आपल्यासमोर ठेवतो म्हणजे मूळ शंकाही तुमच्या लक्षात येतील.

''मी हिंदू घरात जन्मलो, ब्राह्मण जातीत जन्मलो. आयुष्यातली पहिली अठरा-वीस वर्षे सगळे धर्माचार केले, स्नानसंध्यादी विधी केले. पाठांतर केले. आज मी यातले काहीही करत नाही. विश्वाच्या उत्पत्तीसाठी, जीवमात्रांच्या उत्क्रांतीसाठी आणि मनुष्यसमाजाच्या विकासासाठी कोणी परमेश्वरी शक्ती असण्याची मला शक्यताही दिसत नाही आणि आवश्यकताही दिसत नाही. काही समजले असे आज वाटते, उद्या कदाचित आज समजलेले सारेच चूक आहे असे ध्यानात येईल, तर तेही मानायची माझी तयारी आहे. प्रत्यक्ष अनुभवाने, क्षणाक्षणाने आणि कणाकणाने जग समजण्याची पराकाष्ठा करणारा मी एक यात्रिक आहे.

''माझ्यासारखा माणूस कोणत्याही धर्मात चालण्यासारखा नाही. प्रत्येक धर्माची एक पोथी असते, एक प्रेषित असतो आणि त्याने मांडलेली आचारविचारांची एक नैतिकता असते. ज्या काळात पोथी लिहिली गेली, तो काळ सगळा बदलला, तरी प्रेषितांचे उत्तराधिकारी त्याच आचरणनियमांचा आग्रह धरतात. यहुदी, ख्रिस्ती, मुसलमान असे बांधीव धर्म आहेत. त्यांच्यात माझ्यासारख्या यात्रिकाला जागा नाही.

...पण माझ्यासारखा यात्रिक हिंदू राहू शकतो. नरबळींनी चामुंडा मातेला प्रसन्न करू पाहणाऱ्यांपासून श्वासोच्छ्वासात जंतू तर मरत नाही ना अशी चिंता बाळगणाऱ्या साधूपर्यंत कोणीही हिंदू असू शकतो. कारण हजारो वर्षे हिंदू हा शब्द एका खुल्या प्रयोगशाळेचे नाव आहे. हिंदू हा बंधने घालणारा बांधीव धर्म नाही. हिंदू एक संस्कृती आहे.''

''एकदा एका कार्यकर्त्याने नानासाहेब गोरे यांना प्रश्न विचारला, 'शेतकरी संघटना ही अशी रुक्ष, काव्य नसलेली का झाली?' तेव्हा ते म्हणाले, ''शरद

जोशी हा माणूसच गद्य आहे. त्यांनी जो अर्थशास्त्रीय विषय मांडला, तोच रुक्ष आणि गद्य आहे. आंदोलनाचे साहित्य हे कधी अशा गद्य भाषेत तयार होत नाही. आंदोलनात काहीतरी डोक्यात मस्ती चढणारी, झिंग आणणारी गोष्ट असावी लागते. रामाच्या देवळाचे नाव घ्यावे लागते, नसलेल्या गोष्टी तयार कराव्या लागतात, सामान्य माणसांचेसुद्धा जागोजागी पुतळे उभे करून, त्यांना देवता बनवावे लागते. समाजाच्या हितसंबंधाबरोबरच काही एक पागलपणा केल्याखेरीज आजकाल खरे आंदोलन बनतच नाही आणि शरद जोशींना पागलपणा दाखवता येत नाही.''

''प्रत्येक छायाचित्राचा एक केंद्रबिंदू असतो. त्या बिंदूत प्रतिमा स्वच्छ आणि स्पष्ट दिसते. त्या बिंदूपासून जितके दूर जावे तितकी प्रतिमेची गुणवत्ता कमी होते. प्रत्येक छोट्यामोठ्या विचारवंतांच्या विचारपद्धतीचेही असेच असते. काही केंद्रबिंदूत त्यांना त्यांच्या काळाला व परिस्थितीला अनुरूप असा साक्षात्कार होतो. बुद्धिनिष्ठ सचोटी दाखवून, आपला विचार तेवढ्यापुरताच मर्यादित ठेवावा हे आजपर्यंत थोरामोठ्यांना जमलेले नाही. आपल्याला गवसलेल्या सत्यकणांच्या आधारे विश्वव्यापी पसाऱ्याला गवसणी घालण्याच्या मोहाला मोठमोठे बळी पडलेले आहेत. विश्वाला गवसणी घालण्याच्या मोहात त्यांनी स्वतःच्या पराभवाचा पाया घातला.''

''एका माणसाने दुसऱ्याकरिता करुणेपोटी काम करावे हे तर दोघांनाही घातक आहे, असे मी मानतो. मी जर का सुरवातीलाच डोळ्यांतून पाण्याचे चार थेंब गाळीत संघटनेच्या विचारांची मांडणी केली असती, तर माझी खात्री आहे, की मी आतापर्यंत 'महात्मा' पदवीला पोहोचलो असतो; पण हे मी जाणीवपूर्वक टाळत आलो. एवढेच नव्हे, तर शेतकरी समाजाचे पूज्य संत ज्ञानेश्वर, तुकाराम या दोघांच्या विरुद्धची शिकवण आम्ही आमच्या शिबिरात देतो, कारण मला समाजाला एका विवेकाच्या पायरीवर आणून ठेवायचे आहे. त्यामुळे कोणतीही तडजोड आम्ही स्वीकारीत नाही.''

लोकांना पुजायला एक मूर्ती लागते. एक मॉडेल लागतं. शरद जोशी तर केवळ मूर्तिभंजकच नव्हे तर स्वमूर्तिभंजकही आहेत, हे वरील मजकुराच्या उदाहरणावरून लक्षात येईल. कार्यकर्त्यांना त्यांचे वैयक्तिक अनुभवही साक्षीला असतील. महेंद्रसिंह टिकैत आणि शरद जोशी यांच्यात इथेच फरक आहे. त्यामुळे त्यांचा भक्तगण तयार नाही. संघटनेचे लोक त्यांच्यावर जीवापाड प्रेम करतात; पण संघटनेबाहेर काही अपवाद वगळले; तर कवी-लेखक-कलावंत-



विचारवंत-पत्रकार या मंडळींमध्ये शरद जोशींचे कुणी फारसे भक्त नाहीत. एकेकाळी प्रसिद्धिमाध्यमांनी प्रचंड उचलून धरलेला हा माणूस आज माध्यमांना फारसा दिसत नाही. शिवाय, शरद जोशी ज्या लोकांचे प्रश्न मांडतात, ते लोक पेपर वाचणारे नाहीत आणि जे लोक पेपर वाचतात त्यांच्या विरोधात शरद जोशी बोलत असल्यामुळे माध्यमांत आज शरद जोशींना विक्रीमूल्य नाही. त्यामुळे आज प्रसिद्धिमाध्यमे त्यांच्या वाटेला आणि वाट्याला फारशी जात नाहीत.

प्रस्थापित माध्यमं त्यांच्या गरजेनुसार प्रसिद्धी देत असल्यामुळे आपल्या गरजेनुसार प्रगट होण्यासाठी स्वतःच्या माध्यमाची गरज असते. गडगंज पैसेवाले पक्ष आणि नेते प्रचंड पैसा गुंतवून, स्वतःची वृत्तपत्रे काढू शकतात, तसे संघटनेला शक्य नव्हते. आपल्या मर्यादेत का होईना; पण नियमित प्रकाशित होणारे एक माध्यम 'शेतकरी संघटक'च्या रूपाने आज उपलब्ध आहे. ही मोठी दिलासा देणारी गोष्ट आहे. म्हात्रेसरांची चिकाटी आणि साहेबांचे नियोजन त्यामागे उभे आहे. उद्या कुणाला संघटनेचा इतिहास लिहायचा झाला तर दस्तऐवज म्हणून 'संघटक'च्या फायली उपयोगाला येणार आहेत. संघटक नसता तर संघटनेचा इतिहास लिहिणेच शक्य झाले नसते.

निजामाच्या काळात निघणाऱ्या 'निजाम विजय' साप्ताहिकाच्या फायलीतून द. पं. जोशी यांनी 'काळाच्या पडद्याआड' या नावाने तीन खंडांत आणि हजारो पानांत तत्कालीन मराठवाड्याचा इतिहास सिद्ध केल्याचे उदाहरण आपल्यासमोर आहे. तसे काम करण्याची ऐतिहासिक जबाबदारी ॲड. अनंतराव उमरीकरांनी स्वीकारावी आणि संघटनेचा समग्र इतिहास सिद्ध करावा अशी मी तुम्हा सर्वांच्या साक्षीनं त्यांना विनंती करतो. ते सध्या लिहीत असलेल्या रहस्यकथेपेक्षाही तो इतिहास इंटरेस्टिंग होईल याची मला खात्री आहे.

अलिबागहून शेतकरी प्रकाशनाची सुरुवात झाली तेव्हा अरविंद वामन कुलकर्णी यांना शरद जोशी म्हणाले होते, की आपणाला ज्यांच्यासाठी काम करायचं आहे, ते कुठं वाचणारे आहेत? आपणाला त्यांच्यासाठी गावोगाव जाऊन तोंड पाटीलकीच करावी लागणार आहे; मग हा पुस्तक प्रकाशनाचा आटापिटा कशाला? इस्लामपूरच्या शेतकरी साहित्य संमेलनाच्या समारोपात साहेब म्हणाले होते, की संघटनेला अशी संमेलनं घेऊन फारसा उपयोग नाही. मी जर प्रत्येक शेतकऱ्याला पुस्तक घ्यायला लावलं; तर गंगाधर गाडगीळ आणि व. पु. काळेही आमच्या बाजूनं पुस्तकं लिहितील. अगदी अलीकडं वर्षभरापूर्वी परभणीच्या गणेश वाचनालयात शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना

साहेब म्हणाले होते, ''तुम्ही लोक वाचत का नाही? तुम्ही वाचणार नसाल तर तुमच्यावर कुणी लिहिणारही नाही. दलित समाज शिकला, वाचायला लागला, आसुसून वाचायला लागला; त्यामुळं त्यांच्या प्रश्नावर लिहिणारे वाढले, पुस्तकं वाढली. अगदी अलीकडचं उदाहरण सांगायचं झालं, तर गेल्या पंधरा वर्षांत लाखो शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या; पण त्या विषयावर मराठीत एक धड पुस्तक नाही आणि खैरलांजी प्रकरणावर एका वर्षात एकशे वीस पुस्तकं प्रकाशित झाली. अर्थातच ही चांगली गोष्ट आहे; पण प्रश्न आहे तो तुम्ही असे जागे का होत नाही? म्हणून, बापहो तुम्ही वाचणार नसाल तर तुमच्यावर कुणी लिहिणारही नाही.''

सुरुवातीला 'शेतकरी संघटनाः विचार आणि कार्यपद्धती'सारखे पुस्तक प्रकाशित करताना खळखळ करणाऱ्या साहेबांच्या लक्षात आले, की त्या पुस्तकाच्या लाखो प्रती खपल्या गेल्या आहेत; मग हळूहळू शेतकरी प्रकाशन आकाराला आलं. साहेबांची वेगवेगळ्या पैलूंवर मत प्रदर्शन करणारी पुस्तके आणि पुस्तिका प्रकाशित होऊ लागल्या. साधी निर्मिती, शेतकऱ्यांच्या खिशाला परवडणारी किंमत यामुळं प्रत्येक अधिवेशनात पुस्तकांचा खप वाढू लागला. एखाद्या पुस्तकाच्या दहा-दहा हजार प्रती खपू लागल्या. एकेका अधिवेशनात पुस्तकाच्या आवृत्त्या संपू लागल्या. अगदी सुरुवातीच्या काळात परभणीला झालेल्या १९८४ सालच्या शेतकरी संघटनेच्या दुसऱ्या अधिवेशनात 'शेतकऱ्याचा असूड : शतकाचा मुजरा'सारख्या पुस्तकाचीदेखील आवृत्ती हातोहात संपली. त्यामुळं लवकरच शेतकरी प्रकाशनाला एक आकार येत गेला. पुस्तक प्रकाशित करायचे नाही, या आपल्या भूमिकेवर साहेब ठाम राहिले असते, तर अभ्यासकांना काही साधनच शिल्लक राहिले नसते.

मागच्या वर्षभरात मी स्वामी विवेकानंद, रवींद्रनाथ टागोर, विनोबा भावे, यशवंतराव चव्हाण, बराक ओबामा या लेखकांनी लिहिलेलं अक्षर ना अक्षर वाचून काढलं. रामकृष्ण मठानं स्वामी विवेकानंदांचे संपूर्ण वाङ्मय संकलित करून, सर्व भारतीय भाषांत त्याचे अनुवाद करून घेण्याचे प्रकल्प राबवले नसते तर मला आज विवेकानंद समजून घेता आला असता काय? शांतिनिकेतन विद्यापीठानं समग्र रवींद्रनाथ टागोर प्रकाशित आणि अनुवादित करण्याचे प्रकल्प रावबले नसते; तर मला टागोर काय प्रकरण आहे, ते कसं समजलं असतं? आपली माणसं सरकार, समाज आणि शिक्षणाच्या क्षेत्रात पेरण्याचं अजब कसब टागोरांकडं नसतं; तर टागोर आहेत तेवढे मोठे झाले असते का? त्यांचे निरपेक्ष




मोठेपण मान्य करूनही, त्यांच्या सापेक्षतेचा आपल्यावर प्रभाव पडल्याशिवाय राहत नाही.

मागच्या उन्हाळ्यातल्या १७ मे रोजी नागपूरला गांधी आश्रमाच्या मदतीसाठी आम्ही काही कवींनी 'तिकट' शो केला. तेव्हा परतताना सेवाग्राम आणि पवनार आश्रम पाहण्याची संधी मिळाली. पवनारच्या आश्रमातून मी विनोबांचे समग्र वाङ्मय आणले. तिथले परमधाम मुद्रणालयही पाहिले. तिथं सतत विनोबांची पुस्तकं छापली जातात. गीताई, गीता प्रवचनासारख्या पुस्तकांच्या तर लाखो प्रती सतत छापाव्या लागतात. परमधाम प्रकाशनाला आणि मुद्रणालयाला ही शिस्त विनोबा असताना त्यांनीच लावून दिलेली आहे. विनोबा तर अध्यात्मवादी; पण त्यांनी हे परमधाम ऐलतीराला आणले आणि आपल्या वाङ्मयाच्या मुद्रण, वितरणाचा प्रयत्न करणाराला नीट सहकार्य केले. किंबहुना गीताई आणि गीता-प्रवचनाच्या एवढ्या दिवसांत एवढ्या प्रती गेल्याच पाहिजेत असं उद्दिष्टही त्यांनी काही लोकांना दिलं. किंबहुना, आठवडी बाजारात उभं राहून काही लोकांना पुस्तक विकू दिली. म्हणून आज मला समग्र विनोबा एकत्रित वाचण्यासाठी नीट उपलब्ध होऊ शकतो.

त्या तुलनेत यशवंतराव चव्हाण आणि ओबामांची पुस्तकं मिळवायला मला यातायात पडली; तरी त्यांची आणि त्यांच्यावर लिहिलेली ऐंशी पुस्तकं मला मराठीत सापडली. विवेकानंदांची चाळीस आणि टागोरांची सत्तर पुस्तकं मराठीत उपलब्ध आहेत. बराक ओबामानं स्वतः लिहिलेली दोन आत्मकथनं आणि आणखी दोन पुस्तकं मराठीत उपलब्ध आहेत.

आज श्रीकांतनं साहेबांची पुस्तकं पुनर्मुद्रित केली नसती; तर ती मला एकत्रितपणे वाचायला उपलब्ध झाली असती का? शेतकरी प्रकाशन बंद झाल्यात जमा असताना श्रीकांतनं सगळी पुस्तकं पुन्हा छापायला घेतली, ही परमानंदाची गोष्ट आहे. त्यातही साहेबांना शंका होती, की ही पुस्तकं पुन्हा कोण वाचणार आहे? श्रीकांतने प्रकाशित केलेल्या या पुस्तकांना मिळणारा प्रतिसाद पाहून, साहेबांची शंका फोल ठरलेली आहे. अगदी वाचकांच्या उड्या पडत नसल्या तरी काही जाणकार वाचक आवर्जून त्या पुस्तकाकडे वळत आहेत. सर्व काळात, सर्व भाषांत काही निरपेक्ष वाचक असतात. त्यांच्या मनावर जात, धर्म, पक्षविचार यांची कोणतीही पुटं चढलेली नसतात. असा निरपेक्ष वाचक काहीतरी मूलभूत आणि चांगलं वाचण्याचा भुकेला असतो. अशाच वाचकांसाठी आपलं पुस्तक बाजारात उपलब्ध असणं आवश्यक असतं.



विवेकानंद, टागोर, विनोबांच्या प्रकाशकांसारखा सेवाभावी प्रकाशक जनशक्तीच्या रूपानं साहेबांना मिळालेला आहे. साहेबांविषयी आतून आस्था–प्रेम असलेल्या श्रीकांतने जनशक्ती प्रकाशनाला व्यवसायाची जोडही नीट दिलेली आहे. उपक्रमात सातत्य टिकण्यासाठी ही गोष्ट फारच महत्त्वाची असते. टप्प्याटप्प्यानं श्रीकातनं साहेबांचं अक्षर न् अक्षर पुस्तकाच्या रूपात उपलब्ध करून द्यावं अशी मी त्याला तुम्हा सर्वांच्या साक्षीनं गळ घालतो आणि या निमित्तानं आणखी दोन गोष्टी मी श्रीकांतकडं मागणार आहे. साहेबांचं एक सविस्तर चरित्र आणि संघटनेचा समग्र इतिहास साहेबांच्या अमृतमहोत्सवी वर्षात श्रीकांतनं आम्हाला उपलब्ध करून द्यावा. हे शिवधनुष्य उचलताना आपणा सर्वांची शक्ती त्याच्या पाठीमागे उभी असेल याची मी त्याला खात्री देतो आणि थांबतो.

(‘ग्रंथसखा’ मासिकातून साभार.)

■■




# योद्धा शेतकरी : एका चळवळीचा इतिहास

संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर महाराष्ट्रात ज्या काळी चळवळी झाल्या, त्यांची नोंद करणारी काही पुस्तकं मराठीत प्रकाशित झालेली आहेत. ती बहुतेक पुस्तकं मौज प्रकाशनानं प्रकाशित केलेली आहेत. गोदाताई परुळेकरांनी लिहिलेलं, ‘जेव्हा माणूस जागा होतो’, बाबा आढाव यांनी लिहिलेलं, ‘एक गाव एक पाणवठा’, वसंत देशपांडे यांनी लिहिलेली, ‘म्हैसाळ: दलित मुक्तीचा एक प्रयोग’ आणि ‘हमाल पंचायत’ अशी काही पुस्तकं आपणाला उदाहरण म्हणून सांगता येतील. गोदूताई आणि आढाव यांनी स्वत: केलेल्या चळवळींविषयी लिहिलेलं आहे; तर वसंत देशपांडे यांनी इतरांनी केलेल्या चळवळींविषयी लिहिलेलं आहे.

मला वाटतं, विजय परुळकर यांनी लिहिलेलं ‘योद्धा शेतकरी’ हे पुस्तक याच मालिकेत बसवावं लागेल. फरक एवढाच, की वरील चळवळी आणि पुस्तकं मर्यादित स्वरूपाची होती; तर शेतकरी चळवळ क्षेत्र आणि विषय या दोन्ही दृष्टींनी प्रचंड आवाका असलेली होती. किंबहुना, स्वातंत्र्यानंतर झालेली महाराष्ट्रातलीच नव्हे; तर भारतातली ती सर्वांत मोठी चळवळ होती. त्यामुळं ‘योद्धा शेतकरी’चा व्याप आणि आवाका मोठा. म्हणून त्याची दखलही मोठ्या प्रमाणात घेतली जायला हवी होती; पण तसे झालेले दिसत नाही.

मराठी वाङ्मयव्यवहाराने ‘योद्धा शेतकरी’ सोडून, वरील सर्व पुस्तकांची नीट दखल घेतलेली आहे. वाङ्मयीन नियतकालिकांतून त्या पुस्तकांवर परीक्षणं आली, त्यातले काही उतारे अभ्यासक्रमाला लागले, काही संशोधकांनी त्या पुस्तकांवर संशोधन केले. हे भाग्य ‘योद्धा शेतकरी’च्या वाट्याला आले नाही. किंबहुना, मराठी वाङ्मयव्यवहाराने या पुस्तकाची पूर्णपणे उपेक्षा केली. जशी शेतकरी चळवळीची उपेक्षा झाली, तशीच या पुस्तकाचीही उपेक्षा झालेली




आहे. पुस्तकाच्या प्रकाशकामुळे हा फरक पडला म्हणावा तर 'योद्धा शेतकरी'चे प्रकाशकही नवखे नव्हते. राजहंस प्रकाशनाने हे पुस्तक प्रथम प्रकाशित केले होते. पुस्तकाच्या वितरण आणि जाहिरात तंत्रात ही प्रकाशन संस्था निपुण आहे. पहिल्या आवृत्तीनंतर खुद्द प्रकाशकांनीच या पुस्तकाकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे दुसरी आवृत्ती नाना आठवले या शरद जोशीप्रेमी गृहस्थांनी पदराला खार लावून स्वत:च प्रकाशित केली; पण वितरणाची व्यवस्था नसल्यामुळे ते स्वत:च कोलमडले. आता तिसरी आवृत्ती जनशक्ती वाचक चळवळ या औरंगाबादच्या प्रकाशन संस्थेने प्रकाशित केलेली आहे. पहिल्या आणि दुसऱ्या आवृत्तीतली छायाचित्रं या आवृत्तीतून वगळण्यात आलेली आहेत. खरे तर ही छायाचित्रे अत्यंत बोलकी होती. माणसाची मने पेटवणारी होती. त्या खालच्या वाक्यांनाही काव्यात्मकता होती. पोलिसी अत्याचाराची अशी छायाचित्रे प्रकाशित करून, जनतेची मने चळवळीकडे वळवता येतात. राजू शेट्टी यांच्या शेतकरी संघटनेने याच तंत्राचा अवलंब केल्याचे दिसून येते. त्याचा परिणाम संघटना वाढवण्यात नक्कीच होत असावा.

'योद्धा शेतकरी'ची पहिली आवृत्ती शेतकरी संघटनेच्या प्रसारासाठीच लिहिल्याचे लेखक मान्य करतो. म्हणून कदाचित ती छायाचित्रे तेव्हा पुस्तकात आवश्यक असावीत. शेतकरी संघटनेचा प्रसार हे या पुस्तकाच्या प्रकाशनामागचे प्रयोजन आता मागे पडलेले असून, आज हे पुस्तक संघटनेच्या इतिहासाचे साधन म्हणून जास्त महत्त्वाचे आहे. म्हणून कदाचित प्रकाशकांनी आता या तिसऱ्या आवृत्तीत ती छायाचित्रे वगळली असावीत.

विजय परुळकर हे काही लेखक नव्हेत. त्यांचं हे एकमेव पुस्तक मला माहीत आहे. कदाचित त्यांनी आणखी काही लिहिलेलंही नसावं. हे त्यांचं पहिलंवहिलं आणि एकमेव पुस्तक असावं. असं एखादंच पुस्तक लिहून ऐतिहासिक कामगिरी करणाऱ्या लेखकांची उदाहरणं पुष्कळ देता येतील. परुळकरही शरद जोशी यांच्यासारखेच परदेशात मोठ्या पदावर असलेले. ते जर्मनीत दूरदर्शन प्रतिनिधी होते. जागतिक प्रसिद्धी माध्यमात त्यांनी इतरही देशांत नोकऱ्या केलेल्या



आहेत. आपल्याकडं तेव्हा दूरदर्शन नुकतंच सुरू झालेलं होतं. सामान्यांना त्याचा थांगपत्ताही नव्हता. त्यामुळे एखाद्या घटनेचा प्रसार करण्याचे तंत्र परुळकरांना पुरेपूर अवगत असणार. या पुस्तकाच्या स्वरूपावरून आपणाला त्याची पुरेपूर खातरी पटते. सुरुवातीला 'साप्ताहिक माणूस'मधून लेखमालेच्या रूपात हे पुस्तक प्रकाशित झाले. 'साप्ताहिक माणूस' आणि त्यांचे संपादक श्री. ग. माजगावकर यांना बुद्धिमंतांमध्ये एक आदराचं स्थान होतं. त्याचा फायदा या पुस्तकाला सुरुवातीला मिळाला असणारच. माजगावकर स्वत: शेतकरी आंदोलनाशी सुरवातीला एकरूप झालेले होते.

परुळकरांना आणि माजगावकरांना ग्राम आणि शेतीविकासात रस होता. माजगांवकरांची ग्रामायण नावाची संस्था होती आणि परुळकर विलास साळुंके यांच्या नायगावातील पाणी पंचायतीच्या उपक्रमात सहभागी होते. (विलासराव साळुंके यांच्या पाणी पंचायतीवरचे एक पुस्तक अलीकडेच प्रसिद्ध लेखक मिलिंद बोकील यांनी संपादित केलेले असून, त्याची निर्मिती व वितरण मौज प्रकाशनानेच केलेले आहे. शिवाय, या पाणी पंचायतीवरचे आणखी एक पुस्तक अलीकडेच राजहंस प्रकाशनानेही प्रकाशित केलेले आहे.) परुळकरांनी तर 'योद्धा शेतकरी'मध्ये विलास साळुंके आणि शरद जोशींनी एकत्रित काम करावे असा उल्लेख दोनदा केलेला आहे. त्यात अण्णा हजारे, एन. डी. पाटील सहभागी झाले असते, तर आज नक्कीच चित्र बदलले असते. या सर्व मोठ्या माणसांचा मोठेपणा आपणाला मान्य असतो; पण तो त्यांना एकमेकांना मान्य नसतो हे आमचं दुर्दैव असतं.

शरद जोशी यांनी जसा अनेक गोष्टींचा त्याग करून, संघटनेसाठी आयुष्य दिलं; तसंच परुळकरांनी अनेक गोष्टींचा त्याग करून एक वर्ष या शेतकरी चळवळीसाठी दिलं आणि इतिहास रचून ठेवला; नाही तर हा पांगलेला इतिहास आज कोणालाच गोळा करता आला नसता. व्हिएतनाम युद्धाच्या वार्तांकनाचा अनुभव असलेल्या परुळकरांना शेतकऱ्यांचा हा लढा म्हणजे युद्धच वाटले. ते या युद्धाचे वार्तांकन करताना केवळ वृत्तांतकार राहिले नाहीत, तर या युद्धात एक स्वयंसेवक म्हणून ते सहभागी झालेले आहेत. जाता-येता लहानमोठी कामं ते करतात, संकटसमयीची चिंता वाहतात, संकटातून प्रसंग मोकळा होताच आनंदाचा नि:श्वास सोडतात, वेळप्रसंगी निरोपा-निरोपी करतात. आपण करत असलेलं काम ऐतिहासिक आहे, हे त्यांच्या चांगलं लक्षात आलेलं असावं. त्यामुळं ते कामात कसूर होऊ देत नाहीत.

शेतकरी संघटनेच्या सुरुवातीच्या चाकणच्या आंदोलनानंतर नाशिकच्या सटाणा भागात १९८० च्या नोव्हेंबरमध्ये झालेल्या एकाच आंदोलनाचा हा वृत्तांत आहे. आधीच्या आणि नंतरच्या आंदोलनांचा या लेखनाशी संबंध नाही; पण एका आंदोलनात येऊ शकणाऱ्या सर्व अनुभवांच्या कंगोऱ्यांना इथे स्पर्श करण्यात आलेला आहे. म्हटलं तर हे ललित लेखन आहे, म्हटलं तर ही कादंबरी आहे, म्हटलं तर हे वार्तांकन आहे, म्हटलं तर शरद जोशींचं विशिष्ट काळातलं चरित्र आहे आणि म्हटलं तर तात्त्विक लेखनही आहे. अशी वेगवेगळी परिमाणं या लेखनाला लाभलेली आहेत. संघटनेचे नायक, संघटनेचे खलनायक, संघटनेची प्रजा, संघटनेचा विचार, संघटनेचा संघर्ष, संघर्षातल्या घटना, घटनांमधले रहस्य अशा अनेक वैशिष्ट्यांमुळं या लेखनाला आपण कल्पू तो आकार देऊ शकतो आणि तो आकार पुराव्यासह सिद्ध करू शकतो.

त्यामुळं कादंबरीच्या वाचकाला हे लेखन तितकंच उत्कंठावर्धक वाटू शकतं, रसिक वाचकाला ते तितकंच लालित्यपूर्ण वाटू शकतं, कार्यकर्त्याला ते तितकाच विचार देऊ शकतं. अशा अनेक प्रकारच्या वाचकांना गुंतवून ठेवण्याचं सामर्थ्य या लेखनात आहे. मी याआधी ते अनेकदा वाचलेलं आहे. सुरवातीला ते वाचून भारावलो आहे. मधल्या काळातही प्रसंगानुरूप ते मी वाचलं आहे आणि आजही मी ते तितक्याच उत्कंठावर्धक प्रतिसादासह वाचू शकतो. कारण लेखकाने त्यात जीवच असा ओतला आहे, की ते लेखन केव्हाही शिळं वाटणार नाही.

इंडिया विरुद्ध भारत या संकल्पनेचा उदय याच आंदोलनात झाला आणि तो शरद जोशी यांनीच केला. आज हिंदीतले विद्वान लेखकही या संकल्पनेचा उल्लेख करतात; पण या संकल्पनेचा उद्‌गाता कोण हे नीट माहीत नसल्यामुळे ती कुणांच्याही नावावर खपवली जाते. उत्पादनखर्चावर आधारित बाजारभाव ही संकल्पनाही प्रथम शरद जोशी यांनीच मांडली. आज ती सर्वत्र मान्य झालेली आहे. ती अर्थशास्त्रीय संकल्पना असल्यामुळे तीमात्र शरद जोशी यांच्या नावावर सांगितली जाते.

आज राजकारणात पडलेले शरद जोशी अपयशी झाल्यासारखे वाटत असले; तरी संघटनामात्र पूर्णपणे यशस्वी झालेली आहे. आज पक्षीय राजकारणात यशस्वी झालेले पक्ष शरद जोशी यांच्याच भाषेत बोलून यशस्वी होतात; पण स्वत: शरद जोशी यांना मात्र यश मिळत नाही. याचा अर्थ विचार मांडणे वेगळे आणि त्या विचारांचे राजकारण करणे वेगळे. विचार यशस्वी झाला; तरी त्या



विचारांचे राजकारण यशस्वी होईलच याची खातरी देता येत नाही.

पुस्तक हातात घेतो, म्हणजे असे वाटते, की 'योद्धा शेतकरी' ही संकल्पना शरद जोशी या व्यक्तीसाठी वापरलेली आहे; पण पुस्तक वाचून होते तेव्हा ती आंदोलनातल्या आक्रमक शेतकऱ्यांना उद्देशून वापरली आहे असे आपल्या लक्षात येईल. तरी शरद जोशी या व्यक्तीची नायक म्हणून पूर्ण प्रतिमा आपल्या मनात ठसविण्यात हे पुस्तक पूर्णपणे यशस्वी होते. खलनायकाच्या अस्तित्वाशिवाय नायक उभा राहणे शक्य नाही. इथे एक नव्हे; तर अनेक खलनायक भेटतात. तेव्हाचे सर्व पक्षांचे आणि इतर संघटनांचे सर्व नेते खलनायक किंवा जोकर म्हणूनच इथे आलेले आहेत. आज आणि आधीही सर्वमान्य असलेल्या व्यक्तींचे तिरकस आणि सरळ उल्लेखही त्यांना खलनायकी झाक देऊन जातात. यशवंतराव मोहिते, वसंतदादा पाटील आणि बबनराव पाचपुते यांनामात्र नायकाचाच रंग लाभलेला आहे. पैकी बबनराव पाचपुते तर श्रीगोंदा गोळीबारात हीरोच आहेत. तिथूनच आंदोलन पेटले; पण हे बबनराव पुढे आंदोलनात भेटत नाहीत.

या आंदोलनाच्या यशाने भांबावून गेलेल्या सर्वच पक्षांच्या प्रमुख नेत्यांची त्रेधातिरपीट झालेली इथे पाहावयास मिळते. आपले अस्तित्व सिद्ध करण्यासाठी प्रत्येकाची केविलवाणी धडपड पाहून मजा येते. काहीही करून, शरद जोशींच्या नेतृत्वाविषयी संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न करणारांची तर कीव येते. हे असे संभ्रम निर्माण करणे तर अजूनही संपलेले नाही.

'कालचा शरद जोशी' या लेखात आणि इतरत्रही आलेल्या काही उल्लेखांवरून शरद जोशी हा काय प्रकार आहे तेही कळते. सिगारेट ओढणारा, भन्नाट जीपगाडी, मोटारसायकल चालवणारा, सैगलची गाणी गाणारा हा खराखुरा हीरोच वाटतो. सामाजिक जीवनात तर तो हीरो आहेच. याउलट प्रस्थापित राजकारण आणि राजकारणी यांच्याविषयी संभ्रम निर्माण करण्यात शरद जोशी इथे कमालीचे यशस्वी होतात. हे सगळे करताना ते कुणाचेही नाव घेत नाहीत. आतापर्यंतच्या राजकीय धोरणांनी शेतकऱ्यांना कसे नाडले, ते सिद्ध करून निष्कर्षाचा आवळा हातावर ठेवल्यामुळे आपण फसवलो गेलो याची शेतकऱ्यांना खातरीच पटते. प्रस्थापित राजकारणापासून लोकांना दूर नेण्यात ते यशस्वी होतात. शरद जोशींनी मशागत केलेल्या याच रानात पुढे शिवसेनेला राजकारणाचे पीक घेणे अतिशय सोपे झाले. सुरवातीला राजकारणात न उतरू इच्छिणाऱ्या संघटनेला सेनेने पर्याय निर्माण करून दिला.

या सर्व लेखनात 'स्वातंत्र्य मिळून तेहतीस वर्षे झाले तरी' असा उल्लेख येत

राहतो. त्यालाही आता तीस वर्षे होऊन गेली. संघटनेने अणि परुळकरांनी विचारलेल्या प्रश्नांची पूर्ण होकारार्थी उत्तरं अजूनही मिळाली नाहीत. 'आपण एका दोषास्पद समाजाकडून दुसऱ्या दोषास्पद समाजाकडे जात असतो. नवीन समाजात निर्माण होणाऱ्या दोषांची तीव्रता आजच्या परिस्थितीच्या मानानं कमी असते. या जगात संपूर्ण शोषणरहित समाज कुठंही, कधीही झाला नाही आणि होणार नाही,' असं खुद्द शरद जोशी यांनीच लिहून ठेवलेलं आहे. त्यात फरक एवढाच झाला, की कमी दोषास्पद समाजाकडून आपण जास्त दोषास्पद समाजाकडे प्रवास केला. त्यामुळे शेतकऱ्यांच्या प्रश्नांतही वाढ झाली आणि तो आत्महत्येच्या कड्यावर येऊन पोचला.

विजय परुळकर इथे चळवळीवर लिहीत असले; तरी त्यांची लेखणी लालित्यपूर्ण आहे. त्यांच्या प्रगल्भ वाचनाच्या खुणा जागोजाग सापडतात. रामदास, बहिणाबाई, सानेगुरुजी यांच्या कवितांची उदाहरणं जागोजाग येतात. सावरकरही येतात. चक्रधरांच्या लीळाचरित्रातल्या असतीपरीचा फार सुंदर उल्लेख येतो. 'नाही मी बोलत'सारख्या नाट्यगीताचाही चपखल उल्लेख येऊन जातो. या सगळ्यामधून त्यांचे बहुश्रुत वाचन अधोरेखित होत जाते.

'मी कॉलेजमध्ये असताना जे. कृष्णमूर्ती यांची काही व्याख्यानं ऐकली आहेत. विचार मांडण्याचं त्यांचं तंत्र अभ्यासण्यासारखं आहे! संपूर्ण शुद्ध विचार कसा करावा? आधीची विचारपटलं काढून टाकून, मुद्द्याला कसा हात घालावा? याबाबतीत कदाचित माझ्यावर त्यांचा प्रभाव पडला असावा!'

एका प्रश्नाच्या उत्तरात शरद जोशी यांनी दिलेली वरील माहिती आपल्या मनात अनेक संदर्भ जागे करीत जाते. शरद जोशी यांचा तत्त्वज्ञानातला रस आणि वाङ्मयीन अभिरुचीचे अनेक दाखले त्यांच्या लेखनात सापडत राहतात. आल्डस हक्सले आणि सॉमरसेट मॉम या लेखकांचा आपल्यावर प्रभाव असल्याचेही शरद जोशी सांगतात. एकूणच या पुस्तकाचा नायक आणि लेखक दोघेही संदर्भसंपन्न आहेत, हे सतत जाणवत राहते.

या पुस्तकात शरद जोशी यांच्याबरोबरच शंकरराव वाघ, माधवराव खंडेराव मोरे, प्रल्हाद पाटील कराड, माधवराव बोरस्ते यांची व्यक्तिचित्रे येतात. ती स्वतंत्र नसली; तरी ती स्पष्ट आणि ठळक आहेत हे जाणवत राहते. संघटनेतल्या कार्यकर्त्यांची ही पहिली फळी म्हणता येईल.

विजय परुळकरांच्या 'योद्धा शेतकरी' या पुस्तकावरच्या वरील प्रतिक्रिया आजच्या आहेत; पण मी जेव्हा हे पुस्तक प्रथम वाचलं तेव्हा वरील प्रकारे मी



या पुस्तकाचा विचार केलेला नव्हता. शेतकऱ्याचा एक मुलगा म्हणून वीस-पंचवीस वर्षांपूर्वी मी हे पुस्तक वाचले होते, तेव्हा त्याने मला अस्वस्थ केले होते. माझ्या विचारात बदल घडवले होते. माझ्या पिढीच्या अनेक शेतकऱ्यांच्या पोरांना या पुस्तकाने पेटवले होते. आज कदाचित या पुस्तकामुळे पेटून उठण्याचा ताजेपणा मला जाणवत नसला; तरी हे पुस्तक प्रथम वाचणाऱ्या कुणाही शेतकऱ्याच्या मुलाची झापडं उघडण्याचं काम करू शकतं. शेतीच्या अर्थशास्त्राचा विचार इतक्या लालित्यपूर्ण पद्धतीनं प्रथमच वाचणाराला गुंगवून ठेवतो आणि गैरसमजाच्या गुंगीतून जागेही करतो.

शेतकरी संघटनेच्या इतिहासाचे साधन म्हणून तर या ग्रंथाचे महत्त्व केव्हाही वादातीतच राहील.

■■

## ा यांची पुस्तके

धनी

णी

ा

ा

**ललित**

गाई घरा आल्या

लळा

घरीदारी

मळा

तिफनसाज

प्रिय आबा

**इतर**

मऱ्हाटवाडी

बहिणाबाई चौधरी

संत जनाबाई

उगवले नारायण

ताराबाई शिंदे

गाऊ जिजाऊस आम्ही

प्रिय इंद्रजित

सप्रेम आशीर्वाद

'अंतर्नाद'च्या ऑक्टोबर २००९चा 'शरद जोशी विशेषांक' मिळाल्यावर मुद्दाम वेळ काढून वाचून काढला. या अंकाने शरद जोशी पर्वाचे प्रभावी यथातथ्य दर्शन घडविले आहे. तुमचा लेख प्रथम वाचला. थोडे माहीत होते; पण या चळवळीत तुमची गुंतवणूक इतकी आणि अशी होती, हे सारे तपशिल वाचल्यानंतरच कळाले. तुमच्या जीवनातील आयुष्यभर जपून ठेवण्याचा हा काळ आहे. या चळवळीसाठी तुमची कविता कशी खळाळत राहिली आणि तिला श्रोत्यांच्या प्रचंड संख्येने कशी वेळोवेळी दाद दिली याचे सुरेख चित्र सहजपणे तुमच्या लेखणीतून उतरले आहे. फार आनंद वाटला. कवितेने तुम्हाला जिव्हाळ्याच्या आविष्करणाचा आनंद दिला आणि तुमच्या रक्तात रुजलेल्या सामाजिक बांधिलकीने शेतकरी संघटनेला एक प्रथमश्रेणीचा कलावंत कार्यकर्ता मिळवून दिला.

तुमचा

पुपाजी (पुरुषोत्तम पाटील)

संपादक : कवितारती,

धुळे ६/१०/२००९